# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – १५

## सभावृत्तांत

दिनांक – २०.३.२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च-२०१८ ची मा.महापालिका सभा मंगळवार दि.२०.३.२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे - महापौर
२) मा.शैलजा अविनाश मोरे - उपमहापौर
३) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
४) मा.साधना अंकुश मळेकर
५) मा.दत्तात्रय बाबूराव साने
६) मा.अश्विनी संतोष जाधव
७) मा.सारीका शिवाजी सस्ते
८) मा.राहुल गुलाब जाधव
९) मा.वसंत प्रभाकर बोराटे
१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास
११) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१४) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
१६) मा.गायकवाड निर्मला मनोज
१७) मा.सागर बाळासाहेब गवळी
१८) मा.गोफणे अनुराधा देविदास
१९) मा.बारसे प्रियांका प्रविण
२०) मा.अजित दामोदर गव्हाणे
२१) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश
२२) मा.लांडगे सारिका संतोष
२३) मा.लांडगे रवि लक्ष्मण
२४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव
२५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे
२६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२७) मा.फुगे भिमाबाई पोपट
२८) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
२९) मा.सावळे सिमा रविंद्र
३०) मा.लोंढे नम्रता योगेश
३१) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
३२) मा.लांडे विक्रांत विलास
३३) मा.गीता सुशिल मंचरकर
३४) मा.राहुल हनुमंतराव भोसले
३५) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
३६) मा.समीर मोरेश्वर मासुळकर
३७) मा.अनुराधा गणपत गोरखे
३८) मा.केशव हनुमंत घोळवे
३९) मा.मंगला अशोक कदम
४०) मा.तुषार रघुनाथ हिंगे
४१) मा.अश्विनी भिमा बोबडे
४२) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे
४३) मा.संजय बबन नेवाळे
४४) मा.एकनाथ रावसाहेब पवार
४५) मा.भालेकर प्रविण महादेव
४६) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४७) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
४८) मा.पंकज दत्तात्रय भालेकर
४९) मा.घोलप कमल अनिल
५०) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५१) मा.पवळे सुमनताई मधुकर
५२) मा.चिखले सचिन तुकाराम
५३) मा.जावेद रमजान शेख
५४) मा.यादव मीनल विशाल
५५) मा.वैशाली जालिंदर काळभोर
५६) मा.प्रमोद कुटे
५७) मा.राजू मिसाळ
५८) मा.बाबर शर्मिला राजू
५९) मा.अमित राजेंद्र गावडे
६०) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
६१) मा.खानोलकर प्रज्ञा महेश
६२) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
६३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६४) मा.ढाके नामदेव जनार्दन
६५) मा.करुणा शेखर चिंचवडे
६६) मा.चिंचवडे सचिन बाजीराव
६७) मा.भोईर सुरेश शिवाजी
६८) मा.अपर्णा निलेश डोके
६९) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
७०) मा.गावडे राजेंद्र तानाजी
७१) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
७२) मा.जयश्री वसंत गावडे
७३) मा.कोमल दिपक मेवानी
७४) शितल उर्फ विजय गोरख शिंदे
७५) मा.शाम गणपतराव लांडे
७६) मा.सुजाता सुनिल पालांडे
७७) मा.कदम निकीता अर्जुन
७८) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
७९) मा.नढे विनोद जयवंत
८०) मा.पाडाळे निता विलास
८१) मा.काळे उषा दिलीप
८२) मा.कोकणे संतोष अंकुश
८३) मा.पवार मनिषा प्रमोद
८४) मा.बारणे अर्चना तानाजी
८५) मा.अभिषेक गोविंद बारणे
८६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे
८७) मा ॲड. भोसले सचिन सुरेश
८८) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८९) मा.बारणे माया संतोष
९०) मा.निलेश हिरामण बारणे
९१) मा.वाघमारे अश्विनी विक्रम
९२) मा.दर्शले रेखा राजेश
९३) मा.कलाटे राहुल तानाजी
९४) मा.कलाटे मयूर पांडुरंग
९५) मा.ममता विनायक गायकवाड
९६) मा.कस्पटे संदिप अरुण
९७) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
९८) मा.सविता बाळकृष्ण खुळे
९९) मा.सुनिता हेमंत तापकीर
१००) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०१) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१०२) मा.कुटे निर्मला संजय
१०३) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे
१०४) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे
१०५) मा.आंगोळकर सागर सुनिल
१०६) मा.मुंढे उषा अंकुश
१०७) मा.कदम शशिकांत गणपत
१०८) मा.लोखंडे चंदा राजू
१०९) मा.बनसोडे राजू विश्वनाथ
११०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
१११) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
११२) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे
११३) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
११४) मा.राजापुरे माधवी राजेंद्र
११५) मा.चौगुले सीमा दत्तात्रय
११६) मा.नवनाथ दत्तू जगताप
११७) मा.संतोष बबन कांबळे
११८) मा.सोनवणे शारदा हिरेन
११९) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे
१२०) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
१२१) मा. वाबळे संजय मल्हारराव
१२२) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
१२३) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर
१२४) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू
१२५) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.प्रविण आष्टीकर-प्र.अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.गावडे-सह आयुक्त,मा.पाटील,मा.दुधेकर -सहशहर अभियंता, मा.कडूसकर,मा.दुरगुडे,मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोराटे,मा.खोत,मा.झगडे मा.राऊत-सहा.आयुक्त,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.जुंधारे-कार्य.अभियंता,मा.आगळे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

## <u>नियुक्त्या</u>

**विषय क्रमांक-१)** मा.ढंडे लक्ष्मण धोंडू, मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई, मा.कुटे निर्मला संजय, मा.उत्तम प्रकाश केंदळे व मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असून मा.स्थायी समिती सदस्यत्वाच्या पाच जागा रिकाम्या झाल्या असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २३ अन्वये सदर नैमित्तीक रिकाम्या जागांवर उक्त अधिनियमाच्या कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून उर्वरित मुदतीपर्यंत पालिका सदस्यांच्या नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करणे.

**मा.नगरसचिव-** मा.स्थायी समितीच्या विद्यमान ०५ सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे नैमित्तीक रिक्त झालेल्या जागांवर उर्वरित मुदतीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३ अन्वये मा.स्थायी समितीवर ०५ (पाच) मा.सदस्यांच्या नियुक्त्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे “प्रमाणशिर प्रतिनिधित्व” देवून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करणे.

महाराष्ट्र महापालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या मा.स्थायी समिती अथवा इतर समित्यांवर महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकिय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे म्हणून मा.स्थायी समिती अथवा इतर समित्यांवर पक्षीय बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली असून त्याकरिता शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१०/प्र.क्र.८५/नवि ३२ दिनांक ६ जुलै २०१० नुसार कार्यपद्धतीचा अवलंब करावयाचा आहे.

तसेच नैमित्तीक रिक्त होणा-या जागेवर राजीनामा दिलेला मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा, गटाचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा आहे, त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या / नोंदणीकृत पक्षाच्या / गटाच्या आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास उर्वरित कालावधीकरिता नामनिर्देशित करावयाचे असून विद्यमान मा.स्थायी समितीच्या राजीनामा दिलेल्या ०५ मा.सदस्यांची नावे पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | मा.सभासदाचे नाव | पक्ष |
|---|---|---|
| १ | मा.ढंडे लक्ष्मण धोंडू | पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी |
| २ | मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई | पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी |
| ३ | मा.कुटे निर्मला संजय | पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी |

| | | |
|---|---|---|
| ४ | मा.उत्तम प्रकाश केंदळे | पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी |
| ५ | मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे | पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी २०१७ |

याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी – ०४, आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी – ०१ या पक्षिय बलाप्रमाणे नियुक्त्या करणेकरिता –

मा.सभागृह नेते तथा गटनेता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी, मा.एकनाथ पवार यांनी त्यांच्या पक्षाचे ४ सदस्यांची नावे मा.महापौर साहेब यांचेकडे सादर करावीत अशी विनंती करण्यात येत आहे. (बंद लखोटा देणेत आला.)

मा.गटनेता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी २०१७ यांनी त्यांच्या पक्षाच्या १ सदस्याचे नाव मा.महापौर साहेब यांचेकडे सादर करावे अशी विनंती करण्यात येत आहे. (बंद लखोटा देणेत आला.)

मा.महापौर यांनी बंद लखोटा सर्वांसमक्ष उघडला आणि त्यामध्ये असणारे नांव श्री.बोदडे, प्र.क्षेत्रिय अधिकारी, क क्षेत्रिय कार्यालय यांनी सभागृहात वाचून दाखविले ते पुढीलप्रमाणे-

१) मा.लांडगे सारिका संतोष - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी

२) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश- पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी

३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी

४) मा.बारणे अर्चना तानाजी - पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी

५) मा.मळेकर साधना अंकुश– पिंपरी चिंचवड महानगरपालिका अपक्ष आघाडी-२०१७

त्यानंतर मा.महापौर यांनी नवनिर्वाचित मा.स्थायी समिती सदस्यांची नावे जाहिर करुन पुष्पगुच्छ देवून त्यांचे अभिनंदन केले.

--------------

ठराव क्रमांक - १६१ विषय क्रमांक - १

दिनांक – २०/३/२०१८ विभाग – मा.नगरसचिव

**<u>स्थायी समिती सदस्य</u>**

मा.उंडे लक्ष्मण धोंडू, मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई, मा.कुटे निर्मला संजय, मा.उत्तम प्रकाश केंदळे व मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असून मा.स्थायी समिती सदस्यत्वाच्या पाच जागा रिकाम्या झाल्या असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३ अन्वये सदर नैमित्तीक रिकाम्या जागांवर उक्त अधिनियमाच्या कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून उर्वरित मुदतीपर्यंत पालिका सदस्यांच्या

नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून आणि सदर रिकाम्या जागेवर सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचार विनीमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.लांडगे सारिका संतोष २) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश ३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र ४) मा.बारणे अर्चना तानाजी ५) मा.मळेकर साधना अंकुश या पालिका सदस्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करण्यात आली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

--------

(सभागृहाच्या वतीने मा.महापौर यांच्या हस्ते मा.स्थायी समितीचे नवनिर्वाचित सदस्य आणि पीएमपीएमएलच्या अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती नयना गुंडे यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर त्यांनी सभागृहास त्यांचा परीचय करुन दिला.)

--------

**मा.माधवी राजापुरे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -१६२ विषय क्रमांक – २
दिनांक – २०/३/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वृक्ष/४/कावि/९७/२०१८ दिनांक १२/२/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.२२९९ दि.२८/२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे जतन अधिनियम १९७५ प्रकरण ६ कलम १६ अन्वये मा.वृक्षप्राधिकरण समितीने सन २०१७-१८ चे सुधारीत व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकास मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सबब सोबत प्रमाणे मा.वृक्ष प्राधिकरणाने तयार केलेले व मंजुर केलेले अंदाजपत्रक असून सन २०१७-१८ चे सुधारीत व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रक र.रु.२२,६१,५६,०००/- इतके आहे. सदर अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रियांका बारसे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.भिमाबाई फुगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ३

दिनांक – २०/३/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशासन/१/कावि/६१४/२०१७, दि.२३/०८/२०१७

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२४ दि. ८/०९/२०१७

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.७८ दि.१६/१०/२०१७

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.१०३ दि.२८/११/२०१७

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.११९ दि.०५/०२/२०१८

६) मा.महापालिका सभा ठ.क्र.१४९ दि.२८/०२/२०१८

आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर आदेश क्र.प्रशा/१/कावि/३७७/२०१५, दि.२८/०४/२०१५ अन्वये डॉ.के.अनिल रॉय यांची पदोन्नती समितीची मान्यता व मा.महापालिका सभा ठराव क्र. ५०३, दि.०५/०७/२०१४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार करण्यात आलेल्या नेमणुकीच्या अनुषंगाने शासन मान्यतेकामी सादर करण्यात आलेल्या क्र.प्रशा/१/कावि/४३२/१५, दि.१५/०५/२०१५ प्रमाणेच्या मुळ प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.उपसचिव (नवि-२२) यांनी पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

1) आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद उपलब्ध झाल्याच्या दिनांकास पदोन्नतीसाठी उपलब्ध अधिका-यांची अर्हता, सेवाज्येष्ठता या सर्व बाबींचा विचार करता, आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावरील पदोन्नतीबाबत महापालिकेच्या दि.१५/०५/२०१५ च्या प्रस्तावास मान्यता देणे योग्य ठरणार नाही.

2) प्रस्तुत प्रकरणी पद उपलब्ध झाल्याच्या दिनांकापासून डॉ.अनिल रॉय व डॉ.पवन साळवे यांची पात्रता व सेवाज्येष्ठता तपासण्यासाठी सदर प्रकरण पदोन्नती समितीसमोर पुन्हा ठेऊन त्यावर फेरनिर्णय घेण्यात यावा. तद्नंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ (४) मधील तरतुदींनुसार शासन स्तरावर आवश्यक तो निर्णय घेण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त बाबींवर निर्णय घेण्याकामी दि.२८/०७/२०१७ रोजी समिती सभा आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या समितीने प्रशासन विभागाने सादर केलेला प्रस्ताव व शासनाचे निर्देश विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

1) डॉ.नागकुमार कुणचगी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे दि.३०/०४/२०११ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेने महापालिका आस्थापनेवरील आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद दि.०१/०५/२०११ पासून रिक्त झाले आहे.

2) महापालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिका-यांमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी अर्हता विचारात घेऊन डॉ.अय्यर राजशेखर, वैद्यकीय संचालक (शैक्षणिक अर्हता - एम.बी.बी.एस., डी.पी.एच.) यांच्याकडे दि.०१/०५/२०११ पासून अतिरिक्त पदभार सोपविण्यात आलेला आहे.

3) डॉ.अय्यर राजशेखर,वैद्यकीय संचालक हे दि.३१/०५/२०१२ रोजी नियत वयोमानानुसार महापालिका सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे दि.०१/०६/२०१२ रोजी वैद्यकीय संचालक या पदाबरोबर आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद रिक्त झालेले आहे.

4) दि.०१/०६/२०१२ रोजी वैद्यकीय आस्थापनेवर आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता विचारात घेता, डॉ.पवन साळवे,वैद्यकीय अधिकारी हे एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम. ही अर्हता धारक अधिकारी उपलब्ध होते.

5) दरम्यान रिक्त असलेले वैद्यकीय संचालक या अभिनामाचे पद पदोन्नतीने भरण्याबाबत दि.१६/०८/२०१२ रोजी आयोजित पदोन्नती समिती सभेने यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाकरीता वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक आणि वैद्यकीय उपअधिक्षक ही तीनही पदे एकाच वेतनश्रेणीत असल्याने वैद्यकीय संचालक हे पद पदोन्नतीने न भरण्याबाबत निर्णय घेतला. तथापि वैद्यकीय विभागासाठी असलेली आरोग्य वैद्यकीय अधिकारी आणि अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी ही एकाच वेतनश्रेणीत, एकाच शैक्षणिक अर्हतेमध्ये आणि कर्तव्ये व जबाबदा-या समान असल्याने पदाकरीता आवश्यक असणारी एम.बी.बी.एस. आणि डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता धारण करणारे एकमेव वैद्यकीय अधिकारी डॉ.पवन वसंत साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) यांना अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्याकामी दि.१६/०८/२०१२ च्या समितीने शिफारस केलेली होती. त्यानुसार आदेश क्र.प्रशा/१/कावि/९८८/१२, दि.१७/०९/२०१२ अन्वये डॉ.साळवे पवन यांना अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

6) डॉ.के.अनिल रॉय यांनी डी.पी.एच. अर्हता दि.३०/०५/२०१३ रोजी धारण केलेली आहे. दि.३१/०५/२०१३ रोजी आयोजित पदोन्नती समितीने वैद्यकीय अधिका-यांची शैक्षणिक अर्हता व सेवाज्येष्ठता तपासून डॉ.के.अनिल रॉय (शैक्षणिक अर्हता - एम.बी.बी.एस.,डी.पी.एच) यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्याबाबत शिफारस केलेली आहे. त्यानुसार पदोन्नती समितीची शिफारस, मा.महापालिका सभेची मान्यता व शासन मार्गदर्शन यांनुसार दि.२८/०४/२०१५ च्या आदेशान्वये डॉ.के.अनिल रॉय यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. शासन

निर्देशानुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी पद उपलब्ध झाल्याच्या दिनांका रोजी (दि.०१/०५/२०११) डॉ. अय्यर राजशेखर (एम.बी.बी.एस., डी.पी.एच) व डॉ.साळवे पवन (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाकरीता पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत होते. तसेच डॉ.अय्यर सेवानिवृत्त झाल्यानंतर दि.०१/०६/२०१२ रोजी डॉ. साळवे हे पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हता धारण केलेले एकमेव वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होते. सदर दिनांकास डॉ.के.अनिल रॉय हे डी.पी.एच ही शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते. त्यामुळे डॉ.साळवे यांचा आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीकरीता विचार करणे आवश्यक होते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (१) नुसार मा.महापालिका सभा ही नियुक्ती प्राधिकारी असल्याने सदरची बाब निर्णयाकामी/मान्यतेकामी मा.विधी समितीमार्फत मा.महापालिका सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यास प्रस्तुतची समिती सर्वानुमते शिफारस करीत आहे. सबब, मा.उपसचिव (नवि-२२) यांनी पत्र क्र. पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस प्राप्त निर्देश, दि.२८/०७/२०१७ च्या समितीची शिफारस या बाबी विचारात घेऊन महापालिका आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीबाबत निर्णय घेण्याकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्याबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव असलातरी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग (नवि-२२) यांचेकडील पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्रक्र३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस प्राप्त निर्देश आणि दिनांक २८/७/२०१७ रोजीच्या पदोन्नती समितीचा निर्णय व शिफारस विचारात घेऊन आरोग्य वैद्यकीय अधिकारी पद पदोन्नतीसाठी उपलब्ध झालेचे दिनांक रोजी (दि.१/५/२०११) डॉ.अय्यर राजशेखर (एम.बी.बी.एस., डी.पी.एच.) व डॉ.पवन साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाकरीता पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत होते. तसेच डॉ.अय्यर सेवानिवृत्त झाल्यानंतर दि.१/६/२०१२ रोजी डॉ.पवन वसंत साळवे हे पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हता धारण केलेले एकमेव वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होते. सदर दिनांकास डॉ.के.अनिल रॉय हे डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते. त्यामुळे डॉ.पवन वसंत साळवे यांचा आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नती करीता विचार करणे आवश्यक होते. ही वस्तुस्थिती विचारात घेता नियुक्ती प्राधिकारी म्हणून पुर्वीचे या पदासंबंधीचे सर्व निर्णय अधिक्रमित करुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर डॉ.पवन वसंत साळवे (एम.बी.बी.एस.,एम.डी.पी.एस.एम.) यांची पदोन्नतीने नेमणूक करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.निर्मला गायकवाड -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.विलास मडिगेरी** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आदेशान्वये मनपातील अभियंता पदाच्या सेवाजेष्ठता यादया महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२ नुसार करुन मा.महापालिका ठराव क्र.८ दि.०४/०१/१९८३ पासुन फेरनिवडसुची करणेबाबत महाराष्ट्र शासनाने मनपास आदेश दिलेले

आहेत तसेच सदर आदेशाची अंमलबजावणी करणेबाबत मा.उच्च न्यायालयानेही आदेश दिलेले आहेत. सबब सदर दोन्ही आदेशान्वये कार्यकारी अभियंता, स्थापत्य या पदाकरिता खालील सेवा जेष्ठ उप अभियंते श्री.दिपक सुपेकर,श्री.सुनिल वाघुंडे,श्री.केशव फुटाणे,श्री.अनिल शिंदे,श्री.रामनाथ टकले,श्री.आबासाहेब ढवळे,श्री.किशोर महाजन,श्री.राजेंद्र शिंदे,श्री.अनिल राऊत यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.बाबासाहेब उर्फ बाबा त्रिभुवन** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आज मी विशेषतः आपल्या सर्वांचे या सभागृहाचे अभिनंदन करतो. गेले पाच महिने हा विषय सतत तहकूब ठेवला गेला आहे. या विषयावर निदान चर्चा तरी होते आहे. त्यासाठी मी सभागृहाच्या वतीने आपले अभिनंदन करतो. विशेषतः या विषयाकडे लक्ष घालायचे म्हटलेतरी विशिष्ट समाजाच्या डॉक्टरसारख्या अधिका-यावर खरे पाहिलेतर जॉईनिंगपासून अगदी व्यवस्थितरित्या अन्याय केला गेला आहे. या अन्यायाला वाचा फोडायचे काम आज भारतीय जनता पार्टीच्या काळात होते आहे त्याबद्दल मला अभिमान वाटतोय. दुसरा विषय, आज डॉ.साळवे यांच्या पदोन्नतीबद्दल विषय घेतोय. १९९४ ला या अधिका-याकडे एमबीबीएस, एम.डी. ही शैक्षणिक अर्हता असूनदेखील त्यांना जाणूनबुजून या पदोन्नतीपासून डावलले गेले होते. त्यावेळचे सन्माननीयांनी षडयंत्रपूर्वक त्यांना बाजूला ठेवले होते. म्हणून आज मी या सभागृहाला विनंती करतो की, हायकोर्टाचा यात असा काही उल्लेख नाही. स्थगिती असलीतरी सन्मा.कोर्टाचा कुठेही अवमान होणार नाही. आपण निर्णय घेत नाहीतर आपण चर्चा करतोय.

**मा.महापौर** – मा.कायदा सल्लागार यांच्याशी चर्चा करु मग पुढे बोला.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ -** मा.महापौर साहेब, मा.कायदा सल्लागार यांनी खुलासा करावा.

**मा.महापौर** -मा.कायदा सल्लागार यांनी खुलासा करावा. ते जे सांगतील त्यानंतर आपण बोलू.

**मा.सतिश पवार (प्र.कायदा सल्लागार)-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, या विषयाच्या संदर्भात डॉ.रॉय यांनी मे.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.१०२७७/२०१७ दाखल केले होते. दि.२० तारखेला मे.उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे ऑर्डर केली आहे. (मा.प्र.कायदा सल्लागार यांनी ऑर्डरचे वाचन केले.) त्यानंतर कोर्टाची ऑर्डर आहे, September, 2017 till then he direct to maintain status-quo in respect of petitioner holding the charge of the post. म्हणजे डॉ.रॉय यांच्याकडे चार्ज आहे, त्यात कुठलाही बदल करु नये असे आदेश आहेत. मा.सभागृहापुढे जो विषय आहे, तो मंजूर करावा किंवा नाही याविषयी आदेश नाहीत. फक्त सबज्युडीशियरी मॅटर आहे म्हणून चर्चा करता येणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-**अजिबात कोणी बोलू नका.सर्वजण पहिले खाली बसा. आम्ही पण कायदा सल्लागार यांना सांगितले आहे. आपल्याला कायदा सल्लागार यांनी सांगितले आहे. विषय मंजूर करणे, नामंजूर करणे याविषयी स्टे नाही. फक्त आपल्याला त्यांना दिलेले अधिकार आहेत, याविषयी स्टे आहे.

**मा.मंगला कदम-**मा.महापौर साहेब, डॉ.रॉय यांची पोस्ट कोणी काढून घेऊ शकत नाही असे त्यांनी सांगितले. डॉ.रॉय त्या पदावर योग्य आहेत.

**मा.ॲड.सचिन भोसले-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार बंधू भगिनी, आत्ता जो विषय आहे. आपल्या महापालिकेचे कायदा सल्लागार यांनी इथे सांगितले आहे. हायकोर्टाने ऑर्डर केलेली आहे. परंतू ही ऑर्डर करताना जी हेडींग दिलेली आहे. त्यात कोर्टाच्या ऑर्डरमध्ये शेवटी म्हटले आहे. डॉ.रॉय जिथे असतील त्यांना तसेच ठेवा असे त्यात म्हटले आहे असे मला वाटतेय. स्टेटसको मेन्टेन करा असे म्हटलेले आहे. असे जर हायकोर्टाने म्हटलेले असेल तर आमचे एक वकीलबंधूच आहेत, - If matter is pending before the High Court, or any other Court in India, so we don't have any authority to interfere in that matter. That is the principal i would like to state. तिथे अशी ऑर्डर असताना If we are hearing on that matter before this asstembly hall. It is itself illegal that is almost contempt of court. That's why I have to say that, we should not discuss this matter.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर** – बाकीच्यांनी चर्चा करु नका. गोंधळ घालू नका.

**मा.ॲड.सचिन भोसले** – ठिक आहे मराठीत सांगतो. मा.महापौर साहेब, कुठल्याही देशात एखादा विषय, एखादा मॅटर कोर्टात प्रलंबित असेलतर त्या मॅटरसंदर्भात आपल्याला इतर दुस-या कुठल्याही कोर्टात किंवा असेंब्ली हॉलमध्ये चर्चा करता येत नाही. That will contempt of court. म्हणजे तो कोर्टाचा अवमान होईल, हे मला सांगायचे आहे. तसे इथे हिअरींग घेतलेतर ते चुकीचे ठरेल. म्हणून हा विषय इथे बोलणे सुद्धा योग्य नाही. मंजूरीचा तर विषयच येत नाही.

**मा.महापौर** – कोर्टाचा आदेश असल्यामुळे या विषयावर चर्चा करु नका. हा विषय चर्चा न करता मंजूर करण्यात येत आहे.

**मा.ॲड.सचिन भोसले** – मा.महापौर साहेब, असे म्हणता येत नाही. contempt of court होईल.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर** – उपसूचना स्विकारली का.

**मा.भिमाबाई फुगे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर** - कोर्ट मॅटर चालू आहे. तुम्ही कशाला गोंधळ घालताय. मा.कायदा सल्लागार यांना विचारूनच विषय केला आहे. त्यांनी सांगितले आहे.

**मा.ॲड.सचिन भोसले** – मा.महापौर साहेब, कायदे तज्ञ आहेत त्यांना बोलू द्या, खुलासा करायला सांगा.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** मा.आयुक्त साहेब, तुम्ही याबाबतीत खुलासा द्या. सर्वजण खाली बसा. उत्तर द्यायला सांगतोय. तुम्ही दोन अधिका-यांसाठी कशाला भांडताय. सर्वांनी खाली बसा. जागेवरुन बोला. खाली बसा. सगळ्यांनी खाली बसा. जागेवर बसा. उत्तर मिळेल.

**मा.मंगला कदम-** मा.महापौर साहेब, ही चुकीची पद्धत आहे. माईकवाल्याला सांगून ठेवलय, जो बोलेल त्याचा माईक बंद ठेवा. तुम्ही असे सांगू शकत नाही.

**मा.महापौर** – तुम्ही पहिले खाली बसा.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, खालीच बसणार होतो. तुम्ही काळजी करु नका.

**मा.महापौर** – ज्यांना बोलायचे आहे, त्यांनी हात वर करा. बाकीच्यांनी खाली बसा.

**मा.ॲड.सचिन भोसले**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आत्ता याठिकाणी पण ज्या विषयावर चर्चा करतोय. साध्या सोप्या भाषेत, स्टेटसको म्हणजे आहे ती परिस्थिती मेंटेन करा. असे कोर्टाने सांगितलेले आहे. असे जर असेलतर आपण या विषयावर चर्चा केलीतरी ती बेकायदेशीर ठरते. कंटेम्प्ट ऑफ कोर्ट होते. कोर्टाचा अवमान होतो. त्यामुळे अशा विषयावर चर्चा करणे या सभागृहाला अशोभनीय येते. त्यामुळे या सर्वांचा विचार करता, हे सभागृह म्हणून विचार करुन कायद्याचे पालन करणारी मंडळी सभागृहात आहेत. आणि आपण चर्चा केलीतरी ती सरळ सरळ बेकायदेशीर, चुकीची ठरणार आहे. म्हणून चर्चा होऊ नये. आपण कोर्टाच्या डिसिजनप्रमाणे चालणे योग्य राहील. तरीसुद्धा आपण यापुढे यावर चर्चा करणार असालतर, ऑर्डर पास करणार असालतर, किंवा निर्णय देणार असालतर मी याठिकाणी सांगतो की, तसे केलेतर या निर्णयाविरोधात मी स्वतः हायकोर्टात, शिवसेना देखील पूर्णपणे ईलिगल ॲक्शन विरुद्ध, एखादे चुकीचे काम झाले म्हणून आवाज उठवणार, योग्य त्याठिकाणी दाद मागणार आहोत.

**मा.दत्तात्रय साने**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,हा जो विषय आहे, त्या विषयाला आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने विनंती आहे. एकतर मा.आयुक्त साहेबांनी आपले मत मांडावे व दूसरे आमचा विरोध नोंदवून घ्यावा. या विषयात बोलायचे नाही. कंटेम्प्ट ऑफ कोर्ट आहे. २०१३ पासून हे प्रकरण चालू आहे. महापालिकेने मध्यस्थी करावी किंवा करु नये, हा आपला विषय नाही. किंवा हे आपले काम नाही. मा.भोसले हे वकील आहेत. पवार साहेब सुद्धा वकील आहेत. हा विषय अनेक वेळा सभागृहात आलेला आहे. तरी प्रत्येक वेळी हा विषय तहकूब केला आहे. तरी तुम्ही या विषयाला उपसूचना देऊन विषय आणताय म्हणून आम्हाला यात पडायचे नाही. आम्हाला तुमच्या पापाचे धनी व्हायचे नाही. म्हणून आमचा या विषयाला विरोध नोंदवून घ्यावा.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आत्तापर्यंत तसे सांगितले की, जवळपास दोन अडीच वर्षे हा विषय तहकूब ठेवत आलो आहात. कारण कोर्टात विषय असेलतर सभागृहात चर्चा करायची नाही. कोर्टाचा अवमान करायचा नाही. किंवा सभागृहामध्ये कुठल्याही पद्धतीने विषय कोर्टात असताना आजपर्यंत सगळ्या विषयांत हेच केलेले आहे. मग आजच काय झाले. कार्यकारी अभियंता यांची उपसूचना दिली आहे. मा.आयुक्त साहेब, तुम्हाला पदोन्नतीप्रमाणे काम करता येत नाही का. कार्यकारी अभियंता यांची नावे दिली आहेत. हे प्रशासनाचे काम आहे. प्रशासनाने आयुक्तांच्या पत्राद्वारे इथे विषय आणून देत. आमचे काहीच म्हणणे नाही. खरेतर या विषयावर चर्चाच करायची नाही. डॉ.नागकुमार व डॉ.अय्यर हे दोघेही अधिकारी कोर्टात जाताना एकाच गाडीत जाऊन बसायचे. येताना जाताना छानपैकी हॉटेलमध्ये जेवायचे आणि तुम्ही आम्ही सभागृहात हुज्जत घालायचो. ते आमच्या दृष्टीने कोण आहेत का. दोघेही अधिकारी आहेत. त्यांनी त्यांच्या परीने काम करावे. दोघेही कोर्टात गेलेले आहेत. कोर्टाने काय निकाल दिला आहे. माझ्या माहितीप्रमाणे दि.२ जुलै पर्यंत जैसे थे परिस्थिती दिलेली आहे. जैसे थे परिस्थिती दिलेली असताना, यावर काही करायचे नाही, असे सांगितले असताना आज हा विषय करायची एवढी का म्हणून हौस आहे. आणि कशासाठी, कोणाची बाजू घेण्यासाठी. आम्हाला कोणाची बाजू घ्यायची नाही. कायदा म्हणेल त्यापद्धतीने करा. जेव्हा मा.श्रीकर परदेशी असताना त्यांनी ऑर्डर केली, तेव्हापासून या दोघांचे युद्ध चालू आहे. याचा परिणाम वायसीएमवर होत चाललेला आहे. याचा कोणी विचार केलात का. वायसीएममध्ये सारखी तूतू मीमी चालू आहे. कोणत्या योजना, कोणत्या गोष्टी, कोणत्या घटना तिथे घडतात. आज कुठलीही घटना घडलीतरी आम्हाला इथून फोन करुन सांगावे लागते की सिक्युरीटी ठेवा. इतकी वाईट परिस्थिती आहे. मग तुम्ही आम्ही कशासाठी भांडतोय. पवार साहेबांनी खुलासा केला. आम्ही पवार साहेबांचा आदर करतो. पवार साहेब सिनिअर आहेत. पण पवार साहेब, तुम्ही हा विषय आणत असताना हा विषय करायचा नाही, असे क्लिअरकट सांगायला पाहीजे. आज आम्ही तुम्हाला सुद्धा असे म्हणायचे का, आम्ही तुमच्या विरोधात कोर्टात जाणार. आज तुम्ही एवढे सिनिअर असताना तुम्ही कॉर्पोरेशनच्या सगळ्यांबरोबर काम केलेत. आज आम्हालाही आनंद वाटत नाही साहेब. आज कमिशनरांना असे म्हणायचे का, कमिशनर आम्ही कोर्टात जाणार. आज तुम्ही एवढे सिनिअर असताना, तुम्ही एवढ्या महापालिकांमध्ये काम केले आहे. आम्हालाही कोर्टात जायला आनंद वाटत नाहीए साहेब. एवढी

काय हौस आहे. इतके दिवस विषय तहकूब ठेवला आहे. तसाच हा विषय तहकूब ठेवावा. मा.महापौर साहेब, जर पारदर्शक चालायचे आहेतर पारदर्शक चाला ना. तुमचे काम कुठे थांबले आहे का. दोघांकडे दोन वेगवेगळे विभाग आहेत. तुम्ही आम्ही या भानगडीत कशाला पडायचे. कमिशनर साहेब, तुम्ही इथे तुमचे वजन वापरा. व तुम्हाला दोघांना जशी डिपार्टमेंट द्यायची आहेत तशी द्या. आणि तुम्ही काम करुन घ्या. तुम्हाला काम करुन घेता येत नाही का. तुम्हाला ७३ पदे भरायची आहेत. पद भरती झाली का. काहीच नाही. आपल्याला अजून किती पदे भरायची आहेत. ते सगळे बाजूला राहीले आणि या भानगडीत पडून सभागृह खराब का करायचे. सभागृह व्यवस्थित चालावे. सभागृहात गोंधळ होऊ नये. सभागृह चांगले चालावे. सभागृहात योग्य निर्णय झाले पाहीजेत. पण मुद्दामुनच माईक बंद करणार. माईक चालूच करायचा नाही. मी सांगेल तसंच वागायचं. मा.महापौर साहेब, सगळ्यांची तोंड शिवलेली नाहीत. सगळ्यांना बोलता येतं. ओरडता येतं. सभागृहात आलेल्या प्रत्येक नगरसेवकाचा आवाज ओरडून ओरडून चांगले कंठ फुटलेले आहेत. त्यामुळे सभागृहात सगळे आलेले आहेत, त्या कोणाचाही आवाज दाबायचा प्रयत्न केलात तर तसे होत नसते. म्हणून या गोष्टी गौण आहेत. म्हणून मी कमिशनर साहेबांना सांगेन की, आता हा खुलासा केलातर याची लेखी उत्तरे आम्हाला कमिशनर साहेबांनी द्यायची आहेत. म्हणजे मग आम्ही त्या विरोधात कुणाच्या कोर्टात जायचे, कशाच्या कोर्टात जायचे आम्ही त्यापद्धतीने कोर्टात जाणार. ही चुकीची पद्धत आहे, कमिशनरांचे काम सभागृहामध्ये. म्हणजे यांना असे दाखवायचे आहे का, आम्ही यादी वाचली म्हणजे आम्ही तुमचे काम केले. कमिशनर साहेबांना पदोन्नतीप्रमाणे देता येत नाही का. कमिशनर यांच्या पत्राने विषय सभागृहामध्ये येऊ देत. आम्हाला अजिबात आरडाओरडा करण्यात इंटरेस्ट नाही. पिंपरी चिंचवड शहराचा विकास झाला पाहीजे. चांगली कामे झाली पाहीजेत. मा.महापौर साहेब, रोज उठून उठसूट सगळ्यांनी सारखे तुमच्याकडे यावे असे तुम्हाला वाटत असेल. मानदंडाला हात लावू नये असे तुम्हाला वाटत असेलतर सभागृह चांगल्या पद्धतीने चालवले पाहीजे. मा.महापौर साहेब, हे लक्षात ठेवा. सगळ्यांना चर्चा करु द्यात. चर्चेतून चांगले निष्पन्न होते.

**मा.महापौर** – सगळ्यांना चर्चा करायला दिलेली आहे. आणि सभागृह कशा पद्धतीने चालवायचे ते आम्हाला चांगले कळते. तुम्ही शिकवायची गरज नाही. सभागृह कसे चालवायचे आम्हाला चांगले कळते. एक-एक जण बोला. सगळ्याच्या सगळ्यांनी बोलायचे म्हटलेतर कसे बोलणार. तुम्हाला कुठे नाही म्हटले आहे. त्याचा अवडंब करु नका. माईकचे तुम्हाला सांगतो, जो बोलतोय त्याचा एकाचाच चालू ठेवायचा. असा नियम राहीला नाहीतर कुणीही उठेल आणि कुणीही बोलेल. हे सभागृह आहे.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, ही सभागृहाची शिस्त नाही. महापौरांनी ऐकून घ्यायचे असते. महापौरांनी ऐकायची भूमिका ठेवायची असते.

**मा.महापौर** – ठिक आहे, मी ऐकून घेतोय ना. तुम्ही इतका वेळा बोलताय मी काही बोललोय का. एक-एक बोलतय.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, तुम्ही काय बोलताय. एकच बोलतयं. म्हणजे मी बोलतेच आहे. तुम्ही कस बोलता. तुम्ही कस बोलता. तुम्ही तुमच्या महापौर पदाची ठेवा.

**मा.महापौर** – आम्ही हेच सांगतोय. मी तुम्हाला पाठिमागचं सांगतोय. तुम्ही विषयावर बोला.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, तुम्ही महापौर आहात. याच्या पुढचा शब्द मी वापरू का. तुम्ही माझ्याशी कशी चर्चा करताय. हे सभागृह आहे का. तुम्ही ऐकून घ्या. तुम्ही ऐकून घ्यायला शिकले पाहीजे. तुम्ही ऐकून घ्यायला शिकले पाहीजे. तुम्ही मागचं काय सांगताय. मी दोन दोन वर्षे या खुर्चीवर बसले आहे. बारा बारा तास हे सभागृह चालवले आहे. असे नसते. कोणताही सदस्य असू देत, महापौरांनी ऐकून घेतले पाहीजे. शहरातला कुठलाही नागरीक असू देत. जे काही बोलेल ते महापौरांनी ऐकून घेतले पाहीजे. त्या महापौराची कपॅसिटी त्यावरून कळते. कामाची कपॅसिटी कळते. त्यांनी ऐकून घेतले पाहीजे. सभागृहात कितीही वाजू देत, कितीही चर्चा होऊ देत, तरीही त्यांनी ऐकून घेतले पाहीजे. विषय वाचला, कोणी बोलले की लगेच विषय मंजूर. आम्हाला बोलायचे होते. आम्ही तिघी जणींनी हात वर केला होता. खुलासा करा म्हटले त्याच्याआधी सुद्धा आम्ही हात वर केले होते. तुम्हाला दिसत नाही का. असे चालत नाही. कायदा सल्लागार, कमिशनर मला इथे रितसर खुलासा पाहीजे. सभागृहात आमचे या विषयावर मतदान घ्यायचे. तुम्ही मतदान घेतले पाहीजे. नाही असे काही होत नाही. मनानेच इथे उठसूट मंजूर. मग तुम्हीच सभा चालवा. विषय वाचायचा. नुसतेच मंजूर म्हणायचे. आम्हाला कशाला बोलवता मग. आजपर्यंत तुम्ही सभागृहात बघितले आहे. सभागृह किती तास चालते. महापौर असे बोलतात का कधी. आम्ही बोलत असताना उठून कसे बोलत असतील. अजिबात नाही. कमिशनर साहेब असू देत, पवार साहेब असू देत खुलासा झाला पाहीजे. आम्हाला कोर्टाचा अवमान करायची नाही. ज्यांना करायचा आहे त्यांची नावे घालायची. मतदान घ्यायचे. त्याशिवाय आम्ही सभागृह चालू देणार नाही. मा.महापौर साहेब, आत्ताच सांगतेय. आम्ही चाललो.

**मा.महापौर** – मा.आयुक्त साहेब, आपण विषयाचा खुलासा करावा.

**मा.महापालिका आयुक्त** – मा.महापौर साहेब,सन्मा.सभागृह,सदर प्रकरणात राज्य शासनाच्या सूचनेनुसार डीपीसी कंडक्ट करण्यात आली होती. डीपीसी केल्यानंतर सभागृहासमोर रितसर विषय आणला होता. त्यानंतर सन्मा.उच्च न्यायालयासमोर वादी म्हणून डॉ.रॉय गेल्यामुळे ही केस आहे, त्या अनुषंगाने मला खुलासा करण्याबाबत सांगण्यात आले आहे. याबाबतीमध्ये आमचे कायद्याचे वरिष्ठ सल्लागार हे प्रकरण हाताळणारे आहेत, यांच्याकडून यासंदर्भात ओपिनियन घेतले होते. त्याचे वाचन मी आपल्यासमोर करतोय. ते इंग्लिशमध्ये आहे त्याचे मराठीत ट्रान्सलेशन करुन मी सांगेन.

Sir, I have carefully read the the petition & order dt.20/09/2017 passed therein by High Court which are as follows.

मे.उच्च न्यायालयाने दि.20/09/2017 रोजी जे आदेश पारीत केलेले आहेत. त्याचे मी पठण केले आहे. ते पुढीलप्रमाणे आहे. पिटीशनर यांनी ज्या मागण्या निवेदनात केल्या होत्या त्या पुढीलप्रमाणे आहेत.

Prayers in Petition :

(a) Rule be issued and record and proceedings be called for;

(b) This Hon'ble Court may be pleased to issue ma writ of certiorari or a writ in the nature of a writ of certiorari or any other appropriate writ, order or direction calling for the papers and proceedings in relation entire matter and upon perusing the same, this Hon'ble Court may be pleased to quash and set aside the Impugned Letter/Order/Communication dt.14th March 2017 issued by Respondent No.1;

दि.14 मार्च 2017 रोजी प्रतिवादी क्र.1 ने दिलेले आदेश रद्द करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

(c) that this Hon'ble Court may be pleased to issue a writ of mandamus or a writ in the nature of a writ of mandamus or any other appropriate writ, order or direction directing the Respondent No.1 and/or its officers to withdraw and cancel the Impugned Letter/Order Communication dt. 14th March 2017;

पुन्हा नवीन हुकूम टाकून दि.14 मार्च 2017 रोजी शासनाने जे आदेश दिलेले आहेत, ते रद्द करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

(d) this Hon'ble Court may be pleased to quash and set aside the Impugned Letter/Order/Communication dt.28th July 2017 issued by Respondent No.3;

दि.28 जुलै 2017 रोजी रिस्पॉणडंट नं.3 ने दिलेले पत्र रद्द करण्याची मागणी केलेली आहे.

(e) Hon'ble Court may be pleased to quash and set aside the Impugned Letter/Order/Communication dt.8th September 2017 issued by Law Committee of the Respondent No.2;

मा.विधी समितीचे रिझोल्यूशन 2017-8-सप्टेंबर चे जे आहे, ते देखील रद्द करण्याची मागणी केलेली आहे.

(f) Pending the hearing and final disposal of the present Writ Petition this Hon'ble Court be pleased to restrain the Respondent No's 1 to 3 from acting upon the Impugned Letter/Order/Communication dt. 14th March, 2017 issued by Respondent No.1, Letter/Order/Communication dt. 28th July, 2017 issued by Respondent No.3 and recommendation dt. 8th September, 2017 issued by Law Committee of Respondent No.2 be kindly stayed;

शासनाचे आदेश, मनपाच्या आयुक्तांकडून पाठवलेले प्रस्ताव आणि विधी समितीने मंजूर केलेला प्रस्ताव, या तिन्हींची अंमलबजावणी न करण्याची देखील विनंती केलेली आहे.

(g) Pending the hearing and final disposal of the present Writ Petition this Hon'ble Court be pleased to direct the Respondent No.1 to not take any coercive steps on the basis and furtherance of impugned Letter/Order/Communication dt.14th March, 2017 issued by Respondent No.1, Letter/Order/Communication dt. 28th July, 2017 issued by Respondent No.3 and recommendation dt. 8th September, 2017 issued by Law Committee of Respondent No.2;

कुठल्याही प्रकारचे कोर्सीव्ह स्टेपस् म्हणजे अवरोधी किंवा विरोधी प्रकारचे कुठल्याही प्रकारचे निर्देश किंवा आदेश रिस्पॉण्डंट नं.1,2,3 यांनी कुणीही कम्युनिकेशन केलेले आहे. यासंदर्भात वादीच्या विरुद्ध करु नयेत असे निर्देश द्यावेत अशी मागणी केलेली आहे.

(h) Ad-interim and Interim relief in terms of prayer clause (f) and (g) above be granted;

मघाशी वाचलेले फ व ग या प्रकरणामध्ये त्यांनी इंटरीम रिलिफ म्हणून मागितलेले आहेत.

(i) Costs for the Petition be provided for;

(j) Pass such further and other reliefs as the nature and circumstances of the case may be required.

Order of Court dated 20.9.2017 :-

अशा स्वरुपाची मागणी वादीने केल्यानंतर मे.उच्च न्यायालयाने दि.20/9/2017 तारखेला पुढीलप्रमाणे इंटरीम आदेश दिलेले आहेत.

1. After hearing the matter, the following issue would emerge from the submissions advanced by the parties.

` पुढील इश्युज,विषयाचे मुद्दे पुढे येत आहेत, असे मे.कोर्टाने म्हटलेले आहे.

(a) Whether there are any provisions determining qualification for the promotional post?

प्रमोशन देण्याच्या पदासाठी काही क्वालिफिकेशन्स आहेत का. याच्यासाठी काही किमान अर्हता असतात का असा प्रश्न कोर्टासमोर उद्भवलेला आहे.

2. The learned Counsel appearing for the Petitioner seeks accommodation. Both the contesting respondents to take instructions.

वादीतर्फे जे वकील होते, त्यांच्याकडून एक मागणी करण्यात आली होती की, रिस्पॉण्डंट यांनी आपापल्या अशिलाकडून याबाबतीत माहिती घ्यावी.

3) The Counsel appearing for the Petitioner submits that the Petitioner is already holding the charge of the post.

वादीतर्फे जे वकील उपस्थित होते, त्यांनी सांगितलेले आहे की, वादी हे ऑलरेडी एमओएच या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्याकडे त्या पदाचा सध्याचा पदभार आहे.

4) Stand over to 25th September, 2017. Till then, we direct to maintain status-quo in respect of the petitioners holding the charge of the post.

दि.25 सप्टेंबर 2017 पर्यंत सन्मा.उच्च न्यायालयाने असे निर्देश दिलेले आहेत की, तुम्ही जैसे थे स्थिती ठेवावी. वादीने तो पदाचा पदभार हाताळत असल्याचे बाबतीमध्ये जैसे थे परिस्थिती ठेवण्याबाबतचे निर्देश उच्च न्यायालयाने दिलेले आहेत.

5) All the issues on merits are kept open.

इतर सगळ्या बाबी त्याबाबतीत खुल्या ठेवलेल्या आहेत.

यापुढील जो भाग आहे तो ओपिनियनचा भाग आहे :-

This Petition is filed by the Petitioner claiming that he has right to be promoted to the post of Medical Officer of Health.

वादीने जे पिटीशन दाखल केले आहे ते स्वतःला अधिकार असल्याबाबतचे पिटीशन कोर्टात दाखल केले असल्याचे म्हटले आहे.

I am given to understand by Shri Satish Pawar, the Legal Adviser that Law Committee has passed resolution recommending Respondent No.4 Dr.Salve on the Post of Medical Officer of Health and subject is now before the General Body of Respondent Corporation for further consideration. Petitioner is already holding the charge of the post. The High Court has framed an issue involved in the Petition as follows :-

"(a) Whether there are any provisions determining qualification for the promotional post?"

अशी बाब त्यांचे निदर्शनास आणली होती की, विधी समिती मार्फत प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर आलेला आहे. अधिका-यांना पदोन्नती देण्याचा प्रस्ताव आहे. डॉ.पवन साळवे यांना पदोन्नती देण्याचा प्रस्ताव आलेला आहे. वादी म्हणजे डॉ.रॉय हे ऑलरेडी पद सांभाळत आहेत. त्यांच्याकडे पदाचा पदभार आहे. ही जी पूर्ण प्रक्रिया आहे. त्यात काय मुद्दे आहेत, इश्यु आहेत त्याचा खुलासा कोर्टाने केलेला आहे. आणि तो मुद्दा पुनःश्च कोट केलेला आहे. याचे यापूर्वी वाचन केलेले आहे.

I am informed by Shri Satish Pawar that such provisions determining qualifications duly sanctioned are very much in force and persons in the Zone of consideration will be considered in the light of the said provisions by the general body. Even the resolution of Law Committee, I am informed, is considered in the light of the said provisions.

श्री.सतिश पवार यांनी त्यांच्या निदर्शनास आणलेले आहे, म्हणजे आपल्याकडील मत सिनिअर कौन्सिल यांच्यासमोर दिले आहे की, आपल्याकडे सर्वसाधारण सभा प्रमोशनचा विषय

विचारात घेत असते, त्यावेळी सर्वसाधारण सभेसमोर क्वालिफिकेशन किंवा जी अर्हता आहे ती आणली जाते. आणि अर्हतेच्या माध्यमातूनच पदभार देण्यासाठी, प्रमोशन देण्यासाठी झोन ऑफ कन्सिडरेशनमध्ये जे अधिकारी येतात, त्यांची अर्हता तपासूनच सर्वसाधारण सभा निर्णय घेत असते. मा.विधी समितीने देखील निर्णय घेत असताना या क्वालिफिकेशन क्रायटेरीयाचा आधार घेऊनच त्याप्रमाणे निर्णय घेतला आहे.

Hon'ble High Court has passed an order on 20/9/2017 directing to maintain status-quo in respect of petitioner's holding the charge of the post.

पुन्हा त्यांनी म्हटलेले आहे की, सन्मा.उच्च न्यायालयाचे दि.20/9/2017 चे आदेश आहेत, ते वादीने पदभार सांभाळण्याबाबतचे, परिस्थिती जैसे थे ठेवण्याबाबतचे आहेत.

Apparently the order of Hon'ble High Court does not seem to prevent General Body from considering the subject of promotion to the post of Medical Officer of Health during the pendency of the Petition.

प्रथमतः सकृतदर्शनी असे दिसतेय की, सन्मा.उच्च न्यायालयाने सर्वसाधारण सभेला हा विषय विचारात घेऊ नये किंवा घ्यावा याबाबत कुठलेही निर्देश दिलेले नाहीत. ते केवळ त्यांचे पदभार आहे त्या स्थितीत ठेवण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत.

Resolution which may be passed by General Body either in favour of the Petitioner or respondent No.4, will not be a final order of promotion as the post is one to which provisions of Sec. 45 of Maharashtra Municipal Corporations Act apply and sanction of Government for the promotion of the suitable candidate selected by the General Body on merits of the Candidate is a must.

याचा अर्थ असा आहे की, हे जे रिझोल्युशन असणार आहे ते अंतिम नसणार आहे. ज्यांनी हे रिझोल्युशन घेतले गेले ते आयदर लॉयरच्याबाबतीत किंवा प्रतिवादी क्र.4 म्हणजे डॉ.साळवेंच्या बाबतीमध्ये जे काही रिझोल्युशन होईल ते अंतिम राहणार नाही. सेक्शन 45चं पद असल्यामुळे आधी शासनाचे आदेश घ्यावे लागतील. आणि शासनाचे आदेश येईपर्यंत त्यामध्ये प्रमोशन फायनल होणार नाही. आणि ते अंतिम होण्याची आवश्यकता आहे.

However, any such resolution of General Body will be subject to the final decision of Hon'ble High Court, even if the resolution does not say so.

तथापि, सर्वसाधारण सभेने रिझोल्यूशन घेतले, आणि त्यांनी एखादा निर्णय घेतला, तरीसुद्धा जरी त्या रिझोल्यूशनमध्ये म्हटलेले नसेल की, आम्ही मे.उच्च न्यायालयाच्या अधिन राहून हा निर्णय घेतो आहोत. तरीसुद्धा मे.उच्च न्यायालयाचे आदेश या अंतिम निर्णयावरती बंधनकारक राहतील. याचा तत्वतः अर्थ असा आहे की, जरी जनरल बॉडीने रिझोल्यूशन घेतले, जरी मा.महापालिका सभेने निर्णय घेतला तरी, त्यांचा पदभार काढून घेतला किंवा त्यात हस्तक्षेप केला असे होणार नाही. कारण आदेश स्पष्ट आहेत. डॉ.रॉय यांच्याकडे जो पदभार आहे. त्याला मे.उच्च न्यायालयाचा स्थगिती आदेश असल्यामुळे त्याला हात लावता येणार नाही. प्रक्रिया इथेच पूर्ण होत नसून प्रक्रिया याच्या पुढे जाणार आहे. जरी आज रिझोल्यूशन

घेतले गेलेतरी पुढील निर्णयार्थ ते सेक्शन 45 चे पद असल्यामुळे ते शासनाकडे जाणार आहे. आदेश आल्यानंतर मे.उच्च न्यायालयाची स्थगिती उठली तरच त्यांचा पदभार काढून घेतला जाणार आहे किंवा नाही. अशा स्वरुपाचे मे.उच्च न्यायालयाचे विधितज्ञ यांच्याकडून ओपिनियन प्राप्त झालेले आहे. माझे वैयक्तिक मत असे आहे की, मे.उच्च न्यायालयात एखादी बाब प्रलंबित असताना त्यावर चर्चा करणे उचित होणार नाही. तथापि, सभागृहाने याबाबतीत योग्य तो निर्णय घ्यावा.

**मा.सिमा सावळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, मा.आयुक्त साहेब तुम्ही आमच्यात भांडणं लावून दिलीत. हायकोर्टाचे इतके क्लिअर निर्देश असताना सुद्धा तुम्ही हे करायला नाही पाहीजे होते. जर तुम्ही डीपीसी लावली होती. तर डीपीसीमध्ये प्रमोशन असे द्यायचे, काय द्यायचे, कुठं द्यायचं, कोणाला द्यायचे याचा पूर्ण आकृतिबंध तयार आहे. आणी मला दूसरे म्हणायचे आहे की, डॉ.रॉय व डॉ.साळवे हे दोघे एकच अर्हता धारण करतात. मग एकच पद दोघांमध्ये डिव्हाईड करा. याच्यावर किती दिवस खेळायचे. जे तुमच्या हातात आहे, प्रशासनाच्या हातात आहे. मग त्यासाठी आमच्याकडे का आलात. आम्ही रिझोल्यूशन पास करु. आम्ही पास केलेतरी नालायक ठरतो आणि नाही केलेतरी नालायक ठरतो. मा.पवार साहेब मघाशी बोलताना तुम्ही सुद्धा स्पष्टपणे अभिप्राय द्यायला पाहीजे होता. आत्ता तसे कमिशनर यांनी सांगितले. म्हणजे रिझोल्यूशन पास केलंतरी त्याचे इम्पलिमेंटेशन करणे बंधनकारक नाही. करतो तर हायकोर्टाचा कंटेम्प्ट ठरतो. मग यातून आम्ही काय मिळवले. तुमच्या अखत्यारीतले जे विषय आहेत, ते तुमच्यापर्यंतच ठेवा. ते विषय आमच्याकडे पाठवू नका. कारण नसताना आमची बेअब्रू करु नका. तुम्ही सांगा, काय करायचे. विषय पास केलातरी पदभार देणार नाही. त्यांचे सेटींग झाले नाही, त्यांना भेटले नाही, त्याला काही दिले नाही म्हणून पदोन्नती दिली नाही. मग यातून मिळवले काय. मा.पवार साहेब, तुम्ही महापालिकेचे सिनिअर कौन्सिलर आहात. तुम्हाला माहित नाही कोर्ट काय म्हणते. ज्याला त्याला वैयक्तिक सल्ला द्यायला बसलात. तुम्ही रिटायरमेंटला आलात. मा.महापौर साहेब, तुम्ही विषय मंजूर केला आहे. विरोधी पक्षाने मागणी केली आहे की, तुम्ही मतदान घ्या. मतदान करुन सुद्धा काही उपयोग नाही. त्यांनी स्पष्ट सांगितले आहे. यावर तुम्हाला माहित होते. याउपर विषय चर्चेला घेतला. त्याउपर आम्हाला उपसूचना द्यायला लावलीत. असे करायला नाही पाहीजे होते. स्पष्ट सांगायला पाहीजे होते, करता येणार नाही. विषय पास करायचा नाही. चर्चा सुद्धा करायची नाही. विषय पास केला नाही केलातरी काही फरकच पड़णार नाही. तर मग आम्ही अजून सहा महिने विषय तहकूब केला असता किंवा दप्तरी दाखल केला असता. यातून काय साधले. मा.पवार साहेबांनी एक स्पष्टिकरण दिले. कमिशनर साहेबांनी दूसरे स्पष्टिकरण दिले, हा सभागृहाचा निर्णय आहे. सभागृह कोर्टापेक्षा मोठे आहे का. सिनिअर कौन्सिलर व कोर्ट यात फरक आहे. मा.पवार साहेब तुम्ही स्पष्टपणे जे कोर्टाने सांगितले आहे ते सांगायला पाहीजे होते. तुमचा सिनिअर कौन्सिलर तुमच्याशी काय बोलला याच्याशी कोर्टाला काही देणेघेणे नाही. तुम्ही खरे का बोलला नाहीत. खोटे करुन सभागृहाला फसवता. तुम्ही खोटे बोललात. मा.महापौर साहेब माझी आपल्याला विनंती आहे की, हा वाद कुठेतरी थांबवायला लागेल. दोघेही एकच अर्हता धारण करतात. प्रमोशन द्यायचे असेलतर दोघांनाही डिव्हाईड करुन

द्या. कोणीही कोर्टात जाणार नाही असे दोघांकडून लिहून घ्या. तुम्हाला असा सुवर्णमध्य काढता आलातर मला वाटतेय की, हे सगळ्यात संयुक्तिक ठरेल. कारण यांच्या भांडणामध्ये आपण बरवटून उपयोग नाही. गेले दहा वर्षे झाली, डॉ.अय्यर, डॉ.नागकुमार यांचा या सभागृहात तमाशा पाहिला. दोघांना डिव्हाईड करुन देऊ शकत असालतर यात वायसीएम वेगळे करा आणि बाकीचे हॉस्पिटल्स् वेगळे करा आणि दोघांनाही पदभार देता येत असेलतर मला वाटतेय, ते सगळ्यांसाठी चांगले होईल आणि कामही करता येईल. सगळ्यांनी काम करायचे सोडायचे आणि यांच्या पदोन्नतीच्या मागे लागायचे. मला हे मिळालं का मला ते मिळालं का. अरे काय उपयोग एवढी नोकरी करुन. एक बाहेर येतच नाही आणि दुसरा टेबलवर कधी सापडतच नाही. करायचे काय आम्ही. डॉ.साळवे कधी बाहेर येत नाहीत. त्यांना काहीही विचारा, मला नाही माहित, मी कसे सांगू, मी कसे बोलू. अरे, पद पाहीजे ना. मागील वेळी त्यांना सांगितले होते, पद पाहीजे ना, मग स्वतःमध्ये तेवढी कामाची कपॅसिटी आणा. डॉ.रॉय सापडणार नाही आणि डॉ.साळवे काम करत नाहीत. दोघांनाही टार्गेटबेस काम द्या. इथून पुढे जे-जे कर्मचारी हायकोर्टाचे दार ठोठवत असतील इथून पुढे त्यांना प्रमोशन देऊ नका. जा कुठे जायचे तिथे. हा काय प्रकार आहे. यात इंटरफेअर करायचे हे आमचे काम आहे का. जर कोर्टाचे स्पष्ट आदेश असतीलतर तेवढी स्पष्टता तिथे आपल्या वागण्यात सुद्धा पाहीजे आहे. ती आपण ठेवली नाही. तुम्ही काय केले साहेब. तुम्हाला प्रशासनाला कुणाचा वाईटपणा घ्यायचा नव्हता. म्हणून आमच्या कोर्टात बॉल टाकला. झाला नालायक तर तुम्हीच नालायक व्हाल. आता यांनी विरोध केला कारण आमच्या बाजूने निर्णय घेतला नाही. आम्ही तुम्हाला डोक्यात पण ठेवणार आणि डोळ्यावर पण धरणार कारण तुम्ही आमच्या बाजूने निर्णय घेतला नाही. पण तुम्हाला काही फरक पडणार नाही. तुम्हाला काय फरक पडणार आहे. कारण निर्णय घेतला नाहीतर तुम्ही सांगणार हायकोर्टाला बांधिल होतो. आणि निर्णय घेतला तर कंटेम्प्ट कसा करु. निर्णय घेतला नाही म्हणून अंमलबजावणी केली नाही. मा.आयुक्त साहेब, अशाप्रकारे दुटप्पीपणे काम चालणार नाही. एक पद दोघांमध्ये डिव्हाईड करता येत असेलतर मला वाटतेय की, या सभागृहामध्ये कोणाचाही विरोध राहणार नाही. आणि दोघांकडूनसुद्धा काम करुन घ्या. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करते की, आपण विषय पास केला आहे. तरीसुद्धा कोर्टाचा कुठेही अवमान होणार नाही याची दक्षता घेणे महापौर म्हणून तुमचे सुद्धा काम आहे. सभागृहाचे, याठिकाणी बसलेल्या प्रत्येक नगरसेवकाचे सुद्धा काम आहे. कारण ज्या साळवेंसाठी इथे तो वेगळ्या समाजाचा आहे म्हणून घसा फोडून भांडत असूतर त्याच समाजातले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाचा सुद्धा अपमान आपण याठिकाणी करतोय हे सुद्धा विसरू नका. त्यामुळे ते कोणत्या समाजाचे आहेत याच्याशी मला देणेघेणे नाही. मला याच्याशीच देणेघेणे आहे की ते काम करतात का नाही करत. जो काम करत नसेल तर त्याला लाथा मारून हाकला. ज्या संविधानाने कायदे व कोर्ट चालतात, त्या संविधानाचा अपमान होणार नाही, ते संविधान कुठे पायदळी तुडवले जाणार नाही याची मा.महापौर साहेब आपण पुरेपूर दक्षता घ्यावी. आपले काहीही म्हणणे असलेतरी मा.महापौर साहेब, प्रशासनाने आज आपल्यावर एकदा नाहीतर दोनदा बाण रोखलेला आहे. आपल्याला घायाळ पण केले आहे आणि औषध लावायचे पण नाटक करत आहे. त्यामुळे मा.महापौर साहेब, कुठल्याही परिस्थितीत हायकोर्टाचा अवमान होणार नाही एवढे एक तत्व पाळा. धन्यवाद.

**मा.राहूल कलाटे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, डॉ.साळवे चांगले का डॉ.रॉय चांगले याच्यापेक्षा सभागृहातील नगरसेवकांना ते काय काम करतात आणि किती चांगले काम करतात हे प्रत्येकाला माहिती आहे. मा.आयुक्त साहेबांनी आणि मा.पवार साहेबांनी ओपिनियन सांगितले आहे. मा.आयुक्त साहेब तुम्ही विषय मंजूर करणार का मागे घेणार याची आम्हाला गॅरंटी द्या. आणि जर तुम्ही विषय मंजूर केलाततर शिवसेना म्हणून आम्ही तटस्थ राहणार. आत्ता मा.सिमाताई सावळे यांनी सांगितले की, कुठेतरी दुटप्पी भूमिका घ्यायचे सोडले पाहीजे. प्रशासनाला कुठेतरी थांबावे लागेल. आयुक्त साहेबांनी सिनिअर कौन्सिलरचे मत वाचून दाखवले. सिनिअर कौन्सिलरचे मत म्हणजे कोर्टाचे मत नाही. बरोबर आहे ना पवार साहेब. पुढे काय होईल काय नाही हे कोर्ट ठरवेल. ज्याप्रमाणे सर्वांनी सांगितले, दोघांना पद द्या. काहीही करा. दोघांना टेम्परारी चार्ज द्या. तरी आमची काही हरकत नाही. परंतू काम करत असताना जो पारदर्शीपणा दाखवायचा तो दाखवा. उद्या महापौर साहेबांनी सांगितले की त्यांच्यासारखे ओपिनियन. उद्या एखाद्या आमदाराने सांगितले की त्याच्यासारखे ओपिनियन. कुठेतरी आम्हाला या अनुभवातून मोकळे करा. हा ठराव मंजूर करायचा असेलतर शिवसेना या ठरावापासून तटस्थ आहोत. कोर्ट कोणाच्या बाजूने असो, डॉ.रॉय यांच्या बाजूने असो, डॉ.साळवे यांच्या बाजूने असो, आम्ही तटस्थ आहोत. हॉस्पिटल्स् भरपूर आहेत, नवीन भरपूर कामे काढलेली आहेत. आम्हाला नगरसेवकांना कुठेतरी चुकीचे काम करायला भरीस पाडू नका. कारण सगळेच इथे तज्ञ नाहीत. काही ॲडव्होकेट आहेत. भविष्यात पुढे जाऊन डॉ. रॉय बसतील किंवा डॉ.साळवे बसतील, परत ते कोर्टात जातील. परंतू माझे प्रशासनाला एकच सांगणे आहे की, तुम्ही दुटप्पीपणाची भूमिका घ्यायचे सोडून द्या. खेळवत बसू नका. हा आला की याच्यासारखे, तो आला की त्याच्यासारखे. तुम्ही चांगले अधिकारी आहात. महाराष्ट्रात तुमचे नाव आहे. आपण सगळे बैल झालो आहोत आणि आपली कात्री यांच्या हातात आहे. म्हणून मा.महापौर साहेब, तुम्ही काय निर्णय घेणार आहात ते आम्हाला कळू देत. तशी आम्हाला भूमिका घेता येईल.

**मा.महापौर** – आपण कोर्टाच्या अधिन राहून निर्णय घेतलेला आहे. कोर्ट व प्रशासन योग्य निर्णय घेतील. त्यांनी योग्य निर्णय घ्यावा. विषयाला मंजूरी दिली आहे. आपण प्रशासनाला सांगू की कायद्याच्या अधिन राहून त्यांनी करावे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.दत्तात्रय साने** – मा.महापौर साहेब, मनसे आणि राष्ट्रवादी या विषयापासून अलिप्त आहेत.

**मा.महापौर** – विषय मंजूर करताना कमीत कमी चार सदस्यांनी उठून म्हणायला पाहीजे होते. हा कायद्याप्रमाणे मंजूर झालेला विषय आहे. आपण प्रशासनाला सांगितले आहे. ते त्यावर कायदेशीर ते करतील.

(सभागृहात गोंधळ)

**मा.राहूल कलाटे** – मा.महापौर साहेब, तुम्ही नगरसचिवांना विचारा.

**मा.दत्तात्रय साने** – मा.महापौर साहेब, तटस्थ असा शब्द वापरा. आम्ही तिघे तटस्थ आहोत.

**मा.महापौर** – ठिक आहे काका तुम्ही तटस्थ रहा. आम्ही मघाशी निर्णय दिला आहे. तुम्ही तटस्थ राहून हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.राहूल कलाटे**-मा.महापौर साहेब,तुम्ही घ्यायचेच ठरवले असेलतर. मागील वेळी मा.नगरसचिव साहेब तुम्ही काय म्हणाला होता. सभा तहकूब झाल्यानंतर तुम्हाला निर्णय बदलता येत नाही. सभा कुठे तहकूब झाली आहे.

**मा.सचिन चिखले** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार बंधू, खरेतर हे कंटेम्प्ट ऑफ कोर्ट आहे. या विषयावर कोणीही चर्चा करायला नव्हती पाहीजे. मा.महापौर साहेब, तुम्ही माझे महापौर आहात. माझ्या शहराचे महापौर आहात. उद्या हा विषय सर्व पत्रकांत, न्यूज चॅनेलला प्रसारीत केला जाईल. सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे उद्या हा विषय सर्व वर्तमानपत्रांत त्याचप्रमाणे न्यूज चॅनेलमध्ये येणार. त्यात असे होईल की ज्या विषयावर कंटेम्प्ट ऑफ कोर्ट होता, त्या विषयावर सभागृहामध्ये चर्चा केली जाते. म्हणजे बाहेरची लोक असं समजतील. मा.महापौर साहेब तुमचे नाव खराब झालेतर आमचे शहराचे नाव खराब होते आहे. या विषयावर तुम्ही योग्य तो निर्णय घ्यावा. विषय जैसे थे ठेवून, कोर्टाचा जो निर्णय येईल. कोर्टात केस चालू आहे. तारखा पडत आहेत. जो निर्णय येईल त्या निर्णयाला सर्वजण बांधील राहून येणा-या दिवसांत निर्णय घेऊ असे बोलतो व थांबतो. हा विषय मागे घ्यावा अशी नम्र विनंती करतो. धन्यवाद.

**मा.मंगला कदम**– मा.महापौर साहेब, तुम्ही विषय मंजूर म्हटल्यानंतर सुद्धा तुमच्या तत्वामध्ये बसत नसताना सुद्धा तुम्ही चर्चा केलीच आहे. कमिशनर यांनी खुलासा केल्यानंतर मला स्वतःला कोर्टाचा अवमान करायचा नाही. सभागृहात जे सदस्य आहेत त्यांना कोर्टाचा अवमान करायचा नाही. आम्हाला या विषयावर चर्चाच करायची नाही. कमिशनर यांनी खुलासा केला की, या विषयावर चर्चा करता येणार नाही. आम्ही याच गोष्टीवर फर्म आहोत. तुम्हाला विषय मंजूर करायचा असेलतर मला वाटते की, ज्यांचा ज्यांचा विरोध आहे, त्यांची नावे नोंदवून घ्या. म्हणजे आम्हाला कोर्टात सादर करता येईल की, यांचा यांचा या विषयाला विरोध होता. विषय कोर्टात असताना, कमिशनरांनी सुद्धा खुलासा केला की, या विषयावर चर्चा करु नका. तरीसुद्धा विषय केला किंवा मंजूर केला. आम्हाला कोर्टात जायचे आहे. आमचा विरोध नोंदवून घ्या. तरच पुढील विषय घ्या.

**मा.महापौर** – प्रत्येकजण म्हणतोय आम्हाला बोलायचे नाही. आणि प्रत्येकजण बोलतोय.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, नाही आम्हाला बोलायचे नाही. आम्हाला बोलायचेच नाही.

**मा.एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, खरेतर महापौर साहेबांनी शेवटचे वाक्य खूप चांगले बोलले आहे. कोर्ट ऑफ कंटेम्प्ट होते आहे परंतू चर्चा तर करताय. तुम्ही दोन चार वेळा बोललात. मला एकदा बोलू द्या. मा.सिमाताई सावळे यांनी खूप चांगले सांगितले. मी त्यांचे अभिनंदन करतो. खरेतर एखाद्या अधिका-यासाठी आपण सभागृहामध्ये एकमेकांच्या अंगावर, एकमेकांचे दुश्मन आहोत का अशी परिस्थिती आली आहे. मला कल्पना आहे की, आज वायसीएमची जी परिस्थिती आहे. आपले सगळ्यांचे ध्येय आहे. आपल्याला महापालिकेच्या सभागृहात पिंपरी चिंचवडमधील नागरीकांची सेवा करण्यासाठी पाठवले आहे. कुठल्या अधिका-याची सेवा करण्यासाठी नाही. महापालिकेच्या सभागृहात यासाठी पाठवलेले नाही. खरेतर ताईंचे सजेशन आहे. गेल्या २०१४ पासूनच हा विषय प्रलंबित आहे. महापालिकेच्या सभागृहात हा विषय वारंवार येतो आहे. हा विषय एखाद्या सदस्याचा ठराव नाही. हा प्रशासनाने आपल्याकडे आणलेला विषय आहे. प्रशासन एखादी गोष्ट आणतो, त्यात चांगले,वाईट, चुकिचे, बरोबर, गरजेचे आहे का नाही आहे. डिपीसी असेल, वेगवेगळ्या गोष्टी असतील. मला वाटते की, शहरातील सर्व सन्माननीयांनी एकच विचार केला पाहीजे की, या शहराचे आरोग्य सुधारले पाहीजे. ताई, मी तुमच्या मताशी शंभर टक्के सहमत आहे. या शहरात अनेक मोठी हॉस्पिटल्स आहेत, मोठे वायसीएम आहे, अनेक चांगली हॉस्पिटल्स आहेत आपल्या सगळ्यांच्या प्रयत्नांमुळे आपण पुढील काळात पी.जी. इन्स्टिट्युट आणतोय. पी.जी. इन्स्टिट्युट आल्यानंतर डॉक्टरांची संख्या ब-यापैकी हॉस्पिटलमध्ये आली तर निश्चितच शहरातील लोकांचे आरोग्य चांगले ठेवायला मदत होणार आहे. कोर्ट ऑफ कंटेम्प्ट, खरेतर कायदे सल्लागार यांनी सांगितलेय, आयुक्तांनी सांगितलेय. कायद्यातली पळवाट, या सगळ्या गोष्टी बाजूला करु यात. मा.आयुक्त साहेब, आपण एक महत्वाचा निर्णय घेतला पाहीजे. या दोन्ही अधिका-यांना एकत्रित बोलवा. त्यांना कामे वाटून द्या. तुम्ही या सभागृहात ठराव करा. अधिकारी जर आपल्या कामात कामचुकारपणा करत असेलतर त्याचा राजिनामा घ्या. परंतू सभागृहाला वेठीस धरु नका. मला कोणाहीबद्दल बोलायचे नाही. कोण कुठला अधिकारी जवळचा आहे. कोण कुणाचा नातेवाईक आहे. कुण्याच्या नात्याशी, कुण्याच्या जातीशी मला काही कर्तव्य नाही. पण मनातून एक ठरवले पाहीजे. सगळ्यांच्या मनात एक गोष्ट निश्चित असली पाहीजे की, या शहरातले आरोग्य सुधारण्यासाठी एक अधिकारी कमी पडत असेलतर दुस-याने त्याच्या जोडीला काम करावे. बैल गाडीला दोन चाके असतात तरच बैलगाडी चालते हे लक्षात ठेवा. मला वाटतेय की, या माध्यमातून आपण दोन्ही अधिका-यांना काम डिव्हाईड करुन दिलेतर शहराचे आरोग्य व्यवस्थित चांगले होऊ शकते. मा.महापौर साहेब, याठिकाणी निर्णय केलेला आहे. आपण विषय मंजूर केला आहे. मा.राहूल कलाटे यांची पार्टी खरेतर तटस्थ आहे. मा.दत्तात्रय साने तुमचा या विषयाला विरोध असेल. कोर्टाच्या निर्णयाचा अवमान भारतीय जनता पार्टीचा कोणताही सदस्य करत नाही. कोर्टाच्या निर्णयाला अबाधित राहून या संदर्भामध्ये खरेतर या विषयावर चर्चाच करायची नव्हती. कोर्टाचा विषय होत नाही, तोपर्यंत

कोणाला अधिकार द्यायचे हा विषय आपला नाही. मला असे वाटतेय की, या विषयावर अधिक चर्चा न करता, सभागृहाचा अधिक वेळ न घेता, तुमच्या सगळ्यांच्या भावना समजलेल्या आहेत की कोणाला काय म्हणायचे आहे. तुमच्या पार्टीची भूमिका काय आहे, यावर अधिक वेळ न घेता मा.महापौर साहेब पुढील विषय घ्यावा.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर** – मघाशीच सांगितले होते, मा.दत्ता काका तुमचा विरोध नोंदवून हा विषय मंजूर केलेला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर** – मा.नगरसचिव यांनी खुलासा करावा.

**मा.नगरसचिव** – आदरणीय महापौर साहेब, आदरणीय आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या अनुसूची प्रकरण २ नियम १ (प) नुसार, एखादा प्रस्ताव पारीत झाला आहे अशी अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिका-याने केलेली घोषणा आणि कार्यवृत्त पुस्तकात तशा अर्थाची केलेली नोंद ही अशा घोषणेच्या वेळी कमीत कमी चार पालिका सदस्यांनी मतदानाची मागणी केली नाही तर, त्या वस्तुस्थितीचा निर्णायक पुरावा असेल; मग अशा प्रस्तावाच्या बाजूने किंवा प्रस्तावाच्या विरुद्ध देण्यात आलेल्या मतांची संख्या सिद्ध करण्याची आवश्यकता असणार नाही. अशी तरतूद आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर** – ज्यांचा विरोध आहे त्यांचा नोंदवून घेतला आहे.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, आम्हाला या विषयावर चर्चा करायची नव्हती. सदस्यांचा विरोध नोंदवून घ्या.

**मा.महापौर** – तुमचा विरोध नोंदवून घेतलेला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर** – तुम्ही खाली बसा. तुम्ही आम्हाला शिकवू नका. आम्हाला कळतयं. आम्ही तुमचे खूप ऐकले. तुम्ही खाली बसा. आम्ही तुमचा विरोध नोंदवून घेतला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर** – मी सर्वांचा सन्मान करुन बोलतोय. मी एकही चुकीचा शब्द बोललो नाही. तुमचा विरोध नोंदवू. आम्ही कुठे नाही म्हटले आहे. तुम्ही सर्वांनी खाली बसा. मी विरोध नोंदवून घेतोय. ज्यांना हात वर करायचे आहेत त्यांनी हात वर करा. त्यांची नावे नोंदवून घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, आमचा चर्चेला विरोध होता. प्रोसिडींगमध्ये आमची नावे टाकून आली पाहीजेत.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर** – मा.नगरसचिव विरोध आहे त्या सर्वांची नावे हजेरीमस्टरवरुन घेवून त्यांचा विरोध नोंदवून घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा.एकनाथ पवार** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सभागृह, माझी सर्वांना विनंती आहे की, या विषयात हायकोर्टाचा निर्णय होईपर्यंत आपण काहीही करणार नाही. विषय मंजूर झालेला आहे. हायकोर्टाचा निर्णय होईपर्यंत आपण काही करणार नाही.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, आमचा चर्चेला विरोध आहे.

**मा.महापौर** – एक मिनिट सर्वांनी खाली बसा. आपण हायकोर्टाचा कुठलाही अवमान होणार नाही, यासह विषय मंजूर केला आहे. ज्यांनी हात वर केले आहेत, त्यांचा सर्वांचा चर्चेला विरोध आहे. त्यांचा हजेरी मस्टरवरून विरोध नोंदवून घेतलेला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर** – तुमच्या सगळ्यांचे म्हणणे ऐकून घेतले आहे. सगळ्यांचा विरोध नोंदवून घेतलेला आहे. हजेरी मस्टरवर जेवढी नावे आहेत, तेवढ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सगळ्यांचा विरोध नोंदवलेला आहे. हजेरी मस्टरवर जेवढे हजर आहेत, तेवढे राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि म.न.से. पक्षाच्या सदस्यांचा विरोध नोंदवून घेण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - १६३ | विषय क्रमांक – ३ |
| दिनांक – २०/३/२०१८ | विभाग- मा.आयुक्त |

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशासन/१/कावि/६१४/२०१७, दि.२३/०८/२०१७

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२४ दि. ८/०९/२०१७

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.७८ दि.१६/१०/२०१७

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.१०३ दि.२८/११/२०१७

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.११९ दि.०५/०२/२०१८

६) मा.महापालिका सभा ठ.क्र.१४९ दि.२८/०२/२०१८

आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर आदेश क्र.प्रशा/१/कावि/३७७/२०१५, दि.२८/०४/२०१५ अन्वये डॉ.के.अनिल रॉय यांची पदोन्नती समितीची मान्यता व मा.महापालिका सभा ठराव क्र. ५०३, दि.०५/०७/२०१४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार करण्यात आलेल्या नेमणुकीच्या अनुषंगाने शासन मान्यतेकामी सादर करण्यात आलेल्या क्र.प्रशा/१/कावि/४३२/१५, दि.१५/०५/२०१५ प्रमाणेच्या मुळ प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.उपसचिव (नवि-२२) यांनी पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

1) आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद उपलब्ध झाल्याच्या दिनांकास पदोन्नतीसाठी उपलब्ध अधिका-यांची अर्हता, सेवाज्येष्ठता या सर्व बाबींचा विचार करता, आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावरील पदोन्नतीबाबत महापालिकेच्या दि.१५/०५/२०१५ च्या प्रस्तावास मान्यता देणे योग्य ठरणार नाही.

2) प्रस्तुत प्रकरणी पद उपलब्ध झाल्याच्या दिनांकापासून डॉ.अनिल रॉय व डॉ.पवन साळवे यांची पात्रता व सेवाज्येष्ठता तपासण्यासाठी सदर प्रकरण पदोन्नती समितीसमोर पुन्हा ठेऊन त्यावर फेरनिर्णय घेण्यात यावा. तद्नंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ (४) मधील तरतुदींनुसार शासन स्तरावर आवश्यक तो निर्णय घेण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त बाबींवर निर्णय घेण्याकामी दि.२८/०७/२०१७ रोजी समिती सभा आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या समितीने प्रशासन विभागाने सादर केलेला प्रस्ताव व शासनाचे निर्देश विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

1) डॉ.नागकुमार कुणचगी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे दि.३०/०४/२०११ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेने महापालिका आस्थापनेवरील आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद दि.०१/०५/२०११ पासून रिक्त झाले आहे.

2) महापालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिका-यांमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी अर्हता विचारात घेऊन डॉ.अय्यर राजशेखर, वैद्यकीय संचालक (शैक्षणिक अर्हता - एम.बी.बी.एस., डी.पी.एच.) यांच्याकडे दि.०१/०५/२०११ पासून अतिरिक्त पदभार सोपविण्यात आलेला आहे.

3) डॉ.अय्यर राजशेखर,वैद्यकीय संचालक हे दि.३१/०५/२०१२ रोजी नियत वयोमानानुसार महापालिका सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे दि.०१/०६/२०१२ रोजी वैद्यकीय संचालक या पदाबरोबर आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद रिक्त झालेले आहे.

**4)** दि.०१/०६/२०१२ रोजी वैद्यकीय आस्थापनेवर आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता विचारात घेता, डॉ.पवन साळवे,वैद्यकीय अधिकारी हे एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम. ही अर्हता धारक अधिकारी उपलब्ध होते.

5) दरम्यान रिक्त असलेले वैद्यकीय संचालक या अभिनामाचे पद पदोन्नतीने भरण्याबाबत दि.१६/०८/२०१२ रोजी आयोजित पदोन्नती समिती सभेने यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाकरीता वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक आणि वैद्यकीय उपअधिक्षक ही तीनही पदे एकाच वेतनश्रेणीत असल्याने वैद्यकीय संचालक हे पद पदोन्नतीने न भरण्याबाबत निर्णय घेतला. तथापि वैद्यकीय विभागासाठी असलेली आरोग्य वैद्यकीय अधिकारी आणि अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी ही एकाच वेतनश्रेणीत, एकाच शैक्षणिक अर्हतेमध्ये आणि कर्तव्ये व जबाबदा-या समान असल्याने पदाकरीता आवश्यक असणारी एम.बी.बी.एस. आणि डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता धारण करणारे एकमेव वैद्यकीय अधिकारी डॉ.पवन वसंत साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) यांना अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्याकामी दि.१६/०८/२०१२ च्या समितीने शिफारस केलेली होती. त्यानुसार आदेश क्र.प्रशा/१/कावि/९८८/१२, दि.१७/०९/२०१२ अन्वये डॉ.साळवे पवन यांना अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

**6)** डॉ.के.अनिल रॉय यांनी डी.पी.एच. अर्हता दि.३०/०५/२०१३ रोजी धारण केलेली आहे. दि.३१/०५/२०१३ रोजी आयोजित पदोन्नती समितीने वैद्यकीय अधिका-यांची शैक्षणिक अर्हता व सेवाज्येष्ठता तपासून डॉ.के.अनिल रॉय (शैक्षणिक अर्हता-एम.बी.बी.एस., डी.पी. एच) यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्याबाबत शिफारस केलेली आहे. त्यानुसार पदोन्नती समितीची शिफारस, मा.महापालिका सभेची मान्यता व शासन मार्गदर्शन यांनुसार दि.२८/०४/२०१५ च्या आदेशान्वये डॉ.के.अनिल रॉय यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. शासन निर्देशानुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी पद उपलब्ध झाल्याच्या दिनांका रोजी (दि.०१/०५/२०११) डॉ. अय्यर राजशेखर (एम.बी.बी.एस.,डी.पी.एच) व डॉ.साळवे पवन (एम.बी.बी.एस., एम.डी.पी. एस.एम.) हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाकरीता पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत होते. तसेच डॉ.अय्यर सेवानिवृत्त झाल्यानंतर दि.०१/०६/२०१२ रोजी डॉ. साळवे हे पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हता धारण केलेले एकमेव वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होते. सदर दिनांकास डॉ.के.अनिल रॉय हे डी.पी.एच ही शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते. त्यामुळे डॉ.साळवे यांचा आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीकरीता विचार करणे आवश्यक होते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (१) नुसार मा.महापालिका सभा ही नियुक्ती प्राधिकारी असल्याने सदरची बाब निर्णयाकामी/मान्यतेकामी मा.विधी समितीमार्फत मा.महापालिका सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यास प्रस्तुतची समिती सर्वानुमते शिफारस करीत आहे. सबब, मा.उपसचिव (नवि-२२) यांनी पत्र क्र. पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४ मार्च

२०१७ अन्वये महापालिकेस प्राप्त निर्देश, दि.२८/०७/२०१७ च्या समितीची शिफारस या बाबी विचारात घेऊन महापालिका आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीबाबत निर्णय घेण्याकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्याबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव असलातरी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग (नवि-२२) यांचेकडील पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्रक्र३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस प्राप्त निर्देश आणि दिनांक २८/७/२०१७ रोजीच्या पदोन्नती समितीचा निर्णय व शिफारस विचारात घेऊन आरोग्य वैद्यकीय अधिकारी पद पदोन्नतीसाठी उपलब्ध झालेचे दिनांक रोजी (दि.१/५/२०११) डॉ.अय्यर राजशेखर (एम.बी.बी.एस.,डी.पी.एच.) व डॉ.पवन साळवे (एम.बी.बी.एस.,एम.डी.पी.एस.एम.) हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाकरीता पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत होते. तसेच डॉ.अय्यर सेवानिवृत्त झाल्यानंतर दि.१/६/२०१२ रोजी डॉ.पवन वसंत साळवे हे पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हता धारण केलेले एकमेव वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होते. सदर दिनांकास डॉ.के.अनिल रॉय हे डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते. त्यामुळे डॉ.पवन वसंत साळवे यांचा आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नती करीता विचार करणे आवश्यक होते. ही वस्तुस्थिती विचारात घेता नियुक्ती प्राधिकारी म्हणून पुर्वीचे या पदासंबंधीचे सर्व निर्णय अधिक्रमित करुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर डॉ.पवन वसंत साळवे (एम.बी.बी.एस.,एम.डी.पी.एस.एम.) यांची पदोन्नतीने नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आदेशान्वये मनपातील अभियंता पदाच्या सेवाजेष्ठता यादया महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२ नुसार करुन मा.महापालिका ठराव क्र.८ दि.०४/०१/१९८३ पासुन फेरनिवडसुची करणेबाबत महाराष्ट्र शासनाने मनपास आदेश दिलेले आहेत तसेच सदर आदेशाची अंमलबजावणी करणेबाबत मा.उच्च न्यायालयानेही आदेश दिलेले आहेत. सबब सदर दोन्ही आदेशान्वये कार्यकारी अभियंता, स्थापत्य या पदाकरिता खालील सेवा जेष्ठ उप अभियंते श्री.दिपक सुपेकर, श्री.सुनिल वाघुंडे, मा.केशव फुटाणे, श्री.अनिल शिंदे, मा.रामनाथ टकले, श्री.आबासाहेब ढवळे, श्री.किशोर महाजन, श्री.राजेंद्र शिंदे, श्री.अनिल राऊत यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७७ प्रतिकूल- ४३

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ४

दिनांक – २०/३/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे,मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव...
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.५० दि.१४/२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीतील सुधारित मंजूर विकास योजने नुसार मौजे पिंपरी वाघेरे मधील स.न.२,३,४,५ व ११ यास सी.स.न. ८६६, ८६८, ८६९, ८७०, ८७१, ८७४, ८७५, ८७७, ८७८ व ८७९ या मिळकती मधून १५.०० मी. रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे. सदर रस्त्याचा भाग हा एफ.एस.आय, टी.डी.आर. द्वारे महापालिकेच्या ताब्यात आलेला आहे. सदरच्या रस्त्याचा बहुतांश भाग हा महापालिकेच्या ताब्यात आलेला नाही. सदरचा रस्ता विकसित झाल्यास पिंपरी गावाकडे जाणा-या रस्त्यावरील ताण कमी होऊन वाहतूक सुलभ होणार आहे. तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.विकास डोळस-**मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते –

बोपखेल फाटा ते आळंदी रस्ता भाग क्र. २ (साखळी क्र. ७/०४० ते चेनेज क्र. ८/२५० पर्यंत डी पी रस्ता विकसित करणे, निविदा नो.क्र. १०/२-२०१४/१५ आदेश क्र. स्था/लेखा/१/कावि/७९९/२०१४ दि.२७.८.१४ अन्वये मा.कृष्णाई कन्स्ट्रक्शन इन्फ्रा. प्रा. लि. यांना देणेत आले आहे. सदरचे काम प्रगतीपथावर असून सदर कामांतर्गत विदयुतविषयक कामांच्या शिल्लक रकमेतून च-होली फाटा ते च-होली गावाकडे जाणा-या नजिकच्या रस्त्यावर विदयुतविषयक कामे करणेस (Change of site) स्थळ बदलास मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र.७ वडमुखवाडी स.नं. १२३ मधील मनपाच्या ताब्यात आलेल्या सुविधा भुखंड विकसीत करणे निविदा क्र. १३/०१-२०१५-१६ या कामात झालेल्या मुळ परिमाणात वाढ झाल्याने (Scope Variation) कामास सुधारीत मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कामास सुधारीत प्रशासकीय र.रु. ३,००,००,०००/- रक्कमेस कार्योत्तर मान्यता देणेत यावी. तसेच दापोडी महात्मा फुलेनगर झोपडपट्टी मधुन विकास आराखडयानुसार ३० मीटर रस्ता आहे. सदर रस्ता विकसीत होणे आवश्यक आहे. तसेच त्या ठिकाणी असलेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळयाला कोणताही धक्का न लावता सुरवातीला उपलब्ध असणारी १५ मीटर जागा किंवा जी उपलब्ध असलेली जागा याचा वापर करुन पुढील बाजुस ३० मीटर रस्ता करणेत यावा. या रस्त्यामध्ये काही झोपडया असुन त्या रस्ताबाधीत आहेत. या सर्व रस्ताबाधीत झोपडीधारकांचे नियमानुसार पुनर्वसन होणे आवश्यक आहे. सदर महात्मा

फुलेनगर मधील रस्ताबाधीत झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन झाले शिवाय रस्ता रिकामा होणार नाही व रस्ता विकसन ही करता येणार नाही. तसेच सदर झोपडपट्टी घोषीत असुन खाजगी जागेवर असल्याने या झोपडपट्टीमध्ये रस्त्याने बाधीत होणा-या झोपडपट्टीधारकांचे तात्पुरते स्वरुपात प्रथम दापोडी येथील आरक्षण क्र.३/५ येथे पत्राशेड तयार करुन त्या जागेवर स्थलांतरीत करावे. या रस्ताबाधीत पात्र व अपात्र झोपडीधारकांना मनपाच्या नियमावलीनुसार पंतप्रधान आवास योजने अंतर्गत तयार होणा-या सदनिकेमध्ये लाभ देऊन लवकरात लवकर पुनर्वसन करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील ताथवडे गावातील पशुसंवर्धन विभागाच्या मालकीचे सार्वजनिक/निमसार्वजनिक प्रयोजनातील स.नं. १६ व १७ मधील सुमारे ७.२५ हे. क्षेत्र, स.नं. १८ व १९ सुमारे ९.२० हे. क्षेत्र, स.नं.२० व २१ मधील ७.९३ हे. क्षेत्र, स.नं. २२ व २३ मधील ८.२५ हे. क्षेत्र ही जागा रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट व अम्युजमेंट पार्क या प्रयोजनासाठी विकास योजनेत आरक्षीत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस तसेच फेरबदलाची विहीत कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करण्यास मा.महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तरी सदरची जागा संबंधित विभागाकडून प्रचलित नियमानुसार ताब्यात घेऊन भूसंपादन करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मंजुर विकास योजनेतील विविध आरक्षणाच्या जागा ताब्यात घेताना टि.डी.आर./एफ.एस.आय. अथवा भूसंपादन कायदयानुसार आर्थिक मोबदला याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते. सद्यस्थितीत टि.डी.आर. चा दर कमी झालेला असल्याने मिळकतधारक आरक्षणाने बाधित क्षेत्र टि.डी.आर. चे बदल्यात ताब्यात देण्यास तयार होत नाहीत. तसेच मिळकतधारक शेतकरी असल्यास त्यास टी.डी.आर. /एफ.एस.आय. बाबतची प्रक्रीया माहीत नसल्याने त्यांचा जागा ताब्यात देण्यास विरोध असतो. त्यामुळे आरक्षित जागा ताब्यात घेण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे माध्यमातून भुमिसंपादन कायदयान्वये भूसंपादनाची कार्यवाही करणे भाग पडते व त्यास बराच कालावधी लागतो.

महानगरपालिकेने यापुर्वी मा.महानगरपालिका सभा ठराव क्र. ३९९, दि.२१/१०/२०१३ नुसार बी.आर.टी. रस्त्यातील तसेच बी.आर.टी. व्यतिरीक्त भुसंपादनाकामी पाठविलेल्या व संयुक्त मोजणी झालेल्या प्रस्तावातील जागा खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेण्यास मान्यता दिलेली आहे. तशाच पध्दतीने यापुढे पिं.चिं.म.न.पा. क्षेत्रातील मिळकतधारक मंजुर विकास योजनेतील आरक्षणाच्या/ रस्त्याच्या तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये घोषीत रस्ते इ. सर्व सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित असणा-या जमिनी खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात देत असतीलतर सदरच्या जागा खाजगी वाटाघाटीने रोख मोबदल्याच्या बदल्यात ताब्यात घेण्यास त्यासाठी येणा-या खर्चास व सदरचा खर्च नगररचना विभागाकडील भूसंपादन निधी या लेखाशिर्षातून करणेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच महाराष्ट्र शासनाने दि.०७/१०/२०१७ चे शासननिर्णयान्वये महापालिका हद्दीतील डिसेंबर २०१५ पुर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमन शुल्क आकारुन नियमित करणेबाबत नियम प्रसिध्द केले आहे. त्यानुसार महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामे नियमित करणेसाठी वृत्तपत्रात निवेदन दिलेले आहे तसेच नियमितीकरणासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करणेत आले आहे. जाहीर प्रकटन,

प्रसिध्दी व याबाबतची माहिती महानगरपालिकेचे www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध केली आहे. तरीही आतापर्यंत ९ अर्जदारांनी अर्ज दाखल केले आहेत.

यावरुन नियमितीकरणासाठी मिळणारा प्रतिसाद अत्यंत अल्प आहे. नियमितीकरणासाठी आकारण्यात येणारा शुल्क कमी केल्यास नागरिकांना सोयीचे होईल. नागरीक मोठयाप्रमाणावर नियमितीकरण करुन घेतील व महापालिकेचा महसुलही वाढेल व अनधिकृत बांधकामावर करावयाच्या कारवाई प्रश्न कमी होईल.

सबब सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे शुल्काचे कमी केलेले दर मुदतवाढीसह निश्चित करावेत व त्याप्रमाणे दर आकारुन नियमीतीकरण करणेस मान्यता देणेकामी शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेत यावी. शासन मान्यतेनंतर त्याप्रमाणे नियमितीकरण करण्याचा प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

**मा.उषा मुंढे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.विलास मडिगेरी** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - १६४ विषय क्रमांक – ४
दिनांक – २०/३/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे,मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव...
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.५० दि.१४/२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीतील सुधारित मंजूर विकास योजने नुसार मौजे पिंपरी वाघेरे मधील स.न.२,३,४,५ व ११ यास सी.स.न. ८६६, ८६८, ८६९, ८७०, ८७१, ८७४, ८७५, ८७७, ८७८ व ८७९ या मिळकती मधून १५.०० मी. रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे. सदर रस्त्याचा भाग हा एफ.एस.आय, टी.डी.आर. द्वारे महापालिकेच्या ताब्यात आलेला आहे. सदरच्या रस्त्याचा बहुतांश भाग हा महापालिकेच्या ताब्यात आलेला नाही. सदरचा रस्ता विकसित झाल्यास पिंपरी गावाकडे जाणा-या रस्त्यावरील ताण कमी होऊन वाहतूक सुलभ होणार आहे. तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच बोपखेल फाटा ते आळंदी रस्ता भाग क्र. २ (साखळी क्र. ७/०४० ते चेनेज क्र. ८/२५० पर्यंत डी पी रस्ता विकसित करणे, निविदा नो.क्र. १०/२-२०१४/१५ आदेश क्र. स्था/लेखा/१/कावि/७९९/२०१४ दि.२७.८.१४ अन्वये मा.कृष्णाई कन्स्ट्रक्शन इन्फ्रा. प्रा. लि. यांना देणेत आले आहे. सदरचे काम प्रगतीपथावर असून सदर कामांतर्गत विदयुतविषयक कामांच्या शिल्लक रकमेतून च-होली फाटा ते च-होली गावाकडे जाणा-या नजिकच्या रस्त्यावर

विदयुतविषयक कामे करणेस (Change of site) स्थळ बदलास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.७ वडमुखवाडी स.नं. १२३ मधील मनपाच्या ताब्यात आलेल्या सुविधा भुखंड विकसीत करणे निविदा क्र. १३/०१-२०१५-१६ या कामात झालेल्या मुळ परिमाणात वाढ झाल्याने (Scope Variation) कामास सुधारीत मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कामास सुधारीत प्रशासकीय र.रु. ३,००,००,०००/- रक्कमेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. तसेच दापोडी महात्माफुलेनगर झोपडपट्टी मधुन विकास आराखडयानुसार ३० मीटर रस्ता आहे. सदर रस्ता विकसीत होणे आवश्यक आहे. तसेच त्या ठिकाणी असलेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळयाला कोणताही धक्का न लावता सुरवातीला उपलब्ध असणारी १५ मीटर जागा किंवा जी उपलब्ध असलेली जागा याचा वापर करुन पुढील बाजुस ३० मीटर रस्ता करणेत यावा. या रस्त्यामध्ये काही झोपडया असुन त्या रस्ताबाधीत आहेत. या सर्व रस्ताबाधीत झोपडीधारकांचे नियमानुसार पुनर्वसन होणे आवश्यक आहे. सदर महात्माफुलेनगर मधील रस्ताबाधीत झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन झाले शिवाय रस्ता रिकामा होणार नाही व रस्ता विकसन ही करता येणार नाही. तसेच सदर झोपडपट्टी घोषीत असुन खाजगी जागेवर असल्याने या झोपडपट्टीमध्ये रस्त्याने बाधीत होणा-या झोपडपट्टीधारकांचे तात्पुरते स्वरुपात प्रथम दापोडी येथील आरक्षण क्र. ३/५ येथे पत्राशेड तयार करुन त्या जागेवर स्थलांतरीत करावे. या रस्ताबाधीत पात्र व अपात्र झोपडीधारकांना मनपाच्या नियमावलीनुसार पंतप्रधान आवास योजने अंतर्गत तयार होणा-या सदनिकेमध्ये लाभ देऊन लवकरात लवकर पुनर्वसन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील ताथवडे गावातील पशुसंवर्धन विभागाच्या मालकीचे सार्वजनिक/निमसार्वजनिक प्रयोजनातील स.नं. १६ व १७ मधील सुमारे ७.२५ हे. क्षेत्र, स.नं. १८ व १९ सुमारे ९.२० हे. क्षेत्र, स.नं.२० व २१ मधील ७.९३ हे. क्षेत्र, स.नं. २२ व २३ मधील ८.२५ हे. क्षेत्र ही जागा रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट व अम्युजमेंट पार्क या प्रयोजनासाठी विकास योजनेत आरक्षीत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस तसेच फेरबदलाची विहीत कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करण्यास मा.महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तरी सदरची जागा संबंधित विभागाकडून प्रचलित नियमानुसार ताब्यात घेऊन भूसंपादन करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मंजुर विकास योजनेतील विविध आरक्षणाच्या जागा ताब्यात घेताना टि.डी.आर./एफ.एस.आय. अथवा भूसंपादन कायदयानुसार आर्थिक मोबदला याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते. सद्यस्थितीत टि.डी.आर. चा दर कमी झालेला असल्याने मिळकतधारक आरक्षणाने बाधित क्षेत्र टि.डी.आर. चे बदल्यात ताब्यात देण्यास तयार होत नाहीत. तसेच मिळकतधारक शेतकरी असल्यास त्यास टी.डी.आर. /एफ.एस.आय.बाबतची प्रक्रीया माहीत नसल्याने त्यांचा जागा ताब्यात देण्यास विरोध असतो. त्यामुळे आरक्षित जागा ताब्यात घेण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे माध्यमातून भुमिसंपादन कायदयान्वये भूसंपादनाची कार्यवाही करणे भाग पडते व त्यास बराच कालावधी लागतो.

महानगरपालिकेने यापुर्वी मा.महानगरपालिका सभा ठराव क्र. ३९९, दि.२१/१०/२०१३ नुसार बी.आर.टी. रस्त्यातील तसेच बी.आर.टी. व्यतिरीक्त भुसंपादनाकामी पाठविलेल्या व संयुक्त मोजणी झालेल्या प्रस्तावातील जागा खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेण्यास मान्यता

दिलेली आहे. तशाच पध्दतीने यापुढे पिं.चिं.म.न.पा. क्षेत्रातील मिळकतधारक मंजुर विकास योजनेतील आरक्षणाच्या/रस्त्याच्या तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये घोषीत रस्ते इ. सर्व सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित असणा-या जमिनी खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात देत असतीलतर सदरच्या जागा खाजगी वाटाघाटीने रोख मोबदल्याच्या बदल्यात ताब्यात घेण्यास त्यासाठी येणा-या खर्चास व सदरचा खर्च नगररचना विभागाकडील भूसंपादन निधी या लेखाशिर्षातून करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने दि.०७/१०/२०१७ चे शासननिर्णयान्वये महापालिका हद्दीतील डिसेंबर २०१५ पुर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमन शुल्क आकारुन नियमित करणेबाबत नियम प्रसिध्द केले आहे. त्यानुसार महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामे नियमित करणेसाठी वृत्तपत्रात निवेदन दिलेले आहे तसेच नियमितीकरणासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करणेत आले आहे. जाहीर पकटन, प्रसिध्दी व याबाबतची माहिती महानगरपालिकेचे www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध केली आहे. तरीही आतापर्यंत ९ अर्जदारांनी अर्ज दाखल केले आहेत.

यावरुन नियमितीकरणासाठी मिळणारा प्रतिसाद अत्यंत अल्प आहे. नियमितीकरणासाठी आकारण्यात येणारा शुल्क कमी केल्यास नागरिकांना सोयीचे होईल. नागरीक मोठयाप्रमाणावर नियमितीकरण करुन घेतील व महापालिकेचा महसुलही वाढेल व अनधिकृत बांधकामावर करावयाच्या कारवाई प्रश्न कमी होईल.

सबब सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे शुल्काचे कमी केलेले दर मुदतवाढीसह निश्चित करावेत व त्याप्रमाणे दर आकारुन नियमीतीकरण करणेस मान्यता देणेकामी शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. शासन मान्यतेनंतर त्याप्रमाणे नियमितीकरण करण्याचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सोनाली गव्हाणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ५

दिनांक – २०/३/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव...
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.५१ दि.१४/२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीतील सुधारित मंजूर विकास योजने नुसार मौजे पिंपरी वाघेरे मधील स.न.७,२२३ व २२४ यांसी सी.स.न. ९४०, ९५६, १०५४, १०५५, १०६१, १०७९, १०८०, ७५० व ७५१ या मिळकती मधून १८.०० मी. रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे. सदर रस्त्याचा भाग हा एफ.एस.आय, टी.डी.आर. द्वारे महापालिकेच्या ताब्यात

आलेला आहे. सदरच्या रस्त्याचा बहुतांश भाग हा महापालिकेच्या ताब्यात आलेला नाही. सदरचा रस्ता विकसित झाल्यास पिंपरी गावाकडे जाणा-या रस्त्यावरील ताण कमी होऊन वाहतूक सुलभ होणार आहे. तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सारिका सस्ते**– मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.राजेंद्र गावडे-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - मौजे चिंचवड येथील स.नं. २८८ ते २९१ मध्ये आरक्षण क्र. २३३ साठी प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान हे प्रयोजन असुन अदाजे क्षेत्र ८००० चौ.मी. आहे. त्यापैकी टीडीआरचे बदल्यात आरक्षणाच्या दक्षिणेकडील साधारणत: २८०० चौ.मी. क्षेत्र मनपाच्या ताब्यात आले आहे. उर्वरीत क्षेत्र अदयाप मनपाचे ताब्यात येणे बाकी आहे. तरी सध्या ताब्यात आलेल्या २८०० चौ.मी. भागामध्ये प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ऐवजी क्रिडा संकुल असा बदल करणे आवश्यक आहे व उर्वरीत भागासाठी प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान हे आरक्षण कायम ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार आरक्षण क्र. २३३ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान मधील दक्षिणेकडील साधारणत: २८०० चौ.मी. क्षेत्राचे प्रयोजनात बदल करुन महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदल करुन त्याऐवजी क्रिडा संकुल हे आरक्षण करण्यास मान्यता देणेत यावी. सदर विषय कायम होणेची वाट न पाहता मा.आयुक्त यांनी हरकती सूचना मागऊन अंतिम निर्णय घेणेस मान्यता देणेत यावी. सदर विषयाबाबत पुढील कार्यवाही करुन व शासनास प्रस्ताव सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सुरेश भोईर** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सोनाली गव्हाणे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - १६५ विषय क्रमांक – ५
दिनांक – २०/३/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव...
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.५१ दि.१४/२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीतील सुधारित मंजूर विकास योजनेनुसार मौजे पिंपरी वाघेरे मधील स.न.७,२२३ व २२४ यांसी सी.स.न. ९४०, ९५६, १०५४, १०५५, १०६१, १०७९, १०८०, ७५० व ७५१ या मिळकती मधून १८.०० मी. रूंद विकास योजना

रस्ता प्रस्तावित आहे. सदर रस्त्याचा भाग हा एफ.एस.आय, टी.डी.आर. द्वारे महापालिकेच्या ताब्यात आलेला आहे. सदरच्या रस्त्याचा बहुतांश भाग हा महापालिकेच्या ताब्यात आलेला नाही. सदरचा रस्ता विकसित झाल्यास पिंपरी गावाकडे जाणा-या रस्त्यावरील ताण कमी होऊन वाहतूक सुलभ होणार आहे. तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे चिंचवड येथील स.नं. २८८ ते २९१ मध्ये आरक्षण क्र. २३३ साठी प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान हे प्रयोजन असुन अदाजे क्षेत्र ८००० चौ.मी. आहे. त्यापैकी टीडीआरचे बदल्यात आरक्षणाच्या दक्षिणेकडील साधारणत: २८०० चौ.मी. क्षेत्र मनपाच्या ताब्यात आले आहे. उर्वरीत क्षेत्र अदयाप मनपाचे ताब्यात येणे बाकी आहे. तरी सध्या ताब्यात आलेल्या २८०० चौ.मी. भागामध्ये प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान ऐवजी क्रिडा संकुल असा बदल करणे आवश्यक आहे व उर्वरीत भागासाठी प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान हे आरक्षण कायम ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार आरक्षण क्र. २३३ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान मधील दक्षिणेकडील साधारणत: २८०० चौ.मी. क्षेत्राचे प्रयोजनात बदल करुन महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदल करुन त्याऐवजी क्रिडा संकुल हे आरक्षण करण्यास मान्यता देणेत येत आहे. सदर विषय कायम होणेची वाट न पाहता मा.आयुक्त यांनी हरकती सूचना मागऊन अंतिम निर्णय घेणेस मान्यता देणेत येत आहे. सदर विषयाबाबत पुढील कार्यवाही करुन व शासनास प्रस्ताव सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ६

दिनांक – २०/३/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/०५/कावि/२७/२०१८ दि.१२/०२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत १) मागासवर्गीय युवकांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे. ही योजना कार्यान्वित आहे. या योजने मध्ये अर्थसहाय्याचा धनादेश प्रवेश घेतलेल्या विद्यापिठाचे नावे काढण्यात येतो. त्या ऐवजी विद्यार्थ्याचे नावे धनादेश किंवा ECS द्वारे लाभ देणेत यावा अशी दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने त्यास

मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रपत्र ''**अ**'' नुसार या सुधारीत योजनेला मान्यता देणेत यावी.

**मा.उषा मुंढे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सचिन चिखले –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार बंधू, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत मागासवर्गीय युवकांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे. या योजनेत पहिली चूक होती की, त्या-त्या विद्यापीठाच्या नावाने चेक देत होतो. तो आता विद्यार्थ्यांच्या नावाने देणार आहोत. संबंधित अधिका-यांनी सविस्तर माहिती द्यावी. कारण हा खूप चांगला निर्णय आहे. पण याचे वाईट परिणाम सुद्धा होऊ शकतात. यातून पुढे कोणताही अधिकारी,कोणताही नगरसेवक किंवा तो विद्यार्थी याचे नाव खराब होणार नाही याची आपण काळजी घेऊ.

**मा.विलास मडिगेरी** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- दुरुस्ती उपसूचना आहे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माहे फेब्रुवारी २०१८ च्या मा.महापालिका सभेमध्ये पाणीपुरवठ्या संदर्भातले काही ठराव केले होते. उपसूचना दिली होती. मीटर रिडींगप्रमाणे आकारणी करताना प्रत्येक निवासी ग्राहकाच्या, प्रत्येक सदनिका, प्रत्येक कुटूंब रु.१००/- अशी सूचना केली होती.

**मा.महापौर** – मा.विलास मडिगेरी ही उपसूचना विषयाला सुसंगत नाही.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा.महापौर**- मी त्यांना सांगितलेय की ही उपसूचना विषयाला सुसंगत नाही. तरी तुम्ही कशाला बोलताय. तुम्ही कशाला उठताय. मी इथे आहे ना. तुम्ही इथे येऊन बसा, तेवढेच तुमचे करायचे राहीले आहे. मा.मंगलाताई कदम व मा.वैशालीताई घोडेकर तुम्ही इथे बसा. मी खाली बसतो. आता तेवढेच राहीले आहे.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, तुम्हाला वाटत असेलतर आम्ही सभागृह चालवतो.

**मा.अभिषेक बारणे** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आज मा.मंगलाताई कदम यांनी महापौरांशी जे निवेदन केले आहे, त्याबद्दल मी त्यांच्या निलंबनाची मागणी करतो.

**मा.महापौर** – तुम्ही विषयावर बोला. मला कशाला सांगताय. मा.मंगलाताई कदम मी त्यांना सांगितलेय. तुम्ही विषयावर बोला.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब,तुम्हाला मुद्दाम सभागृह असे चालवायचे आहे का.

**मा.महापौर** – मी त्यांना सांगितले आहे की,विषयावर बोला. त्यांचा तो विषय नाही.

**मा.एकनाथ पवार**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, त्यांनी सांगितले आहे. मा.विलास मडिगेरी यांना सांगितले. ताई,तुम्ही सन्मा.महापौर होता. तुम्ही बसा. मला माहित आहे, तुम्हाला विरोधच करायचा आहे. मा.महापौर साहेब,या विषयात अष्टिकर साहेबांना खुलासा करायला लावा.

**मा.महापौर**- मा.अष्टिकर साहेब, विषयाचा खुलासा करावा.

**मा.अष्टिकर (प्र.अति.आयुक्त)**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मागासवर्गीय नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत परदेशातील उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे ही योजना कार्यान्वित आहे. या योजनेमध्ये जे लाभार्थी यांची निवड होईल, जे लाभार्थी परदेशात आहेत, त्यांना त्यापूर्वी त्यांनी ज्या विद्यापीठात प्रवेश घेतला आहे, त्या विद्यापीठाच्या नावाने धनादेश काढण्यात येत होता. हा धनादेश त्या विद्यार्थ्यांच्या नावे काढण्यात यावा, त्यासाठी हा प्रस्ताव आलेला आहे. यात अशी तक्रारी आल्या की, हा धनादेश परदेशातील शैक्षणिक विद्यापीठ आहे, त्यांच्या नावे चेक काढतो. त्याला बराचसा विलंब होतो. तिथे खाते काढणे, ते खाते काढून त्या खात्यात रक्कम जमा करणे व तिथल्या विद्यार्थ्यांना प्राप्त होणे यासाठी बराचसा विलंब होतो. या अनुषंगाने महिला बाल कल्याण समितीत विषय झाला होता. या अनुषंगाने मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत हा धनादेश विद्यापीठाऐवजी लाभार्थ्यांच्या नावाने देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सभागृहापुढे सादर केला आहे.

**मा.प्रमोद कुटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार बंधू, आज एवढी चांगली योजना सभागृहासमोर आणली आहे. मागासवर्गीय युवकांसाठी चांगली योजना आणताय मग मराठा समाजातील तरुणांनी काय पाप केले आहे. ही योजना आर्थिक निकषांवर का आणत नाही. कुठेतरी दोन पाऊले वेगळा विचार करुन पुढे चाला ना.

मी उपसूचना करु इच्छितो की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विभागामार्फत सर्व जाती धर्मातील विदयार्थ्यांना आर्थिक निकशावर अर्थसहाय्य देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.निलेश बारणे-** मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.राहूल कलाटे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, हा विषय अतिशय चांगला आहे. मला वाटते की, विद्यापीठाला पैसे दिलेतर जास्त पारदर्शी होईल. मा.अष्टिकर साहेब, तुम्हाला वाटत नाही का याचा दुरुपयोग होऊ शकतो. विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासाठी पैसे घेतले आणि ते उच्चशिक्षणासाठी गेले नाहीतर काय करणार. आर.डी.च्या स्वरुपात दिलेतर विद्यापीठाला पैसे जातात. खरेतर या शहरात गरीब लोग खूप आहेत. सर्व जातीधर्माचे लोक आहेत. गरीब विद्यार्थ्यांना दिलेतर त्यांना सुद्धा शिकता येईल. ईसीएस द्वारे डायरेक्ट विद्यापीठांना पैसे जातात. पण असे स्वतःच्या नावे दिले आणि परदेशात गेलाच नाहीतर काय करणार आहात. त्यामुळे या योजनेची अंमलबजावणी व्यवस्थित व्हावी. एवढेच मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. चांगल्या लोकांना याचा फायदा होत असेलतर या दृष्टिकोणातून सभागृहाने विचार करावा.

**मा.सुनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, या ६ नंबरच्या विषयात अटी-शर्तीमध्येच दिले आहे की, अर्जदार विद्यार्थ्याच्या अर्जासोबत अभ्यासक्रम सुरु झाल्यानंतर बोनाफाईड सर्टिफिकेट सादर करणे आवश्यक आहे. म्हणजे विद्यार्थी त्याचा लाभच घेणार आहेत. महिला व बालकल्याण समितीच्या वतीने मा.प्रमोद कुटे यांनी दिलेली उपसूचना मान्य करण्यात यावी. धन्यवाद.

**मा.सचिन चिखले** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, खरेतर खूप चांगली योजना, आपण सभागृहामार्फत सर्व विद्यार्थ्यांना देऊ इच्छितो आहोत. खूप चांगला निर्णय आहे. मा.प्रमोद कुटे यांनी सूचना मांडली की, सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना लाभ व्हावा. ही उपसूचना आपण मंजूर केली आहे. यासाठी तुमचे मनापासून हार्दीक अभिनंदन करतो आणि आभारही मानतो. खरेतर खूप वाईट परिस्थिती आहे. विद्यार्थ्यांना खूप शिकायची इच्छा असते. शिकून पुढे जायची इच्छा असते. परंतू काही विद्यार्थी कौटूंबिक कारणास्तव किंवा गरीब असल्यामुळे पुढे जाऊ शकत नाहीत. माझी मा.महापौर साहेबांना विनंती असेन की, हा विषय खूप सुंदर आहे. परंतू यात गैरव्यवहार होऊ नये म्हणून आपण यात थोडेसे लक्ष घालावे अशी विनंती करतोय. जर एखादा विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी बाहेर जातो, तर ही दीड लाख रुपये रक्कम खूप कमी आहे. आपण यात अजून एक/दोन लाख वाढवून देऊ शकतो का, याचाही सर्व सभागृहाने विचार केला पाहीजे. एवढे बोलून थांबतो, धन्यवाद.

**मा.सुजाता पालांडे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू आणि आज प्रेक्षागॅलरीत जमलेले माझे बंधू आणि भगिनी, हा विषय खूप चांगल्या पद्धतीने आणलेला आहे. त्याबद्दल महिला बालकल्याण समितीचे मी प्रथम अभिनंदन करतो. मा.प्रमोद कुटे यांनी

जी उपसूचना केली आहे. मी त्यांचेही अभिनंदन करते. आपण सगळ्या योजना करतोय. पण मा.महापौर साहेब या योजना करताना, या योजना राबवताना त्या किती यशस्वी पद्धतीने राबवल्या जातात. आज दहावीतील मुले त्यांना ८० टक्के/७५ टक्केंवरील मुलांना आपण अनुदान देतोय किंवा त्यांना स्कॉलरशीप देतोय. स्कॉलरशीपचे किती जणांचे चेक अजून दिलेले नाहीत. आज १०वी. च्या मुलांचे ११ वी चे वर्ष संपत आले. १२ वी. चे पुढील वर्ष संपत आले. तरीसुद्धा आज त्यांना अजून स्कॉलरशीपचे चेक दिले गेलेले नाहीत. त्यांचे चेक अजून का दिले गेलेले नाहीत, याबद्दल अहिवले व बहाद्दरपुरे जे कोणी अधिकारी आहेत, त्यांनी इथे सादर करावे की, या पद्धतीचे अजून चेक का दिले गेलेले नाहीत. आम्ही जेव्हा जेव्हा अहिवले यांना विचारले आहे. तेव्हा त्यांनी एकच उत्तर दिले आहे की, अजून स्क्रुटीनी झालेली नाही. पात्र झाले नाहीत. अपात्र झाले नाहीत. या गोष्टी होण्यासाठी पूर्ण एक वर्ष लागते का. पात्र अपात्रची यादी पाहिजे असेलतर ही यादी प्रभागनिहाय म्हणजे अ,ब,क,ड,इ,फ अशी दिली जाते. जर आमच्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या फॉर्मवर प्रभाग क्रमांक कुठला ते लिहिला जातो. जर माझा प्रभाग क्र.२० असेलतर आम्हाला त्या पद्धतीची यादी का दिली जात नाही. माझ्या प्रभाग क्र.२० मधून आम्ही एवढ्यांनी फॉर्म भरले असतीलतर आम्हाला पात्र अपात्रची यादी का दिली जात नाही. अधिका-यांची जी अरेरावी, मनमानी आहे, ती कुठेतरी बंद झाली पाहीजे. आजपर्यंत चेक का आले नाहीत. त्यांना एक एक वर्ष का खोळंबायला लागते. स्क्रुटीनी कुठल्या पद्धतीने केली जाते, याचा खुलासा करावा एवढी विनंती करते.

**मा.मंगला कदम-** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत युवकांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी जे अनुदान देतो त्यासंदर्भात हा विषय आहे. मुले शिकायला गेलीतर त्यांच्या नावे ईसीएस करायचे असेलतर ते किती मुदतीत केले आहेत. मुलांना शिकवताना त्यांना योग्य मार्गाने चांगल्या पद्धतीने पैसे मिळावेत हेच त्यामागील उद्दीष्ट आहे. मी तापकीर ताईंचे मनापासून स्वागत करते आणि मा.प्रमोद कुटे यांचे पण मनापासून स्वागत करते. हा विषय मागासवर्गीय योजना या विषयातून देऊ नयेतर महिला बालकल्याण योजना मधूनच हा विषय देण्यात यावा. नाहीतर उद्या असे व्हायचे की, यांची संख्या वाढलीतर यांना अनुदान द्यायला पैसे कमी पडले. म्हणून पुन्हा सभागृहात असा गोंधळ होऊ नये की, यांच्यावर अन्याय झाला. आत्ता जी उपसूचना दिली, ती महिला बालकल्याण मधून अनुदान देण्यात यावे. आज पिंपरी चिंचवडमध्ये महिला बालकल्याणचे बजेट आणि महिला बालकल्याणचे काम चालले आहे. तिथे जी तीन/चार लोकं भरली गेली आहेत. आत्ता एका महिला भगिनींनी सांगितले की, दहावीचे विद्यार्थी असतील, विधवा योजना असेल. बचतगटांना दहा वर्षे झाली आहेत. या बचत गटांच्या फाईल बघितल्या. मी स्वतः अहिवले यांच्याशी बोलले. त्यांनी काय सांगितले तर दर महिन्याची एन्ट्री झाली

पाहीजे. अहो, शेवटी त्या महिला आहेत. एखादीच्या घरी कधी कोणी आजारी पडते. तुम्ही तिचे आत्तापर्यंतचे पासबुक अपडेट आहे ते बघा ना. जर त्यांचे दहा वर्षांचे पासबुक अपडेट नसेलतर तुम्ही त्यांना अनुदान देऊ नका. पण तुमची या महिन्यातली एन्ट्री नाही, हा कागद नाही. मग आम्ही त्यांना म्हणालो की, तुम्ही किती फाईल अपात्र केल्या आहेत ते तरी दाखवा. मा.आयुक्त साहेब, अपात्रची यादी करायला नको का. जर त्यांची खाली एवढी यंत्रणा आहे, तर मला सांगा. जर १० वर्षे झालेल्या बचत गटांना अनुदान दिलेतर कुठली महिला काय कारणासाठी अपात्र ठरली. हे पुढच्या वर्षी जेव्हा ती महिला आमच्याकडे ओरडत येईल, माझ्याकडे नाही पण बाकी कोणाकडे जातील. त्यावेळी समजेल की, अरे, इतक्या उशीरा का सांगितले. आपल्याकडे महापालिकेत ती यंत्रणा नाही. महापालिका पेपरलेस करायची असे आपण नेहमी म्हणतो. मग तुम्ही त्यात सगळे फिटींग का करत नाही. त्यात काय-काय कागदपत्रे अपूर्ण आहेत. का म्हणून तुम्ही देत नाही. किरकोळ गोष्टी असतात. काहीतरी असेल की, त्याची वाट लावायची. फाईलींची थप्पी पडलेली आहे. तिथून ती फाईल काढली तेव्हा दोन महिलांच्या फाईलींची दोन पाने खरेतर ती तिथून निघाली का घेताना तशी घेतली. महिलांची १० वर्षांची फाईल एवढी होते. तुम्ही त्यांच्या फाईलमध्ये बघा. पहिल्या वर्षाला चालू कामकाज बघा व शेवटच्या महिन्याचे कामकाज बघा. पाच वर्षांतले कामकाज बघा. १० वर्षे बँक अकाऊंट चालू आहे म्हणजे तो बचत गट १० वर्षे चालू आहे. पण इथे असे अजिबात नाही. किती महिलांना अपात्र केले गेले ते पण बघितले गेले पाहीजे. मला असे सांगायचेय की, आपण आज ही योजना अट शिथिल करण्यासाठी आणतोय. मग आपण आजपर्यंत किती विद्यार्थ्यांपर्यंत पोचलो आहोत. किती विद्यार्थ्यांना अनुदान दिले गेले पाहीजे, याचा खुलासा करा. अष्टीकर साहेबांचा काय संबंध. त्या पोस्टसाठी कोणीतरी नेमलेय ना. त्या अधिका-यांना सांगावे. अष्टिकर साहेबांनी का म्हणून खुलासा केला. हे चुकीचे आहे का नाही. जर त्या खुर्चीवर कोणीतरी अधिकारी आहेत तर त्या अधिका-यांनी खुलासा केला नाहीतर त्या अधिका-याला समजणारच नाही. आम्ही त्यांना फोन केला की, या विषयाची अशी अशी फाईल आहे. तर त्या म्हणतात आम्हाला माहित नाही. जसे आत्ता माजी चेअरमन यांनी सांगितले की, त्यांनी एका डॉक्टरला फोन लावला की ते म्हणतात मला नाही माहित. तसेच या म्हणणार मला नाही माहित. मा.आयुक्त साहेब, मग काय करायचे. तुम्ही आम्हाला या गोष्टींत खुलासा करु शकता का. किती विद्यार्थ्यांना मानधन दिले गेले आणि किती विद्यार्थी आज प्रतिक्षा यादीत आहेत, याचा खुलासा झाला पाहीजे. मुले शिकली पाहीजेत. मुलांना प्रशिक्षण दिले गेले पाहीजे. याची यादी सांगा. का एखादा बँकेतला शुल्लक पेपर दिसत नाही म्हणून चार महिने ती फाईल अपात्र म्हणून काढून घेतात. हा आपल्या महापालिकेची काम करायची पद्धत आहे का. त्या लोकांना लगेच त्या त्या दिवसाची फाईल वेगळी करायला सांगा. मा.आयुक्त साहेब, आम्ही सुद्धा मागे म्हणालोय की, खरेच त्या डिपार्टमेंटमधल्या सगळ्यांचा एकदा बदल्या करा. एकेकाला झोनवाईज पाठवून द्या. एकाच

ठिकाणी ठेवलेय. कोणाची काम करायची मनाची तयारी नाही. आजपर्यंत महिला बालकल्याणचे बजेट चांगले आहे. आजपर्यंत खूप चांगल्या योजना राबवल्या आहेत. इथून पुढे अनेक चांगल्या योजना आणा. परंतू त्या हातावेगळ्या केल्या गेल्या पाहीजेत. एक कागद,एक नंबर,एक शब्द, एखादे पान. साहेब, दहा वर्षांच्या बचत गटांची जर अशी बॉक्स फाईल असेलतर त्यातले एक पान आम्ही दिले होते. ते दोन्ही बाजूंनी तुमच्याकडून काढले गेले नाही हे कशावरुन. म्हणून तुम्ही पहिले वर्ष, दुसरे वर्ष असा दहा वर्षे बचत गट चालू आहे का नाही हे बघून घ्या. या वर्षात ही एन्ट्री नाही. या महिन्यात ही एन्ट्री नाही, या महिन्यात हा शब्द नाही, हे खूप चुकीचे आहे. नुसतेच आमच्याकडून अनुदान मंजूर करुन घेऊन या मुलांना बेनेफिट पण मिळाला पाहीजे. आणि खुलासा करताना त्या डिपार्टमेंटचे जे हेड आहेत, त्यांना खुलासा करायला सांगा. आजपर्यंत यासाठी किती जणांनी अर्ज केला, किती जणांनी अनुदान दिले, आत्ता वेटींगला किती आहेत आणि त्यांना अपात्र का केले गेलेय याचा खुलासा झाला पाहिजे. नाहितर आम्ही ओरडून काही उपयोग नाही.

**मा.झामाबाई बारणे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, खरेतर आज नागरवस्ती विभागातील जो काही अनुदानाचा विषय आहे. मी प्रथम तापकीर ताईंचे अभिनंदन करते. मा.प्रमोद कुटे यांनी उपसूचना मांडली, मी त्यांचेही अभिनंदन करते. आपण नागरवस्ती विभागातून अनेक योजना राबवत असतो. मग विद्यार्थ्यांसाठी योजना असो किंवा महिला बालकल्याणमधून विधवा महिलांना अनुदान देण्याची योजना असो. किंवा अन्य ज्या काही कोर्समार्फत योजना राबवतो. खरेतर या योजना पिंपरी चिंचवड शहरात चांगल्या पद्धतीने राबवत असताना महिलांना एक वेगळे व्यासपीठ मिळालेले आहे. मग बचत गटांमार्फत असो, व्यावसायिकांमार्फत असो, बचत गटांतील महिलांनी काही काही ठिकाणी व्यवसाय स्थापन केला आहे. त्यांना काही ठिकाणी बाजारपेठ मिळू शकत नाही. आपण त्यांच्यासाठी चांगल्या प्रकारच्या योजना राबवतो. पण त्या महिलांना योग्य मार्गदर्शन मिळाले पाहीजे, ते मिळत नाही. विद्यार्थ्यांना चेक देण्यासाठी हा विषय मांडला आहे. यात गैरप्रकार होईल का असे मा.सचिन चिखले यांनी विषय मांडला आहे. पण त्यात असे काही होऊ शकणार नाही. ज्यांच्या अटी शर्ती पूर्ण झाल्याशिवाय तो चेक जाणार नाही असे आत्ताच तापकीर ताईंनी सांगितले. मी नागरवस्ती विभागातील अधिका-यांना एवढे सांगु इच्छिते की, विधवा महिलांच्या फाईल घेतात. त्यात अगोदरच त्यांना एक पोच म्हणून पावती देतो. पोच देत असतानाच जर ती फाईल चेक केली तर पात्र का अपात्र कळाले की, त्या त्यांच्या कागदपत्रांची पूर्तता करु शकतील. परंतू आत्ता मा.मंगलाताई कदम यांनी सांगितले की, यात ८ महिने/वर्ष जाते. मग आम्हाला आपल्याला सांगायला लागते. मी स्वतः जाऊन अधिका-यांकडून माहिती घेत असते. कागदपत्रे जोडली गेली नाहीत. रेशनकार्ड जोडले गेले नाही. ही फाईल आधी घेत असताना अपात्र

सांगितले तर कुठला कागद चुकला असेलतर ती महिला तो देऊ शकते. त्या आमच्याकडे चकरा मारतात की, माझा चेक कसा मिळाला नाही. परंतू पोच देतानाच फाईल घेतानाच पोच द्यायची का नाही याची दक्षता त्या भागातल्या अधिका-यांनी काळजीपूर्वक घेतली पाहीजे. खूप दिवस झाल्यानंतर त्या महिला अनेक नगरसेवकांकडे जात असतील, आमच्या महिला भगिनांकडे जात असतील. परंतू त्यांना वाटते की, आमची फाईल मंजूर आहे. मग आम्हाला चेक का मिळू शकत नाही. असे नाही पाहीजे. त्यांना कुठल्याही कागदपत्रांची पूर्तता असल्याशिवाय पोच देऊ नये. पिंपरी चिंचवड महापालिकेत अनेक जाती धर्माचे लोक आहेत. मा.प्रमोद कुटे यांनी उपसूचना केली, त्याला मी सुद्धा अनुमोदन देते. सर्व जातीधर्मांच्या विद्यार्थ्यांना लाभ मिळाला पाहीजे अशी आपल्याला विनंती करते. धन्यवाद.

**मा.हिराबाई ऊर्फ नानी घुले** -मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, आमच्या प्रभागातला गणेशनगर रस्ता ताब्यात येऊन देखील चार नगरसेवकांनी मागणी करुन सुद्धा काहीच झालेले नाही. गावठाणातला १२ मी. रस्ता ताब्यात आलेला नाही.

**मा.महापौर** – हा विषय विषयाला धरुन नाही.

**मा.हिराबाई ऊर्फ नानी घुले**-मा.महापौर साहेब, गावठाणातला १२ मी. बाजूचा रस्ता ताब्यात आलेला आहे. त्याची पण दखल घेतलेली नाही. त्याच्या कामाची मागणी केली आहे. तिथेसुद्धा काहीच झाले नाही. उघड्यावर पाणी जाऊन दलदल होऊन एक माणूस मरण पावला आहे. पेपरमध्ये बातमी आली होती. तरीसुद्धा दखल घेतली नाही, ही दखल घ्यावी. सायकलींसाठी, मशिनसाठी, ड्रायव्हींग स्कूलसाठी जवळजवळ ४०० महिलांनी अर्ज भरला आहे. त्यातल्या ५० सुद्धा पात्र झालेल्या नाहीत. आज प्रत्येक महिलेला वाटते. त्या उत्साहाने करतात. एवढ्या महिला कशा अपात्र झाल्या असतील. त्या महिलेला सांगायला पाहीजे की, असे असे अपूर्ण आहे. हे तसंच ठेवतात. प्रत्येक बाई वाट पाहत असते की माझे नाव कधी येईल. तिला अपेक्षा असते की, माझे सुद्धा नाव आज ना उद्या यावे. याची काळजी घ्यावी. प्रत्येक बाईला सांगावे. मी एवढेच सांगते व थांबते.

**मा.निता पाडाळे**- मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, मला आपल्याला इथे एक विनंती करायची आहे की, १० वी, १२ वी च्या ८० टक्के, ९० टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना आपण दहा हजार, पंधरा हजार देतो. या वर्षी सगळ्या विद्यार्थ्यांना ईसीएसद्वारे पैसे द्यायला सांगितले होते. परंतू इतका प्रॉब्लेम होतो आहे. काही विद्यार्थ्यांचे दोन महिन्यांपूर्वी पैसे जमा झाले होते तर काही विद्यार्थ्यांच्या अकाऊंटला अजूनही पैसे जमा झालेले नाहीत. आम्ही प्रत्येक वेळी पासबुक घेऊन यायचे. अधिका-यांना दाखवायचे. दहा दिवसांत होईल, आठ दिवसांत होईल. शेवटी त्यांनी त्या दिवशी ७/८ विद्यार्थ्यांचे चेक काढून दिले. परंतू माझी महापौर साहेबांना विनंती आहे. नागरीकांना व सगळ्या नगरसेवकांना खूप त्रास होतो आहे. आपण आयुक्त साहेबांकडून खुलासा करुन घ्यावा की, पूर्वी ईसीएस न करता सगळ्यांना

चेकद्वारे वाटप केलेतर सगळेच फायदेशीर होईल. जेणेकरुन आपल्याला त्या विद्यार्थ्यांच्या हातात चेक आणून देता येईल. त्याचबरोबर फोर व्हिलर ड्रायव्हींगचे सगळे फॉर्म भरुन घेतले. त्यात ज्या महिला पात्र झाल्या आहेत, त्यांना या मोटर ड्रायव्हींग स्कूलवाल्यांनी सगळे डॉक्युमेंट घेऊन ऑफिसमध्ये बोलवले होते. त्या महिलेने पालिकेमध्ये फॉर्म भरला, ती पात्र झाली. पॅन कार्ड, रेशन कार्ड,आधार कार्ड. त्या महिलेचे एकजरी डॉक्युमेंट नसेलतरी ते स्पष्ट सांगतात, तुमचा फॉर्म भरणे शक्य नाही. मग हे असे का. डबल डबल डॉक्युमेंट का. साईराज मोटर स्कूलवाल्यांनी प्रत्येक महिलेकडून मेडीकलसाठी रु.१५०/- भरुन घेतले आहेत. आपण दोन संस्थांना ते काम दिले आहे. पण एका संस्थेने दिडशे रुपये घेतले नाहीत. काही महिला त्या मोटर ड्रायव्हींग स्कूलवाल्याकडे येतात. शेजारी शेजारी राहणा-या असतात. आमचे दीडशे रुपये घेतले नाहीत मग तुमचे कसे दीडशे रुपये घेतले आहेत. मी झगडे मॅडमकडे सुद्धा महिलेच्या नंबरसहित दिले होते. त्यांना सांगितले होते की, असा असा प्रॉब्लेम आहे. मॅडम म्हणाल्या, मी त्या महिलांना चौकशी करुन सांगते. मग आता नक्की काय करायचे याचा खुलासा झगडे मॅडम यांनी इथे करावा अशी मी विनंती करते.

**मा.उषा मुंढे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, महिला बालकल्याण हा विषय महिलांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. मी अध्यक्षा मा.सुनिताताई तापकीर यांचे अभिनंदन करते. त्यांनी महिलांसाठी वेगवेगळे नियोजन करुन महिला बचत गटांना अनुदान द्यायचे असेल. आता तीन तीन चार चार वर्षे फाईली पडलेल्या आहेत. मा.मंगलाताई कदम मी तुमचे कौतुक करते की तुम्ही ही गोष्ट मान्य केली की, गेले १०/१० वर्षे फाईली पडून आहेत. तरीसुद्धा महिला बचत गटांनी अनुदानासाठी ज्या फाईल केल्या आहेत, त्याकडे कोणीच लक्ष देत नाही. नागरवस्ती विभागातील एकही अधिकारी जागेवर नसतो. माझ्याकडे महत्वाचे पुरावे आहेत. मी ज्यावेळी नागरवस्ती विभागात जाऊन महिला बचत गटांची माहिती घेतली, त्यावेळी एक/दोन अधिकारी सोडलेतर कोणीही उपलब्ध नसते. मी अहिवले साहेबांकडे माहिती मागितली होती. या माणसाला बोलून पण काही उपयोग नाही. कितीतरी वेळा जाऊन महिलांनी त्यांच्याकडे विनंती केली तर, ते म्हणतात ताई, माझ्याकडे काही नाही. बचतगटांचे असेल, विधवा महिलांचे असेल, शिष्यवृत्तीचे असेल, सायकलचे असेल, त्या त्या कामगाराला बोलवणार आणि विचारणार हे काय झाले, ते काय झाले. त्याची कुठलीही अंमलबजावणी होत नाही. नागरवस्ती विभागाकडून समाधानकारक काम केले जात नाही. आता झगडे ताई आल्या आहेत. जेव्हापासून झगडे ताई आल्या, मी वारंवार विनंती करते की, महिला बचत गट हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. आपण रु.५०,०००/- अनुदान केले. तुम्ही २०१४-१५ च्या फाईली काढायला लावल्या तर तुम्हाला एकही फाईल जागेवर ठेवलेली मिळणार नाही. २०१३-१४ मध्ये जा बचत गटांच्या फाईल केल्या, त्यातली एकही फाईल तुमच्याकडे नसेल आणि महिला बचत गटांनी फाईलमधल्या त्रुटी काढून त्या फाईल तीन तीन चार चार वेळा देऊन सुद्धा त्यांना अनुदान मिळत नसेलतर कितीही कोटींची तरतूद त्यासाठी ठेवली तरीसुद्धा त्याचा काय फायदा आहे. गरीब महिला बचत गटाचे काम करत असताना त्यांना अडचण येत असेल, त्यांना त्याचा फायदा मिळत नसेलतर नागरवस्ती विभागात जे अधिकारी काम करतात, त्यांच्याकडून

माहिती घेऊन, आत्ता हा जो विषय आला आहे त्या विषयाची संपूर्ण माहिती द्यावी अशी विनंती आहे.

**मा.अनुराधा गोफणे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, आज याठिकाणी विषयपत्रिकेवर नागरवस्ती विभागाचा अतिशय चांगला विषय आलेला आहे. तसेच आपलेच सहकारी मा.प्रमोद कुटे, मा.सुनिता तापकीर यांनी हा चांगला विषय मांडला आहे. मी खरोखरच कौतुक करते. पिंपरी चिंचवड महापालिकेत नागरवस्ती विभागाअंतर्गत ज्या योजना चालतात. परंतु सर्व योजना नागरीकांपर्यंत पोहचत नाहीत. यात पात्र अपात्र असे दोन भाग पडतात. मा.आयुक्त साहेब, मी आपल्याला नम्र विनंती करते की, या योजना राबवताना सायकल असेल, मशिन असेल, शिष्यवृत्ती असेल, १०वी, १२वीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देतो, १० वी च्या विद्यार्थीनींना क्लासची फी म्हणून मानधन देतो. आपण स्क्रुटीनीनुसार फॉर्म गोळा करतो. परंतू नागरीकांपर्यंत, मुलांपर्यंत ते पोहतच नाहीत. आज १० वी, १२ वी चे फॉर्म भरुन घेतले आहेत. हिच मुले पुढे जातील. तरीदेखील त्यांचे चेक त्यांच्यापर्यंत पोचले गेले नाहीत. नागरवस्ती विभागात काम करण्यासाठी चांगला स्कोप आहे. परंतू हे लोक मनापासून काम करत नाहीत. मा.आयुक्त साहेब, मला एक गोष्ट सांगायची आहे की, आपण या वर्षी महिलांना शिवण यंत्र वाटप, सायकल वाटप साठी फॉर्म भरुन घेतले आहेत. त्यात सायकलचे व शिवण मशिनचे कोटेशन भरुन घेतले आहेत. त्यानंतर आपण एक महिन्याने परत एकदा जाहीरात दिली होती की, कोटेशन न जोडता आपण फक्त फॉर्म भरावेत व फक्त पासबुकची झेरॉक्स जोडावी असे केले आहे. सन २०१६-१७ ला इलेक्शनच्या काळात दीड हजार काऊंटडाऊन आला होता. त्या वाटून झाल्यानंतर बरेचसे विद्यार्थी पात्र झाले. परंतू त्यांना कुठलाही लाभ मिळाला नाही. सायकल मिळाली नाही. आणि त्याचे पैसेही मिळाले नाहीत. असे २०१६-१७ चे विद्यार्थी तसेच आहेत. अशा विद्यार्थ्यांचे काय करायचे. मा.आयुक्त साहेब, मला या प्रश्नाचे उत्तर द्या. ज्या मुलांनी फॉर्म भरले, जे पात्र झाले. ज्यांना कुठलाच लाभ मिळाला नाही. अशा विद्यार्थ्यांना आपल्याकडून मेसेज जाऊ द्यात की, तुमच्या बँकेचे पासबुक आणून द्या. आणि तुम्हाला सायकलची जी रक्कम आहे ती आपण देणार आहोत. परंतू सन २०१६-१७ ला ज्या मुलांनी फॉर्म भरले आहेत, त्या मुलांना देखील या योजनेचा लाभ मिळाला पाहीजे. मा.आयुक्त साहेब, मी आपल्याला विनंती करतो की, प्रत्येक योजनेत जे अपात्र होतात. विधवा महिला असतील, बचत गट असतील. आत्ताच मा.उषा मुंढे ताई बोलल्या. या पूर्वीचे जे बचत गट आहेत. त्यांनी फाईली दिल्या आहेत. त्यांना तीन तीन वेळा फाईल देऊन सुद्धा त्यांना अनुदान मिळत नाही. ते नागरवस्ती विभागाकडे पुन्हा येतात. आपल्या नागरवस्ती विभागाकडून फाईली सुद्धा मिळत नाहीत. सगळ्या फाईली गहाळ झाल्या आहेत. माझ्या प्रभागातल्या महिल्यांचा फाईली गहाळ केल्या आहेत. त्यांनी पुन्हा तुमच्याकडे अनुदानासाठी अर्ज केला आहे. आपल्या नागरवस्ती विभागातील एक कर्मचारी आहेत. त्यांच्याकडून नागरीकांना अजिबात चांगली वागणूक मिळत नाही. आपण नागरवस्ती विभागाला स्ट्रीक्टली वॉर्न करावे व चांगले काम करायच्या सूचना द्याव्यात. धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, खरेतर हा आमच्या सगळ्यांच्या आवडीचा विषय असल्याकारणाने महिला भगिनी असतील, बंधू असतील. या सगळ्यांना प्रभागात काम करण्यासाठी डायरेक्ट वन टू वन संबंध येतो. म्हणून सगळ्यांना या विषयावर बोलायचे आहे. सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा.महापौर साहेब, आपण आजपर्यंतची प्रकरणे पाहिलीतर, मागील पाच वर्षात मी नगरसेविका होते. आता हे माझे सहावे वर्ष आहे. प्रत्येक वेळी तीच तीच प्रथा, पुन्हा पुन्हा त्याच चूक. दर वर्षी यावर आपण बोलत असतो. या वर्षी हे कुठेतरी थांबावे, कुठेतरी बदल व्हावा अशी अपेक्षा होती. तरीसुद्धा त्यात म्हणावा तसा बदल झाला नाही, हे सुद्धा सांगावे लागते आहे. वास्तविक पाहता, मागील वर्षी इलेक्शन होत्या. त्या आधी चेकस् निघाले पाहिजेत यासाठी किमान तीन महिने तरी संबंधित अधिकारी यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केल्यानंतर दि.६ डिसेंबरला तो विषय मंजूर झाला होता. मागील वर्षी विषय मंजूर झाला होता. आज मात्र मार्च महिना आहे. माझ्यासारखे अनेक नगरसेवक असतील, जे या अधिका-यांचा पाठपुरावा करत असतात. पाठपुरावा करताना एकच विषय असतो की, आम्ही हे जे फॉर्म भरतो. ऑफिसमध्ये भरतो. या फॉर्मची जी काही रक्कम असेल, जे काही चेक असतील ते माझ्या हस्ते मिळावेत. शंभर टक्के नो डाऊट ही महापालिकेची योजना आहे. परंतू हे करत असताना कुठेतरी आमचा सहभाग, नागरीकांचे योगदान या सगळ्यांचे कुठेतरी संमिश्रित म्हणून आम्हाला करायचे असते. मा.आयुक्त साहेब आपल्याला खुलासा द्यावा लागेल. सन्मा.आयुक्त साहेब, आज मार्च महिना उजाडला तरीसुद्धा याचा पाठपुरावा का केला गेला नाही. आजही पहिले ईसीएस झाले असेल तरी ते फक्त जे पात्र आहेत त्यांचे होणार आहे. प्रभाग क्र.१ पासून प्र.क्र.३२ पर्यंत कोणत्याही नगरसेवकाला अपात्रची कारणे मिळाली नाहीत. एका योजनेचे कमीत कमी चारशे चारशे फॉर्मस् आम्ही प्रभागात असतो. यानंतर जर तुम्ही म्हणत असाल की आम्ही चेक वाटप करु शकत नाही. शासनाचा कोणत्या प्रकारचा जी.आर. आहे, त्याच्यावर काय पर्याय आहे. त्याच्यावर सुद्धा विचार होणे शंभर टक्के गरजेचे आहे. तुम्ही म्हणता की, नागरीकांचे फॉर्म आम्ही का भरतो. तर आम्हाला चांगले माहित आहे की, या ऑफिसमध्ये आल्यानंतर कोणत्या पद्धतीची वागणूक मिळते. तीन/ चार हजाराच्या चेकसाठी त्या नागरीकाने आपल्या ऑफीसपर्यंत दहा वेळा चकरा मारणे, नोकरीला खाडा करणे ही काही परवडणारी गोष्ट नसते. त्यामुळे फॉर्म भरल्यानंतर आम्ही नगरसेवक त्याचा पाठपुरावा करत असतो. मग आपल्यात सुधारणा का होत नाही. आज आपल्याकडे वरती टेक्नॉलॉजी डिपार्टमेंट आहे. त्यांच्याकडून पाठपुरावा का केला जात नाही. समजा एक्सवायझेड नागरीकाने फॉर्म भरला तर त्याची स्क्रूटीनी एक महिन्यात झालीच पाहीजे. त्याला आपल्याकडून मेसेज गेला पाहीजे की, या या कारणासाठी फॉर्म कसा काय रद्द ठरतोय. आपल्या ऑफीसमध्ये चार वेळा चकरा का माराव्या लागतात. काय कारण आहे. कोणत्याही नगरसेवकाला विचारा. मग तो नवीन नगरसेवक असेल किंवा ज्येष्ठ नगरसेवक असेल. आम्ही जेव्हा दहा दहा वेळा जातो. तेव्हा कुठेतरी दमदाटी केल्यानंतर आम्हाला एखाद्या विषयाची माहिती मिळते. मग ते या योजनांचा ख-या अर्थाने पाठपुरावा करतात. बाकीच्यांचे काय होत असेल. आपण चांगल्या प्रकारची योजना का आणत नाहीत. यात चांगली यंत्रणा आणत नाहीत. तुमच्याकडून या गोष्टींचा पाठपुरावा का केला जात नाही. नागरी सुविधा केंद्रात पावती फाडल्यानंतर सरळ सरळ सांगितले जाते की, त्यांच्याकडून फॉर्मच येत नाहीत. ही काय

आमची जबाबदारी आहे का. सत्तेत असलो काय आणि विरोधात असलो काय. ही काय आमची जबाबदारी नाही. ज्यावेळी आम्ही नगरसेवक म्हणून फॉर्म भरत असतो, तेव्हा नागरीकही फॉर्म भरत असतात. हे फॉर्म त्यांच्याकडून आपल्या महापालिकेत मागवून घेण्याची जबाबदारी ही त्या संबंधित अधिका-याची आहे. ते का दिले जात नाहीत. आमची महिला बचत गटाची एखादी फाईल दिली असेलतर त्यात काय त्रुटी आहेत हे आम्हाला एसएमएसद्वारे का कळवले जात नाही. प्रत्येक वेळी नागरीकांना दोषी ठरवायचं. हंड्रेड पर्सेंट, नो डाऊट नागरीकांनी पण चांगल्या प्रकारे फॉर्म भरला पाहीजे. ते एवढे सक्षम असतील तर शिपाई साहेब पण फॉर्म भरतील ना. त्यांना पण तीन हजार रुपये चार हजार रुपये हवे आहेत. म्हणून तर ते फॉर्म भरतात. त्यांना ते समजत नाही. तुमच्या अटीशर्तींतल्या काही बाबी त्यांच्या लक्षात येत नाहीत. तुमचे शब्द त्यांना कळत नाहीत म्हणून तर ते तुमच्यापर्यंत येऊ शकत नाहीत. ते चांगल्या प्रकारे फार्म भरु शकत नाहीत. मग तुम्ही सगळे हुशार मंडळी आहात. अत्यंत सुज्ञ अधिकारी म्हणून तुम्ही जबाबदारीने काम पाहता. मग तुमच्याकडून नागरीकांना एसएमएस जावा ही तुमची सुद्धा जबाबदारी आहे. मा.आयुक्त साहेब, आत्ता हा जो ईसीएसचा विषय केला. सभागृहात काही जणांना शंका होती की, यात गैरव्यवहार होऊ नये. निश्चितपणे तो झालाच नाही पाहीजे. त्यातले तात्पर्य एकच आहे की, ज्यावेळी बिल होते. अकाऊंटला पैसे जमा होतात. त्यावेळी जी करंसी असेल, डॉलरमध्ये जो काही रेट असेल, त्या करंसीत रुपये रुपांतर होत असताना आपल्याकडील दीड लाख रुपयाची अमाऊंट कधी कधी ७० हजार, ८० हजार तर कधी कधी ६० हजार पर्यंत जाते. त्यावेळी आपल्या शहरातील नागरीकांचा लॉस होतो. हे होऊ नये म्हणून याठिकाणी हा अत्यंत चांगला विषय आला आहे. परंतू हे करत असताना, या पुढील काळात या योजनांचा पाठपुरावा केला नाहीतर आमच्यातला कोणताही नगरसेवक तुम्हाला माफ करणार नाही. या योजना राबवताना काय यंत्रणा राबवता येईल, काय पर्याय वापरता येईल, याचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. आपण आज मार्च एण्डला चर्चा करतोय. पुढील वर्षासाठी जे काही फॉर्म निघतात. शाळांचा निकाल मे मध्ये लागतो. त्यामुळे हे फॉर्म मे मध्ये निघाले पाहीजेत. साधारणतः जून एण्डला फॉर्म निघालेच पाहीजेत. परंतू असे कधीच होत नाही. महिला बालकल्याण समितीच्या सभापती असतील, या सगळ्यांनी पाठपुरावा करायचा. फॉर्म छापले का नाहीत, फॉर्म निघाले का नाहीत, फॉर्म गेले का नाहीत हे विचारायचे. हा खेळ का करायचा. जून मध्ये निकाल लागतो हे सगळ्यांना ज्ञात आहे. तरीपण आजपर्यंत हेच सगळं चालू आहे. १५ जूनला शाळा सुरू होतात. तर २० जून पर्यंत फॉर्म निघालेच पाहीजेत. का निघत नाहीत. मग नगरसेवकांनी मुदतवाढ दिली सांगायचं. आम्ही शंभर टक्के मुदतवाढ देतो कारण आम्हाला नागरीकांना सांभाळायच आहे. आम्ही पंधरा दिवस, आठवड्याची मुदतवाढ दिलीतर ते ऑटोमॅटीक मॅच झाले पाहीजे. २० जूनला सगळे फॉर्म निघतील. २० जूनलाच निघाले पाहीजेत. आम्ही स्टँडींग मिटिंगमध्ये ठराव केला होता. अहिवले साहेबांना सांगितले होते की, सगळ्या शाळांचे मुख्याध्यापक आहेत त्यांच्या ताब्यात हे फॉर्म द्या. शिक्षकांना सुद्धा दिले पाहीजेत. नगरसेवक म्हणून आम्ही काम करतोच. नागरवस्ती विभागाच्या योजना अधिक चांगल्या पद्धतीने राबवायच्या असतीलतर आपण अधिक कार्यक्षमतेने काम करणे गरजेचे आहे. २० जूनला फॉर्म दिले पाहीजेत. एक महिन्याची मुदत दिल्यानंतर जुलैमध्ये हे फॉर्म संपले पाहीजेत. नगरसेवकांनी मुदतवाढ दिलीतर २० ऑगस्ट

पर्यंत पूर्ण क्लिअर झाले पाहीजे. सप्टेंबर,ऑक्टोंबर, नोव्हेंबरपर्यंत या योजनेवर पडदा पडला पाहीजे. आज मात्र मार्च उजाडतो. ज्या विद्यार्थ्यांनी मागच्या वर्षी पेपर दिले, त्यांना मार्क मिळाले. त्यांचे कौतुक करायचे, त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप द्यायची. ते आजपर्यंत आम्ही देऊ शकत नाही. दूसरा विषय असा आहे की, शैक्षणिक साहित्य देण्याची जी योजना आहे. म्हणजे जो विद्यार्थी ९ वी पास होतो. १० वीत पदार्पण करतो. त्याला १० वी चे शैक्षणिक साहित्य देण्यासाठी आपण त्याला पैसे देतो. १० वी ची परीक्षा संपली, परीक्षेचा निकाल लागलातरी अजून आपण त्याला पैसे देतोय. अशाप्रकारे योजना राबवायच्या असतील, किंवा आपल्याला जर योजना राबवता येत नसतीलतर त्या योजना बंद करा. मला वाटतेय, मी माझा बंद करा हा शब्द मागे घेते. या योजना बंद कराव्यात असे माझे मत नाही. योजना बंद करण्यात काही मजा नाही. ज्या अधिका-यांना काम करायचे नसेलतर त्यांनी खुर्ची सोडावी, तिथे काम करु नये. सन्मा.आयुक्त साहेब, या पुढील काळात या पद्धतीने करावे. या विषयाची रचना, नागरवस्ती विभागात एक डिसिप्लिन, कार्यक्षमतेने काम केले पाहीजे या दृष्टीने पाठपुरावा करावा आणि हा विषय मंजूर करावा अशी मी विनंती करते. धन्यवाद.

**मा.प्रियांका बारसे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, मला याठिकाणी एक सूचना करायची आहे. आत्ता ज्यांनी मते मांडली, त्या सर्वांच्या मताशी मी सहमत आहे. माझ्या प्रभागातल्या दोन घटना तुम्हाला सांगायच्या आहेत. मला एका महिलेने तक्रार केली आहे की, दोन वर्षांपूर्वी शिलाई मशीनसाठी ज्यांनी अर्ज केला होता. ऑनलाईन पाहिल्यानंतर मशीन मिळाली असा त्याठिकाणी मेसेज दिसतो. प्रत्यक्षात त्या महिलेला शिलाई मशीन मिळालेली नाही. मग हे कसे शोधून काढायचे की, मशीन कोणाला मिळाली. त्या महिलेला लाभ मिळण्यासाठी काय केले पाहीजे. ई-मेल द्वारे आणि प्रत्यक्ष येऊनही हे दोन्ही प्रश्न मी नागरवस्ती विभागाला,आपणाला आणि आयुक्त साहेब यांना दिले आहेत. आणि माझा दूसरा प्रश्न असा आहे की, आपण नागरवस्ती विभागाला फॉर्म भरण्यासाठी परवानगी दिलेली आहे. आम्हाला ही परवानगी नाही. पण माझ्या प्रभागातल्या २१ महिलांचे नागरवस्ती विभागाने फॉर्मच भरलेले नाहीत. गठ्ठा बाजूलाच पडून राहीलाय. महिला बालकल्याणच्या ज्या सोयीसुविधा आहेत त्या या महिलांना मिळणार नाहीत. याला कोण जबाबदार आहेत. हा प्रश्नही मी आपल्याला मेलद्वारे विचारला आहे. आपला डिजिटल इंडिया आहे. त्यामुळे मी प्रत्यक्ष येऊन माझा वेळ न घालवता ई-मेल द्वारे बोलते. त्यामुळे आपणाकडून उत्तरे सुद्धा आम्हाला ई-मेल द्वारेच मिळतील. म्हणजे पटकन संवाद होईल असे मला वाटते. धन्यवाद.

**मा.महापौर** – मा.झगडे, सहा.आयुक्त, नागरवस्ती विभाग यांनी या विषयावर आपले स्पष्टिकरण द्यावे.

**मा.झगडे**(**सहा.आयुक्त, नागरवस्ती विभाग**)-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, या चर्चेच्या अनुषंगाने विविध प्रश्नांवर खुलासा मागितलेला आहे. वेगवेगळ्या प्रकारचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. आणि पात्र व अपात्र बद्दल माहिती विचारली होती. त्यात प्रथमतः दहा वर्षे पूर्ण

झालेल्या बचत गटांना अर्थसहाय्य देणे - यात विभागाकडे एकूण १४८ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यातील ५५ पात्र व ९३ अपात्र आहेत. १० वी तील ८० टक्के व ९० टक्के गुण मिळवणा-या विद्यार्थ्यांना बक्षिस देणेबाबत – यात ८१३ अर्ज पात्र व ५५ अर्ज अपात्र झाले आहेत. १० वी तील ९० टक्केंपेक्षा जास्त गुण मिळवणा-या विद्यार्थ्यांना बक्षिस देणेबाबत – यात एकूण १२७० अर्ज प्राप्त झाले. त्यातील १२१५ अर्ज पात्र व ५५ अर्ज अपात्र झाले. या व्यतिरिक्त आजचा जो विषय आहे, परदेशात उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य – यासाठी ८ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी ७ जण पात्र आणि एकजण अपात्र झाला. चर्चेच्या अनुषंगाने विषय झाला की, अपात्र अर्जांबाबतची माहिती हवी असते. तर मी त्याबाबत सध्या जी ऑनगोईंग प्रोसेस आहे त्याबद्दल नम्रपणे सांगू इच्छिते की, पहिल्यांदा अर्ज मागवले जातात. दि.२० जानेवारी पर्यंत अर्ज मागवण्याची मुदत होती. त्यानंतर अर्जांची वेगवेगळ्या टप्प्यांवर छाननी केली जाते. त्यातून पात्र व अपात्र अशा हार्डकॉपीज केल्या जातात. पात्रची डेटा एन्ट्री केली जाते. आपण हे काम आऊटसोर्स केले आहे. डेटा एन्ट्री केल्यानंतर मार्च एण्डपर्यंत पात्र लाभार्थ्यांना प्राधान्याने लाभ देण्यात यावा. त्यामुळे आपण पात्रची यादी प्राधान्याने करुन घेतो. त्यानंतर पात्रचा लाभ इसीएस द्वारे देण्यात आल्यानंतर अपात्रची यादी डेटा एन्ट्री करतो. त्याची पुन्हा एक यादी इसीएस करण्यासाठी बनवतो.

फोर व्हिलर ट्रेनिंगबाबत प्रभागनिहाय यादी केली होती. त्याव्यतिरिक्त इतर योजनांची प्रभागनिहाय यादी करण्यात आली नव्हती.

**मा.सुजाता पालांडे-**मा.महापौर साहेब,अ,ब,क,ड,इ,फ,ग,ह असे जे प्रभाग आहेत, त्या प्रभागांनुसार तुम्ही फॉर्म भरता. लाभार्थी असतील त्यांचे फॉर्म भरुन घेता. त्या फॉर्ममध्ये वॉर्ड म्हणजे प्रभाग क्रमांक विचारला जातो. माझ्या प्रभागातले लोक प्र.क्र.२० असे टाकतात. तुम्ही ती यादी आम्हाला देता. तुम्ही पात्र अपात्र यादी असे प्रभागनिहाय का देता. अ,ब,क,ड,इ,फ असे का देता. आमच्या वॉर्डनुसार दिले गेले पाहीजे.

**मा.निता पाडाळे** - दोन मोटर ड्रायव्हींग स्कूलमधील एकाने महिलांकडून दीडशे रुपये घेतले आहेत आणि दुस-याने घेतलेले नाहीत. मग त्याने दीडशे रुपये कसे घेतले? दोघांना वेगवेगळ्या अटी-शर्ती लागू आहेत का? तुम्हाला महिलांचे सुद्धा फोन आले होते.

**मा.झगडे** (सहा.आयुक्त, नागरवस्ती विभाग)-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, सन्मा.सदस्यांनी यादीबाबतचा जो विषय मांडला आहे. त्याबाबतीत आपण कॉम्प्यूटराईज्ड यादी केल्यानंतर त्याला फिल्टर लावून प्रभागनिहाय यादी करु शकतो. यात सुधारणा करुन आपल्याला प्रभागनिहाय यादी देता येईल.

**मा.महापौर** – तुम्ही सर्व माहिती द्या. नगरसदस्यांना जी काही अडचण असेल, ती सर्व माहीती आपण नगरसदस्यांना पुरवावी.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, महिलांना ड्रायव्हिंगचे ट्रेनिंग देण्यासाठी अर्ज मागवले होते. त्यातले बरेचसे अर्ज अपात्र झाले आहेत. ही अपात्रची कारणेही काही ठिकाणी अर्धवट दिलेली आहेत. मा.अष्टिकर साहेब तुम्ही ऑलरेडी हा विभाग बघत होता. तेव्हा आम्ही तुम्हाला सांगितले होते की, सगळ्या महिला भगिनींसाठी हा प्रेस्टीजस प्रोजेक्ट आहे. आजपर्यंत त्याठिकाणी आपल्याला विनंती केली होती की, कॅम्प लावून त्याठिकाणी त्यांना लर्निंग लायसन द्यावे. त्यासाठी आपण काय हालचाल केली आहे. नोव्हेंबर,डिसेंबरमध्ये विषय केला होता. आज मार्च महिना उजाडला आहे. अजूनही ट्रेनिंग चालू झालेले नाहीत. महापालिकेला कागदपत्रे दिली असतील आणि महापालिकेने प्रभागवाईज यादी दिली असेलतर त्याने पैसे घ्यायचे कारणच नाही. तो कशाला पैसे घेतोय. तुम्ही साईराज वाल्याला याठिकाणी खडसावून विचारले पाहिजे. कशाचे पैसे घेतोय. मेडीकलचे काय पैसे घेतेय. त्याने पैसे घ्यायचे काही कारणच नाही. त्यांचे जे काही म्हणणे असेल तर त्यांनी महापालिकेशी बोलावे. आपण जर पात्र अपात्रची यादी केली आहेतर त्याने प्रोजेक्ट चालू केला पाहीजे. मा.अष्टिकर साहेब त्यात पुढे काय झाले. मा.कमिशनर साहेब, आपण आरटीओ यांच्याशी बोलल्यानंतर त्यात पुढे काय झाले का. मा.महापौर साहेब, आपण खुलासा करायला सांगावा.

**मा.महापौर** – मा.आयुक्त साहेबांनी याबाबतीत खुलासा करावा.

**मा.महापालिका आयुक्त -** मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आत्ता जी सविस्तर चर्चा झाली, त्याच्या अनुषंगाने एकशे पन्नास रुपयांचा जो मुद्दा मांडला आहे. मा.सिमाताई सावळे यांनी यासंदर्भात जो प्रश्न विचारला आहे. यात उद्याच बैठक लावली आहे. यासंदर्भात अनेक भागांतून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. आज महापालिका सभा असल्यामुळे उद्याच्या बैठकीत यावर सविस्तर चर्चा करण्यासाठी वेळ दिला आहे. एक जण एकशे पन्नास रुपये घेतो आणि दुसरा घेत नाही. याबाबत त्याला निर्देशित करणारच आहोत की, एकशे पन्नास रुपये घेण्यात येऊ नये. आणि घेतले असतीलतर त्याने त्याची प्रत द्यावी लागते. कायदेशीर तपासणी करुन तसे सांगावे लागणार आहे. दूसरा मुद्दा आहे की, लर्निंग लायसन काढण्यासंदर्भात माझी आरटीओ यांच्याशी चर्चा झाली. महिलांना लर्निंग लायसन काढण्यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. आपल्या सगळ्यांची इच्छा होती की, तसा कॅम्प लावून महिलांना लर्निंग लायसन देऊ शकलोतर ते उत्तम होईल. आणि आपण तशी रिक्वेस्टही त्यांना केली होती. त्यांनी त्यांच्या पद्धतीत सुधारणा केल्यामुळे ऑनलाईन पद्धतीने अर्ज पूरवायला सुरुवात झाली आहे. यात त्यांच्याकडे कॅम्प लावायची तरतूद कुठेही नाही. त्यामुळे कॅम्प लावणार नसल्याचे त्यांनी आपल्याला कळवले आहे. यात त्यांनी आपल्याला ॲडीशनल टाईम आणि ॲडीशनल स्पेस उपलब्ध करुन देणार असल्याचे कबूल केले आहे. जस जसे अर्ज येतील, तस तसे त्यांनी सुरु करावे. त्याप्रमाणे त्यांना अर्जांचे फॉरवर्डींग दिलेले आहे. सकाळी अतिरिक्त कालावधीत त्यांच्याच माध्यमातून ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे त्यांनी आपल्याला आश्वासन दिलेले आहे. एजंट अप्रूव्ह करण्यासाठी त्यांची प्रक्रिया सुरु असल्याने कॅम्पमध्ये एजंट घुसण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून त्यांनी त्यांच्या स्तरावर कॅंप घेण्याची आपली रिक्वेस्ट नाकारली आहे.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर आम्ही खुलासा विचारल्यावर तुम्ही आम्हाला इथे सांगितले आहे. पण तुम्ही जर हा मेसेज आमच्याकडे कनवे केला असतातर, आम्ही सुद्धा सत्तेत आहोत, निश्चितपणे आम्ही मंत्रालयाचे दार वाजवू शकलो असतो. निदान आम्हाला परिवहन मंत्र्यांना सांगणे फार कठीण गेले नसते. आणि अश्या काही रेकमेंडेशन्स असतील, महिलांचा विषय असेलतर, शासन इतके उदासिन नाही की त्यांनी याची दखलच घेतली नसती. आपल्यातली आमच्यातली कम्युनिकेशन गॅप वाढतेय. महिला बाल कल्याण हा विभाग आमच्यासाठी असा विभाग आहे की, या विभागातून ख-या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी आम्ही जी काही पाऊले उचलतो. त्याठिकाणी त्याच विभागाकडून त्याच महिलांचे पाय ओढायचे काम होते. मा.आयुक्त साहेब, आम्ही तुम्हाला सांगितले होते की, मा.झगडे मॅडम नवीन आहेत. त्यांना तुम्ही ऑन फिल्ड जायला, नगरसेवकांशी बोलायला, नगरसेवकांशी कसे बोलले पाहीजे हे तुम्ही सांगा. हे आम्ही तुम्हाला सांगितले होते का नाही. अजूनही सुधारणा नाही. अधिकारी म्हणून त्या चांगल्या असतील, कधी चांगल्या असतील, जर त्यांना नगरसेवकांच्या प्रश्नांना उत्तरे दिली तर चांगल्या. मला मान्य आहे त्यांना एका दिवसात सगळी हिस्टरी जिओग्रॉफी कळणार नाही. तरीसुद्धा तुम्ही त्यांना त्या खुर्चीवर बसवायचा अट्टाहास का केला आहे. तुम्ही केला असेलतर काम करुन घ्यायची जबाबदारी पण तुमचीच आहे. त्यांना बोलायला सांगा. तरुण आहेत, यंग आहेत, डायनॅमिक आहेत. काहीच करत नाहीत. काही न करता तुम्ही जर म्हणत असाल की मला सगळेच पाहीजे. मला काम ही करायचे नाही तर असे चालणार नाही. मा.आयुक्त साहेब, दहा वर्षे झालेल्या बचत गटांना अनुदान देण्याचा विषय असेल, शिवण यंत्रांचा विषय असेल, रेग्युलर विद्यार्थ्यांना अनुदान देण्याचा विषय असेल, काहीच माहित नाही. मी बघते. बघते म्हणजे काय तुम्ही समजून घेतले पाहीजे. मॅडम तुम्ही तिथे समजून घ्या. हा विभाग अत्यंत सेन्सिटीव्ह आहे. या सभागृहात जेव्हा जेव्हा महिलांच्या प्रश्नांसंदर्भात चर्चा होणार, पहिले बोट तुमच्याकडे उचलले जाणार आहे. तुम्ही जर शिक्षिका आहेत, हुशार आहात. तुम्हाला वाटते की तुम्ही विभाग योग्यपणे सांभाळू शकता तर तुम्हाला त्याठिकाणी काम करावेच लागेल. असे चालणार नाही. आज कुठल्याही प्रश्नाचे उत्तर विचारले की, त्यांचे असेच उत्तर असते मला माहिती नाही. सगळ्यांत महत्वाचे म्हणजे त्या एज्युकेजेड आहेत. त्यांना मिसकॉल आल्यानंतर डाऊनलोड करायला सांगा. पन्नास रुपये घेतात. आता नगरसेवक फोन करतो. त्यांच्याकडे कॉल वेटींगचा ऑप्शन नाही का. मग नगरसेवकाचं डोक फिरतं. ना नगरसेवक फोन करतो ना नगरसेविका फोन करते. त्यांच्याकडे वेटींग ऑप्शन नसावा? स्मार्ट फोनमध्ये सगळे इनबिल्ट आहेत. त्यांच्याकडे नाहीए असे त्या म्हणतात. मॅडम, तुम्हाला इथे येऊन लगेच जायचे नाहीए. जर तुम्हाला त्या पोस्टवर तिथे काम करायचे असेलतर, तुम्हाला तिथे रिस्पॉन्सिबल व्हावे लागेल. चार नगरसेवकांचे उंबरे झिजवून जर तुम्हाला वाटत असेल की तुमची खुर्ची टिकू शकते तर ते डोक्यातून काढून टाका. इथे डोक्यावर घेणारे आम्ही असलो ना तरी कधी उचलून गणपती करतो ते तुम्हाला कळणार नाही. सो बी अलर्ट आणि काम करा. तुमचे शिवण यंत्रांचे फॉर्म आहेत. साहेब, अजून अनुदान गेलेले नाही. दूसरे आर्थिक वर्ष सुरु झाले आहे काय कारण आहे. मागच्या वर्षी मी चेअरमन झाल्या झाल्या सांगितले होते की, शाळांमध्ये फॉर्म वाटा. दुस-या तिस-या दिवशीच आपले चेक जायला पाहीजे होते. सात आठ महिने स्क्रूटीनीमध्ये गेले

आहेत. प्रत्येक काम वाटले कसे जाईल, याच्याकडेच आपले लक्ष आहे. आपण त्यांच्याकडे का लक्ष देतो ते मला कळत नाही. महिला बालकल्याणसाठी ५० कोटींचे बजेट करायचे आणि आम्हीच आमच्या आमचे वाभाडे काढून घ्यायचे. हे योग्य नाही. तुम्ही मॅडमना चार्ज दिला, तर त्यांच्याकडून काम करुन घ्या. तुम्ही चार्ज देताना आम्ही तुम्हाला एक शब्द सुद्धा बोललो नाहीत. काम करुन घ्यायची जबाबदारी तुमची आहे. विभागप्रमुख म्हणून सभागृहात तुम्हीच उत्तर देणार असालतर हे तुम्हाला अशोभनीय आहे. इथून पुढे जो त्या विभागाचा प्रमुख आहे त्याने सभागृहात येताना अभ्यास करून यायचे. विषय, विषयाच्या अनुषंगाने काय प्रश्नोत्तरे होणार आहेत, काय विचारले जाणार आहे, मागील पुढील सगळी हिस्टरी घेऊन यायची. आत्ता सभागृहापुढे जो विषय आहे. यात सांगवीतल्या आमच्या एक भगिनी होत्या. त्यांचा मुलगा विदेशात शिक्षणासाठी जात होता. आणि आम्ही तुम्हाला सांगितले होते की, तुम्ही तिकडे जा. मग आम्ही तुम्हाला ईसीएस करु. तो मुलगा आमच्याकडे मदत सांगण्यासाठी आला. सन्मा. आमदार यांनी पाठवले. आम्ही माहिती घेतली तेव्हा आम्हाला कळाले की, जेव्हा तो यूएसएला पोहोचेल, त्यावेळी आम्ही त्याला दीड लाख रुपये देणार. ते दीड लाख दिल्यानंतर तिथे त्याचे साठ ते सत्तर हजार रुपये झाले असतील. तो मुलगा तिकडे एमएस करायला गेला आहे. आपण त्याची अवस्था पाहिलीतर त्याची आई एका मॉलमध्ये मदतनीस म्हणून काम करत होती. वडीलांनी आईला व मुलाला लहानपणीच सोडले होते. अशा मुलाची मदत करायची, त्याला जागेवर पैसे मिळतील हे पहावे. तो मुलगा दिल्ली एअरपोर्टला गेला, तेव्हा त्याच्या पायात शूज नव्हते. तिथल्या डिपार्टमेंटच्या अधिका-यांनी त्या मुलाला शूज घेऊन दिले होते. चांगल्या माणसाचा चांगुलपणा हा प्रत्येक ठिकाणी दिसतो. म्हणून आपण निर्णय घेतला होता की, पहिले ईसीएस करा. मला मान्य आहे की, आपल्याकडून एखादं दुस-या विद्यार्थ्याबाबतीत बाय प्रुफ असे होऊ शकतो. म्हणून त्याठिकाणी ९९ टक्के विद्यार्थी हे चांगले असतात. म्हणून त्याठिकाणी जर कॉलेजचे पत्र आले असेल की, या या कॉलेजला या या विद्यापीठाच ॲडमिशन झाले असेल तर आपण ईसीएस करावे. असा विषय स्थायी समितीने केला. महिला बालकल्याण समिती यांनी दिला आहे. त्यात सुधारणा करुन सभागृहात आपल्याकडे पाठवला आहे. आणि मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे की, खास करुन ड्रायव्हींग संदर्भात वरीष्ठ पातळीवर बोलून त्याठिकाणी कॅम्प लावा. असे जर विंडो बाय विंडो गेलोतर लायसन काढायला वर्ष लागेल. साईराजवाल्याला सक्त ताकीद द्या, जमत नसेलतर घरी बस. कारण आमच्या नावाखाली तिथे कोण पैसे घेत असेलतर अजिबात खपवून घेणार नाही. मा.झगडे मॅडम इथे जरी तुम्हाला जाहीररित्या बोललो असलोतरी, do not take it otherwise. मोबाईलमध्ये कॉल रिडींग ऑप्शन टाकून ठेवा. डाऊनलोड करा. एक तुम्हाला सांगते, काम चांगले असेलतर इथे सगळे डोक्यावर घेतात. एवढेच लक्षात ठेवायचे. मोठी बहीण म्हणून सांगते. कायमस्वरुपी लक्षात ठेवायचे. धन्यवाद.

**मा.बाबासाहेब उर्फ बाबा त्रिभुवन** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार बंधू भगिनी, आज जो विषय आहे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ईसीएसद्वारे पैसे पाठवण्याबाबतचा खूप चांगला विषय आहे. मी एक सांगू इच्छितो की, मागासवर्गीयांसाठी जो निधी असतो, तो पूर्णपणे खर्च होत नाही. तो प्रत्येक वर्षी खर्च झाला पाहीजे. गोरगरीब

समाजाला त्याचा लाभ झाला पाहीजे. मा.प्रमोद कुटे यांनी जी सूचना मांडली आहे, ती सर्व जातीधर्मासाठी खूप चांगली आहे. त्याचा स्विकार करावा. परंतू हा निधी देताना मागासवर्गीय कल्याणकारी योजनेतून न देता त्यासाठी वेगळा निधी द्यावा अशी विनंती करतो.

**मा.शितल ऊर्फ विजय शिंदे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,महिला बालकल्याण समितीमार्फत आणि आपल्या सभागृहाच्या मार्फत आपण महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी ड्रायव्हींग प्रशिक्षण योजना लागू केली. आत्ताच आमच्या एका भगिनींनी सांगितले की, हे काम दोन जणांना विभागून दिले आहे. त्यातल्या एकाने काम घेतले आहे तो प्रत्येक महिला भगिनीकडून रु.१५०/- घेतोय. आपल्या सभागृहाचा अनादर न ठेवता तो चुकीच्या पद्धतीने काम करतोय. माझी सभागृहाला विनंती आहे, मा.महापौर साहेब आपल्याला विनंती आहे की, आपण असे आदेश द्यावेत. या ठेकेदाराला अपात्र करावे. जेणेकरुन महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी जे प्रयत्न करतोय त्याचा कोणी दुरुपयोग करणार नाही. धन्यवाद.

**मा.सुनिता तापकीर** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,खरेतर तुम्ही महिला बालकल्याण समितीवर इतकी छान चर्चा करताय. आम्हाला आनंद वाटतोय. सर्वजण सर्वच विषयांवर चर्चा करतात. परंतू आजदेखील तुम्ही पाहीले की, एक ज्वलंत विषय टवाळखोरीचा. संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरात मला वाटतेय, दादा तुमच्या वॉर्डमध्ये पूर्णानगरमध्ये गेल्या आठवड्यात एक हत्या झाली. त्यानंतर भोसरी इथे काही घटना घडल्या. हिंजवडीमध्ये काही घटना घडल्या. पोलिस पोलिसांचे काम करतात. पण आपण समाजाचा एक घटक आहोत. आपली सुद्धा थोडी जबाबदारी आहे. मी मा.आयुक्त साहेब आपल्याला विनंती करते की, याबाबतीत महिला बालकल्याण कमिटीने कुंगफू, कराटे आणि योगा प्रशिक्षण याचे सर्व शाळांमध्ये आयोजन करण्यात यावे. आम्ही याचा प्रस्ताव मंजूर करुन घेतला आहे. असे पाहिलेतर कुठल्याच महिला सुरक्षित नाहीत. मुलगी असो, महिला असो, माता भगिनी असो, ज्येष्ठ नागरीक असो. सगळ्या नागरीकांनी आपल्याला निवडून दिले आहे. आपली पण काहीतरी जबाबदारी आहे. या दृष्टीकोणातून आपण निर्णय घ्यावा अशी मी मा.आयुक्त साहेबांना कळकळीची विनंती करते. ज्या ज्या ठिकाणी ज्येष्ठ नागरीक, स्वातंत्र्यसैनिक, महिला भगिनी इच्छुक आहेत. ज्या शाळा सुटल्यावर आपल्याला अर्धा एक तास देऊ शकतात. त्या तिथे थांबू शकतात. असे पोलिस मित्र, संबंधित त्यांनी तिथे शाळा भरताना, शाळा सुटताना थांबावे. शाळांमध्ये गेटच्या बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत. शाळांच्या आसपास ज्या टप-या असतात, त्या शंभर मीटरच्या अंतरावर नसाव्यात. खरे पाहीलेतर गुन्हेगारी तिथेच घडते. शाळेतील विद्यार्थी चहा,कॉफी घ्यायला तिथे जातात. चेष्टेचेष्टेत ही टवाळखोरी उदयास येते. मला वाटतेय की, नुसते हल्लाबोल करुन किंवा निषेध करुन हा प्रश्न सुटणार नाही. नागरीकांनी किंवा नगरसदस्यांनी यावर विचार करायला हवा. प्रत्येक नगरसदस्यांचे किमान पाच तरी कार्यकर्ते असतील जे प्रत्येक शाळेसाठी शाळा भरताना सकाळचा एक तास आणि शाळा सुटताना एक तास देऊ शकतात. आणि त्यांनी कंटीन्यू हे काम करायला पाहीजे. ही फक्त पोलिसांची कारवाई नाहीतर आपण पण त्यात चांगला सहभाग देऊ शकतो.

अजून एक विषय आहे. संजय गांधी योजनेचे ऑफीस पुण्यामध्ये खडकमाळ आळीमध्ये आहे. तर ते पिंपरी चिंचवड महापालिकेत पण करण्यात यावे. कारण महिला व ज्येष्ठ नागरीकांना जाण्यायेण्याचा त्रास होतो. खर्च होतो. ज्येष्ठ नागरीकांचा, महिलांचा तिथे दिवस दिवस वेळ वाया जातो. तर हा एक विषय आहे. तसेच मा.आयुक्त साहेब, महिला बाल कल्याणच्या वतीने सॅनिटरी नॅपकीन डिस्पोजल युनिट आणि वेंडींग मशीन हा एक विषय करण्यात आला होता. सदरच्या विषयाची मी माहिती घेतली. पण तो विषय कोणत्या विभागाकडे गेला आहे याची माहिती नाही. या विषयाला आमच्या चेअरमन मा.सिमाताई सावळे यांनी मला वेळोवेळी मदत केली आहे. ताई, मी तुमचे मनापासून खूप आभार व्यक्त करते. कारण त्यांनी दरवेळी मला मदत केली आहे. चांगल्या प्रकारे नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. सॅनिटरी नॅपकीन डिस्पोजल युनिट आणि वेंडींग मशीन हे ठिकठिकाणी,गर्दीच्या ठिकाणी, झोपडपट्‌टी,वस्त्यांमध्ये, शाळा-कॉलेजमध्ये बसवण्यात यावेत. मा.आयुक्त साहेब, आपण याची नोंद घ्यावी. धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, महिलांच्या जिव्हाळ्याच्या विषयावर माझ्या भगिनी पोटतिडकीने सांगत होत्या. विषय असा आहे की, ईसीएसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करणे. या विषयावर सगळ्याच महिला सदस्यांनी खूप चांगली चर्चा केली. त्यामुळे पुरुष नगरसदस्यांनी चर्चेत भाग घेतला नाही. मी ताईंचे मनापासून अभिनंदन करतो. गेल्या वर्षभरात महिला व बालकल्याण समितीने खूप चांगल्या पद्धतीने काम केले आहे. हा एक ईसीएसचाच विषय नाही. खरेतर तुमच्या समितीचे अभिनंदन करायला पाहीजे. खरेतर तुम्ही गेल्या वर्षभराच्या काळात जे जे विषय केले, ते खूप स्तुत्य आहे, अभिनंदनीय आहे. ईसीएसचा एक विषय झाला. अपंगांसंदर्भातले धोरण तुम्ही चांगल्या पद्धतीने लोकांमध्ये राबवण्याचा प्रयत्न केला. ड्रायव्हींगच्या माध्यमातून महिलांना केवळ प्रशिक्षण द्यायचे नाहीतर त्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी काम केले आहे. आठ दहा दिवसांपूर्वी तशाच पद्धतीचा रोजगार मेळावा तुमच्या विभागामार्फत केला. मला खात्री आहे की, खरेतर महिला व बालकल्याण समितीचे काम, मा.सिमाताई सावळे यांनी सांगितले ते खरे आहे. डायरेक्ट लोकांसाठी जर कुठली योजना केली जाते तर ती महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून केली जाते. काम सुधारले पाहीजे. दहा वर्षांची फाईल हालत नव्हती, त्याला शंभर टक्के गती मिळाली आहे. मघाशी मा.मंगलाताई कदम म्हणाल्या. आत्ता खरेतर त्यात सिस्टीम आणू. ज्या पद्धतीने फाईल आणायच्या. ती फाईल आपण कॉम्प्यूटरमध्ये करायची. यामुळे खरेतर कामाचा निपटारा लवकरात लवकर होऊ शकतो. आज महिलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने कराटे प्रशिक्षणाची खूप गरज आहे. माझ्या प्रभागातले उदाहरण दिले. एखाद्या मुलाचा एकतर्फी प्रेमातून खून केला जातो. त्यांनी सांगितले, आपण एकमेकांना मदत केली पाहीजे. घटना घडली त्या सकाळी सकाळी मा.मंगलाताई कदम आल्या होत्या. त्यांनी

लोकांना सांगितले. झोपडपट्टी भागात घटना घडली तर सगळे लोक रस्त्यावर येतात. पण एखाद्या हायक्लास सोसायटीत घटना घडलीतर आपण फक्त बघायचे काम करतो. माझी सगळ्या बहीणींना विनंती आहे की, एका बहिणीने ताकद दिलीतर ती सगळ्यांसाठी ताकद होऊ शकेल. सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार केलातर चांगले होईल. सगळ्या महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी जे-जे करता येईल ते-तेकरण्यासाठी आपण प्रयत्न करु यात. आपण या विषयावर खूप चर्चा केली आहे. अजून दोन/तीन विषय घेऊन आपल्याला बजेटवर चर्चा चालू करायची आहे. मी मा.महापौर साहेबांना विनंती करतो की, महिला व बालकल्याण समितीच्या सर्व सदस्यांचे अभिनंदन करुन हा विषय मंजूर करुन पुढील विषय घ्यावा. खूप खूप धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** – हा विषय उपसचूनेसह मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - १६६ | विषय क्रमांक – ६

दिनांक – २०/३/२०१८ | विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/०५/कावि/२७/२०१८ दि.१२/०२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत १) मागासवर्गीय युवकांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे. ही योजना कार्यान्वित आहे. या योजनेमध्ये अर्थसहाय्याचा धनादेश प्रवेश घेतलेल्या विद्यापिठाचे नावे काढण्यात येतो. त्या ऐवजी विद्यार्थ्याचे नावे धनादेश किंवा ECS द्वारे लाभ देणेत यावा अशी दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने त्यास मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रपत्र ''**अ''** नुसार या सुधारीत योजनेला मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विभागामार्फत सर्व जाती धर्मातील विदयार्थ्यांना आर्थिक निकशावर अर्थसहाय्य देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ | प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.शर्मिला बाबर-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ७

दिनांक – २०/३/२०१८ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्वभाअक/३/कावि/५७/२०१८ दि.०८/३/२०१८

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु.४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र.रु.१३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु.८०००/- व मनपा हिस्सा र.रु.४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक २८/०२/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १२७३१ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १२३२६ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ९८०३ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | मनपा बांधकाम- ६०६२ | एकुण बांधकाम पुर्ण- ९०५०<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - २९८८ |
| बांधकाम पूर्ण | सामुदायिक | ४६५ सीटस | महिला–२०३ सिटस |

| | | | |
|---|---|---|---|
| झालेल्या शौचालयांची संख्या | शौचालय | | कामकाज पूर्ण<br>पुरुष–२६२ सिटस<br>कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ६७६८ लाभार्थी | GOI+GOM=४०६.०८ लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १३५.३६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५४१.४४ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ५८२९ लाभार्थी | GOI+GOM=३४९.७४ लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =११६.५८ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **४६६.३२ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.अनुराधा गोरखे** – मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळ विभागाकडील सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकातील सी.सी.टि.व्ही. कॅमेरे लेखाशिर्षावर र.रु.१,००,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे. माहे नोव्हेंबर २०१७ अखेर र.रु.१,००,००,०००/- इतकी तरतूद खर्ची पडलेली आहे. या लेखाशिर्षावर मार्च २०१८ अखेर आणखी र.रु. १,९१,०९,२५०/- इतकी रक्कम अदा करणे बाकी आहे. त्यामुळे सदरची र.रु. १,९१,०९,२५०/- इतकी रक्कम खर्ची पडणार आहे. परंतु सदर लेखाशिर्षावर सद्यस्थितीमध्ये तरतूद शिल्लक नसल्याने मे.भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता संघ यांचे उर्वरीत बील अदा करता येत नाही. या कारणास्तव अन्य लेखाशिर्षावरुन तरतूद वर्ग करणे आवश्यक आहे. याकामी सन २०१७-१८ या अंदाजपत्रकात शालेय फर्निचर या लेखाशिर्षावर रक्कम रु.३,५०,००,०००/- इतकी तरतूद केलेली आहे. त्यामधुन आज अखेर र.रु.५६,१३,५००/- इतकी तरतूद खर्ची पडलेली आहे. व उर्वरीत र.रु.२,९३,८६,५००/- इतकी रक्कम शिल्लक आहे. त्यामुळे या लेखाशिर्षावरुन सी.सी.टि.व्ही. कॅमेरे या लेखाशिर्षावर रक्कम रु.२,००,००,०००/- (अक्षरी र.रु. दोन कोटी फक्त) इतकी तरतूद वर्ग करणेस मा.स्थायी समिती सभा विषय क्र. ४३, ठराव क्रमांक २२५५ दि.२१/०२/२०१८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी शिक्षण मंडळाच्या सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकातील शालेय फर्निचर या लेखाशिर्षावरील शिल्लक र.रु.२,९३,८६,५००/- मधुन र.रु.२,००,००,०००/- सी.सी.टि.व्ही. कॅमेरे या लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्र. २२५५ दि. २१/०२/२०१८

अन्वये मान्यता दिलेली असल्याने सदर सी.सी.टि.व्ही कॅमेरे लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.शितल उर्फ विजय शिंदे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,हा अनुदानाचा विषय आहे. शहर हगणदारीमुक्त कसे होईल हे पाहतोय. माझ्या प्रभागात एकूण पाच झोपडपट्ट्या आहेत. फुलेनगर आहे, लांडेवाडी आहे, नाणेकरचाळ आहे, वैशालीनगर आहे, गोकृष्णनगर आहे आणी जयमहाराजनगर आहे. अशा माझ्याकडे पाच झोपडपट्टया आहेत. मी हे वाचत होते की, आज अनुदान मिळाल्यानंतर किती शौचालये बांधली गेली. फुलेनगरमध्ये जवळजवळ साडेचार हजार ते पाच हजार लोकवस्ती आहे. पण माझ्याकडे प्रभागात महिलांसाठी ५८ पब्लिक सिटस् आणि ४८ पुरुषांसाठी एवढेच पब्लिक सिटस् एवढेच आहेत आज माझ्याकडे फक्त १०० सिटस् वैयक्तिकरित्या बांधले गेले आहेत. आज आपण वैयक्तिक शौचालय देणार असे म्हणतोय. आपण काम करतोय. त्यावेळी प्रत्येक झोपडपट्टीतले लाभार्थी किती आहेत, लाभार्थी कुठल्या पद्धतीचा आहे याचा सुद्धा अभ्यास करावा लागेल. आज आपल्या स्थायी समितीच्या अध्यक्षा मा.सिमाताई सावळे यांचे मी अभिनंदन करेन की, बालाजीनगरमध्ये सगळ्यांत वेगळ्या पद्धतीची शौचालये बांधण्यात आली. आज बघितले तर लांडेवाडीत आज बघितले तर जवळजवळ ४,००० लोकवस्ती आहे. आणि टोटल पब्लिक सिटस् माझ्याकडे किती आहेततर माझ्याकडे फक्त ८६ पब्लिक सिटस् आहेत आणि वैयक्तिक शौचालये किती बांधली गेली आहेत तर फक्त २६ वैयक्तिक शौचालये बांधली गेली आहेत. आज माझ्याकडे नाणेकर चाळ, भारतनगर, वैशालीनगर या झोपडपट्टयांमध्ये माझ्याकडे १३० घरे आहेत. आणि जवळजवळ हजार ते अकराशे लोकसंख्या आहे. तिथे फक्त १२ सिटस् आहेत By the rule of govt., by the rule of corporation, एका सिटमागे जवळजवळ ४० जाण्याची तुमच्याकडे उपलब्धता आहे. पण आज माझ्या नाणेकरचाळीत एका सिटमागे जवळजवळ १६५ लोक जातात. एका सिटमागे ५०/६० लोक जातात. लांडेवाडीत एका सिटमागे ६० लोक जातात. एक माणूस सकाळी गेलातर त्याचा ६० वा नंबर कुठल्या माणसाचा किती वाजता येणार. पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचा तुमचा जर मानस असेलतर अशा प्रकारे पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त होऊ शकते का. तुम्ही माझ्या नाणेकर चाळीत गेलात तर आयुक्त साहेब तुम्हाला प्रत्येक रस्त्याला ओळी दिसेल. तिथे कच-याची घाण आहे. ती घाण वेगळी, ओळीची घाण वेगळी. या नागरीकांनी कुठल्या पद्धतीने रहायचे तुम्ही मला याचे उत्तर द्या. फुलेनगरमधील माणसे, ज्येष्ठ बायका आज माझ्याकडे येऊन सांगतात, आम्ही दोन दोन दिवस जेवत नाही. हा त्यांचा अधिकार आपण देतोय त्यांना. तिथल्या लोकांनी दोन दिवस जेवायचे नाही का तर आम्हाला टॉयलेटला जाण्याची मुभा नाही. आम्हाला टॉयलेटची उपलब्धता नाही म्हणून आम्ही तिथे जाऊ शकत नाही. आज माझी प्रशासनाला विनंती आहे, आयुक्तांना विनंती आहे की, फक्त हगणदारी मुक्त करतोय. अंमलबजावणी कशी झाली पाहीजे. आपण फक्त आदेश देतोय. मोठमोठ्या वल्गना करतोय. या वल्गना करुन चालणार नाही. फुलेनगर, नाणेकर चाळ, लांडेवाडी या माझ्या पाच झोपडपट्टयांची जर अशी अवस्था असेल तर मला वाटतेय की, पिंपरी चिंचवड

मधील अवस्था कमी जास्त प्रमाणात यापेक्षा दूसरी काही नसावी. आज आपण ड्रेनेजला लाईन दिल्या पाहीजेत. माझ्या भागाकडे क्रेडाई, शेल्टर आणि मशाल अशा तीन संस्थांद्वारे काम होत होते. मा.आयुक्त साहेब, नाणेकर चाळीतला सर्वे मी स्वतः केला. आम्ही ९३ फॉर्म भरुन घेतले. ९३ फॉर्म भरुन घेतल्यानंतर आम्ही ईएमआय वाटतो. आमच्याकडे एस.आय नवीन आला आहे. त्याला विचारले की, हे फॉर्म कुठे द्यायचे. मा.आयुक्त साहेब, त्या एस.आय. ला माहित पण नाही की हे फॉर्म कुठे द्यायचे आणि कुठल्या पद्धतीने काम करुन घ्यायचे. त्यानंतर आमचे अति.आयुक्तांशी बोलणे झाले. त्यातले ७४ फॉर्म पात्र झाले. अनुदान प्राप्त झाले आणि त्या ७४ फॉर्ममधले लाभार्थी सुरु झाले आणि तिथे काम सुरु झाले. आज आपण काम केलयं. आज आपण तिथे वॉशरुम बांधतोय. पण आपण तिथे ड्रेनेजची लाईनच लवकर देऊ शकलो नाहीतर त्याचा उपयोग सुद्धा होणार नाही. आपण कुठल्याही गोष्टीची अंमलबजावणी करण्याअगोदर फक्त वल्गना करण्यापेक्षा त्याची अंमलबजावणी कशी होईल, हे धोरणात्मक काम जर तुम्ही केलेतर मला वाटतेय की, त्याची अंमलबजावणी चांगल्या पद्धतीने होईल. शहर हगणदारी मुक्त करताना रस्त्यावरच्या ओळी बघा, लांडेवाडीतल्या बघा, फुलेनगरमधल्या बघा, नाणेकर चाळीतल्या बघा. बरेचसे लोकं, ब-याचश्या माता बंधु-भगिनी, आत्ताच महिला व बालकल्याणच्या सभापती मा.सुनिता तापकीर यांनी सांगितले. माझ्याकडे मुली येऊन सांगतात. छेडछाडीचे जे प्रकार आहेत, सांगा आम्ही कॉलेजला जाताना कसं जायचं. या सर्वांचा विचार व्हावा. आणि या सर्वांचा विचार लक्षात घेता, जास्तीत जास्त वैयक्तिक शौचालये कशी लवकरात लवकर बांधू. पण बांधताना आपण प्रत्येक झोपडपट्टीत ड्रेनेजच्या लाईन कशा देऊ याचा मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपण विचार करावा. आपण नक्कीच विचार करायला पाहीजे. या सर्वांची अंमलबजावणी खरेतर लवकर करावी. लवकर झालीतर खूपच बरे होईल. मी तुमचे आभार मानते आणि व्हावी एवढी सदभावना मनात ठेवते.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, खरेतर हा अतिशय चांगला विषय आहे. आमचे सहकारी मित्र मा.पक्षनेते या वॉर्डातून निवडून आले आहेत. या विषयासंदर्भात चर्चा करतोय. फुलेनगरचा विषय आहे. माझ्या वॉर्डला लागून तो परिसर आहे. याठिकाणी खूप मोठी झोपडपट्टी आहे. तिथे दहा ते पंधरा हजार लोक राहतात. प्राधिकरणाच्या आरक्षणातील ती जागा आहे. तिथे हे लोक वसलेले आहेत. त्याठिकाणी पूर्वी एक दोन झोपड्या होत्या, आता जवळपास खूप मोठा भाग झालेला आहे. या झोपडपट्टया तिथे वसून जवळजवळ दहा ते बारा वर्षे झालेली आहेत. या टॉयलेटच्या  माध्यमातून विषय घेतला आहे. स्पाईन रोड आहे, तिथे सकाळी टॉयलेट ब्लॉक काही सोय करता आलीतर बरे होईल. फुलेनगर परिसर आहे, स्पाईन रोड भाजी मंडई दोन्ही रस्त्यांना सकाळी अतिशय दूर्गंधी असते. भयानक परिस्थिती आहे. या माध्यमातून तिथे काही करता आलेतर नक्की करावे अशी मी विनंती करतो. मा.महापौर साहेब, मी आपली परवानगी घेऊन काही विषय आपल्या निदर्शनास आणून देतो. मा.आयुक्त साहेब, मी माहे सप्टेंबर २०१६ च्या महापालिका सभेत सभागृहात काही प्रश्नोत्तरे केली होती. मी २०१६ मध्ये खालील प्रश्न विचारले होते. १) सुरक्षा विभागातील ठेकेदारी पध्दतीने नियुक्त केलेल्या रखवालदारांना ड्रेस कोड आहे का. काही रखवालदार कामावर येताना दारु पिऊन येतात, काही रखवालदार कामावर न येता त्यांची हजेरी लावतात. व त्यांचे बिल व

पगार घेतले जाते हि वस्तूस्थिती आहे का. अशा प्रकरणी संबंधितांवर काय कारवाई केली जाते. २) ठेकेदारी पध्दतीने नियुक्त केलेल्या रखवालदारांना नेमणूकीच्यावेळी चारित्र्य पडताळणी केली जाते का. ठराविक रखवालदारांना सप्ताहिक सुट्टी दिली जात नाही मर्जीतील रखवालदारांना सवलत दिली जाते असा भेदभाव केला जातो का. ठेकेदारी पध्दतीने नियुक्त केलेल्या रखवालदारांना बायोमेट्रीक (थंब) हजेरी चालू का केली नाही. माझा तिसरा प्रश्न होता सुरक्षा विभागाचा प्रश्न होता. त्यातला पाचवा प्रश्न होता की, पिं.चिं. महानगरपालिका हद्दीमधील उदयानांची संख्या किती आहे. त्यामध्ये प्राधिकरण आणि एम.आय.डी.सी.ने विकसीत केलेल्या उदयानांची संख्या किती आहे. महापालिकेच्या ताब्यात असलेल्या आणि नसलेल्या उदयानांची संख्या किती. माध्यमांमधील बातम्यांनुसार महापालिका हद्दीत उदयानांची संख्या अनधिकृत बांधकामे असलेली उदयानांची संख्या किती? मा.आयुक्त साहेब, आपले महाशय अधिकारी आहेत,श्री.संजय कांबळे यांचा महापालिकेतर्फे सत्कार केला गेला पाहीजे. त्यांचे १९ महिने राहीले आहेत. त्यावेळी त्यांनी अतिशय सुंदर उत्तर दिले होते. ते तुम्हाला वाचून दाखवतो. दि.१७/८/२०१६ ला मला हे पत्र देण्यात आले. (पत्र वाचून दाखवले)– पिंपरी चिंचवड क्षेत्रामध्ये मनपाच्या ताब्यातील अन्य उद्यानांमध्ये आढळून आलेली विविध प्रकारची बांधकामे संबंधित विभागामार्फत तीन महिन्यांच्या कालावधीत काढण्यात येवून माहिती देण्यात येईल. मी पत्र दिले होते. सभागृहात चर्चा झाली होती. साधारणतः दि.३१/८ ला सभागृहात चर्चा झाली. आज १९ महिने झाले. या अधिका-यांनी महापालिकेत किती उद्याने आहेत, त्यामध्ये किती अतिक्रमणे झाली आहेत, अतिक्रमणांसाठी महापालिकेने किती पैसा खर्च केला आहे, हे सगळे प्रश्न विचारले होते. आजपर्यंत मला या विभागाच्या माध्यमातून माहिती दिली गेलेली नाही. याच्यापेक्षा दूर्भाग्य म्हणजे हे अधिकारी नक्की करतात काय. शहरातील आरक्षणे यासाठी आपण ताब्यात घेतो का. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून मूळ शेतक-यांकडून ही आरक्षणे ताब्यात घेतली गेली आहेत. महापालिकेच्या माध्यमातून या आरक्षणांवर खर्च करुन आपण तिथे अनधिकृत बांधकामे करणार आहोत का. मंदीरं करणार आहोत का. अन्य काही करणार आहोत का. अनेक वेळा आपण शहरातली अनधिकृत बांधकामे महापालिकेच्या माध्यमातून पाडतो. आपल्या महापालिकेच्या माध्यमातून आपल्या आरक्षित जागेवर जर असे काही घडत असेलतर मा.महापौर साहेब हा विषय गंभीर आहे. उद्यानात, आरक्षणाच्या प्लॉटवर महापालिकेकून खर्च करुन काय काय उभे केले गेले आहे. कोण अधिका-यांना प्रेशर करतो माहित नाही. २०१७ च्या निवडणूका लागणार होत्या. यांना माहित होते, हा बाबा काय सभागृहात येणार नाही. असा त्यांच्या डोक्यात प्रश्न पडला असेल म्हणून उद्यान विभागात चाललेला गोंधळ जाणिवपूर्वक चालला जातो काय. सभागृहात चर्चा केली असताना मला साभगृहात उत्तर दिले असताना, तीन महिन्यांनंतर सुद्धा मला माहिती मिळत नसेलतर याच्या पेक्षा सभागृहात गांभिर्य दूसरे नाही. एका बाजूला अशी अनधिकृत बांधकामे होत असताना मा.आयुक्त साहेब, आपण याची दखल ताबडतोब घ्यावी, अशी मी विनंती करतो. मी आणखी एक दूसरा विषय घेतो. कालच माझ्या भागात एक घटना घडलेली आहे. अर्जून मोरे नावाचा व्यक्ती, काल मी त्याबद्दल तुमच्याशी चर्चा केली आहे. आपले एक अधिकारी श्री.तूपसाखरे म्हणून आहेत, त्यांनी काही काळ नगररचना विभागात काम केले आहे. त्यांना आता तुम्ही पाणीपुरवठा विभागात पाठवले आहे. आमचा जूना शेतकरी, जूना मूळ रहिवासी, गाववाला,

१९९७ ला महापालिकेत आमची गावे समाविष्ट होण्याआधी, त्या काळातले पाणीपुरवठ्याचे कनेक्शन असताना, त्याने रिकनेक्शनसाठी आपल्याकडे रितसर सारथीच्या साईटवर दि.१२.३ ला कंमप्लेण्ट दिली. दि.१७.३ ला कंमप्लेण्ट दिली. दि.२६.३ ला, ३.१० ला कंमप्लेण्ट दिली. सारथीवर सहा वेळा कंमप्लेण्ट दिली आहे. हे असताना रिकनेक्शनसाठी पत्र दिले. त्याला उत्तर दिले आहे, उपरोक्त विषयाबाबत मा.आयुक्त यांचा आदेश क्र. दि.२०/२/१८ अन्वये आदेश ठेवण्यात आलेला आहे. निगडीमधील काही भाग यमुनागर तळवडे परिसरातील,चिखली मधील काही भाग हा रेडझोनमध्ये असल्यामुळे आपल्याला हे कनेक्शन देण्यात येणार नाही. आमच्या भागात रेड झोन आला कधी, तो मूळ रहिवासी होता कधी, तुम्ही त्याला जर नविन कनेक्शन म्हणत नाहीतर रिकनेक्शन द्यायला नाकारत असालतर आपल्या पाईपलाईनला किती अनधिकृत होल पडतील ते मला माहित नाही. यापूर्वी सुद्धा सभागृहामध्ये हा विषय आणला होता. २०१५ पर्यंती बांधकामे आपण अनधिकृत बांधकामे अधिकृत करायचा विषय आपण आणला आहे. फक्त आमच्याकडे रेडझोन आहे म्हणून आम्हाला नळाचे रिकनेक्शन द्यायचे नाही. आमचा टॅक्स चालतो. आमचे बाकी सगळे विषय चालतात. आम्हाला सुविधा द्यायच्या नाहीत. आमचा टॅक्स सुद्धा घेणे बंद करा. आयुक्तांनी आदेश द्यावेत. मा.महापौर साहेब, आपण मला बोलायला संधि दिलीत. आपले धन्यवाद.

**मा.शर्मिला बाबर** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा विषय मतास टाकणेत आला असता –

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - १६७ | विषय क्रमांक – ७ |
| दिनांक – २०/३/२०१८ | विभाग- मा.आयुक्त |

**संदर्भ-** मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्वभाअक/३/कावि/५७/२०१८
दि.०८/३/२०१८

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र. रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु.४०००/- , राज्य शासनाचे र.रु.८०००/- व मनपा हिस्सा र.रु.४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक २८/०२/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १२७३१ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १२३२६ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ९८०३ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | मनपा बांधकाम- ६०६२ | एकुण बांधकाम पुर्ण- ९०५० सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - २९८८ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३ सिटस कामकाज पूर्ण पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ६७६८ लाभार्थी | GOI+GOM=४०६.०८ लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १३५.३६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५४१.४४ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ५८२९ लाभार्थी | GOI+GOM=३४९.७४ लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =११६.५८ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **४६६.३२ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळ विभागाकडील सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकातील सी.सी.टि.व्ही. कॅमेरे लेखाशिर्षावर र.रु.१,००,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे. माहे नोव्हेंबर २०१७ अखेर र.रु.१,००,००,०००/- इतकी तरतूद खर्ची पडलेली आहे. या लेखाशिर्षावर मार्च २०१८ अखेर आणखी र.रु. १,९१,०९,२५०/- इतकी रक्कम अदा करणे बाकी आहे. त्यामुळे सदरची र.रु. १,९१,०९,२५०/- इतकी रक्कम खर्ची पडणार आहे. परंतु सदर लेखाशिर्षावर सद्यस्थितीमध्ये तरतूद शिल्लक नसल्याने मे.भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता संघ यांचे उर्वरीत बील अदा करता येत नाही. या कारणास्तव अन्य लेखाशिर्षावरुन तरतूद वर्ग करणे आवश्यक आहे. याकामी सन २०१७-१८ या अंदाजपत्रकात शालेय फर्निचर या लेखाशिर्षावर रक्कम रु. ३,५०,००,०००/- इतकी तरतूद केलेली आहे. त्यामधुन आज अखेर ५६,१३,५००/- इतकी तरतूद खर्ची पडलेली आहे. व उर्वरीत र.रु.२,९३,८६,५००/- इतकी रक्कम शिल्लक आहे. त्यामुळे या लेखाशिर्षावरुन सी.सी.टि.व्ही. कॅमेरे या लेखाशिर्षावर रक्कम रु.२,००,००,०००/- (अक्षरी र.रु. दोन कोटी फक्त) इतकी तरतूद वर्ग करणेस मा.स्थायी समिती सभा विषय क्र. ४३, ठराव क्रमांक २२५५ दि.२१/०२/२०१८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी शिक्षण मंडळाच्या सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकातील शालेय फर्निचर या लेखाशिर्षावरील शिल्लक र.रु. २,९३,८६,५००/- मधुन र.रु. २,००,००,०००/- सी.सी.टि.व्ही. कॅमेरे या लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्र. २२५५ दि. २१/०२/२०१८ अन्वये मान्यता दिलेली असल्याने सदर सी.सी.टि.व्ही कॅमेरे लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - १६८ विषय क्रमांक – ८

दिनांक – २०/३/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**विधी समिती**

अ) दिनांक ६/२/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मनिषा पवार -** मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - १६९ विषय क्रमांक – ९
दिनांक – २०/३/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दिनांक २/१/२०१८, १६/१/२०१८ व दिनांक ३०/०१/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दिनांक ६/२/२०१८, २०/२/२०१८ व दिनांक २१/२/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मनिषा पवार -** मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - १७० विषय क्रमांक – १०
दिनांक – २०/३/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दिनांक ९/१/२०१८ व २३/१/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दिनांक १४/२/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मनिषा पवार -** मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - १७१ विषय क्रमांक – ११
दिनांक – २०/३/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

अ) दिनांक २९/०१/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत अहे.

**मा.मनिषा पवार -** मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.महापौर –** सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करणेत येत आहे.

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/७/कावि/१५९/२०१८
दिनांक - ०२/०५/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.